# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## तृतीय वर्ष कला अभ्यासक्रम सत्र पद्धत (VI)

## जनरल पेपर POL ३६३ (SPl-४) ३६११७

## आधुनिक राजकीय विश्लेषण

## Modern Political Analysis

## तृतीय वर्ष कला द्वितीय सत्र- VI

## राज्यशास्त्र- जून २००९

## (सुधारीत सत्रपद्धतीचा पुनर्रचित अभ्यासक्रम)

## तृतीय वर्ष कला द्वितीय सत्र- VI

**१) राजकीय सहभाग**

- राजकीय सहभाग- अर्थ, व्याख्या, स्वरूप आणि महत्त्व
- राजकीय सहभागावर प्रभाव पाडणारे घटक
- राजकीय सहभागाच्या पातळया
- राजकीय उदासिनता, राजकीय अश्रद्धपणा, राजकीय अलगत्व
- मूल्यमापन

**२) राजकीय श्रेष्ठजन**

- अ) राजकीय श्रेष्ठीजन- अर्थ, व्याख्या आणि स्वरूप
- श्रेष्ठीजन निर्मितीचे प्रकार आणि विविध स्तर, प्रतिश्रेष्ठीजन
- ब) राजकीय नेतृत्व- अर्थ, व्याख्या, नेतृत्वाचे राजकीय स्वरूप
- राजकीय नेतृत्वाची वैशिष्टये,
- राजकीय नेतृत्व आणि अधिमान्यता
- राजकीय नेतृत्व आणि विचारधारा
- मूल्यमापन

**३) राजकीय संसूचन-**

- राजकीय संसूचन- अर्थ, व्याख्या आणि वैशिष्टये
- राजकीय संसूचन साधने,
- लोकमत- लोकमत घडण्याची प्रक्रिया आणि लोकमतातील बदल
- मूल्यमापन

**४) राजकीय विकास आणि राजकीय आधुनिकीकरण-**

- अ) राजकीय विकास अर्थ, व्याख्या आणि महत्व
- ब) राजकीय विकासाचे विविध दृष्टिकोन
- क) राजकीय परिवर्तन आणि क्रांती
- ड) राजकीय आधुनिकीकरण उद्दिष्टे आणि अडथळे
- मूल्यमापन

## द्वितीय सत्र
## प्रकरण १ ले
## राजकीय सहभाग

**प्र.१ला राजकीय सहभाग म्हणजे काय ते सांगुन राजकीय सहभाग घडवून आणणारे मूलभूत घटक स्पष्ट करा?**

वाढत्या प्रमाणात लोकांचा सहभाग राजकीय प्रक्रियांमध्ये होणे हे आधुनिक व्यवस्थेचे ठळक वैशिष्टये आहे. प्राचीन काळी राजकीय व्यवस्थेमध्ये लोकांचा सहभाग अत्यंत मर्यादित प्रमाणात होता. प्राचीन ग्रीक नगरराज्यात प्रत्यक्ष लोकशाही असूनही फक्त नागरिकाचा दर्जा असलेल्या व्यक्तींनाच राजकारणात सहभागी होण्याचा अधिकार होता. मध्ययुगीन संरजामशाही व राजेशाही व्यवस्थेत राजाचे मंत्री, सरदार आणि राजधराण्यातील व्यक्तीपुरूता राजकीय सहभाग मर्यादित होता. आधुनिक काळात प्रौढ मताधिकाराच्या अधिकारांमुळे सर्व लोकांना मतदानाचा अधिकार मिळाल्यामुळे सर्वांना राजकीय व्यवस्थेत सहभागी होण्याचाही अधिकार प्राप्त झाला. शासन संस्थेच्या वाढता विस्तार, संघराज्य शासन पद्धती, वाढत्या प्रसार माध्यमे आणि दळणवळण साधनात झालेली वाढ इत्यादींमुळे राजकीय सहभागाच्या संधी विपुल प्रमाणात व्यक्तीला मिळू लागल्या. राज्याच्या वाढत्या कार्यक्षेत्रामुळे व्यक्ती जीवनातील सर्व क्षेत्रावर राज्यसंस्थेच्या निर्णयाचा प्रभाव पडू लागल्यामुळे या संस्थाच्या कार्याबद्दल व्यक्तीला उदासीन राहणे अशक्य होऊ लागल्यामुळे नागरिक आधुनिक काळात मोठया प्रमाणात राजकीय सहभाग घेऊ लागले आहेत.

राजकीय व्यवस्थेमध्ये सहभागाची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असते. राजकीय व्यवस्थेच्या विविध टप्प्यावर हा सहभाग घेता येतो. राजकीय सामाजीकरणाच्या प्रक्रियेमुळे व्यक्तीला राजकीय चेतना मिळते आणि त्या चेतनेमुळे व्यक्ती राजकारणात सहभागी होते. राबर्ट ढालच्या मते राजकीय सहभागात चार प्रकारच्या वर्गाचा समावेश होतो.
सत्ताधारी वर्ग २) सत्तेसाठी प्रयत्न करणारा वर्ग ३) राजकारणात आवड असलेला वर्ग ४) राजकारणात उदासीन वर्ग, या सर्व वर्गाचा राजकीय सहभागाशी संबंध येतो. रॉबर्ट ढालच्या विश्लेषणानुसार राजकीय सहभाग हा मतदानापुरता मर्यादित राहिलेला नाही. मतदान हा बहुसंख्य लोकांना राजकीय सहभाग मिळवून देणारा सर्वात सोपा प्रकार असला तरी सभा, निदर्शने, राजकीय चर्चा, निमराजकीय घटकांचे सदस्य इत्यादी विविध माध्यमातून व्यक्ती राजकारणात सहभागी होताना दिसतात.

**राजकीय सहभागाची व्याख्या -**

१) **मॅक्सोली-** शासकाच्या निवड प्रक्रियेत व सार्वजनिक धोरण निर्मिती प्रक्रियेत लोकांचा जो प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग असतो त्याला राजकीय सहभाग असे म्हणतात.
२) **डेव्हिड ईस्टन-** विशिष्ट भूप्रदेशात राहणारा लोकसमूह जो सार्वजनिक स्वरूपाचे निर्णय घेतो. त्या प्रक्रियेत लोकांनी घेतलेला भाग हा राजकीय सहभाग असतो.

**राजकीय सहभाग घडवून आणणारे मूलभूत घटक-** विविध समाजात आणि समाजाच्या विभिन्न स्तरात राजकीय सहभागाचे प्रमाण व प्रकार वेगवेगळे होण्यासाठी कारणीभूत असलेले घटक अभ्यासकांनी शोधून काढले आहेत. त्या अभ्यासकांच्या अभ्यासातून व्यक्ती राजकारणात का सहभागी होण्यामागची पुढील कारणमीमांसा केलेली दिसते.

**१) राजकीय चेतनेचे प्रमाण-** सामाजिक संपर्काचे प्रमाण व राजकीय चेतना यांचा जवळचा संबंध असतो. विविध संघटना आणि राजकीय संसूनन माध्यमाशी संपर्क असणाऱ्या व्यक्तींना राजकीय चेतना मोठया प्रमाणावर मिळत असल्याने त्यांचा राजकीय सहभाग मोठया प्रमाणावर वाढत असतो. रेडिओ, दूरचित्रवाणी, वर्तमानपत्र, इंटरनेट इत्यादी संसूचन माध्यमाचा आधुनिक काळात मोठया प्रमाणावर वापर वाढलेला आहे. या माध्यमे मोठया प्रमाणावर राजकीय ज्ञान व राजकीय चेतना पुरवितात. या संसूचन माध्यमाच्या संपर्कात असणाऱ्या व्यक्तींचा सहभाग इतरांपेक्षा जास्त असतो. शहरी भागात या माध्यमाचे मोठया प्रमाणात जाळे असल्यामुळे शहरी भागाचा ग्रामीण भागापेक्षा राजकीय सहभाग जास्त असतो. ज्या घरात राजकारणावर गप्पा होतात किंवा राजकीय सहभागाला पोषक वातावरण असते. त्या कुटुंबातील मुलांचा राजकीय सहभाग जास्त असतो. म्हणून अशिक्षित कुटुंबापेक्षा शहरी कुटुंबाचे राजकीय सहभागाचे प्रमाण जास्त असते. म्हणून अनेक राजकीय चळवळीचा जन्म शहरात झालेला

दिसतो. सामाजिक कार्यात रस असणाऱ्या व्यक्ती राजकारणात अधिक क्रियाशील असण्याची शक्यता असते. विल्यम अेर्वे यांनी राजकीय सहभागविषयक अभ्यासात असे दिसून आले की संस्था किंवा संघगटातील सहभाग हा राजकीय सहभागामागील महत्त्वाचा घटक आढळून आलेला होता.

२) **व्यक्तिची वैयक्तिक गुण वैशिष्टये-** व्यक्तीचा राजकीय सहभाग हा तिच्या स्वभाव आणि मनः स्थितीचा व्यक्त अविष्कार असतो. समाजातील विविध स्तरात किंवा भागात कोणत्या प्रकारच्या स्वभावाच्या व्यक्तीचा कितपत भरणा आहे यावर त्या समाजाच्या राजकीय सहभागाचे प्रमाण अवलंबून असते. व्यक्तीचे ज्ञान, दृष्टिकोन व तिचे व्यक्तिमत्व यावर त्या व्यक्तीचा राजकीय सहभाग अवलंबून असतो. व्यक्तीचा स्वभाव अहंकारी, आंतरमुख आहे की समाजभिमुख, उमदया स्वभावाची आहे यावर व्यक्तीचा राजकीय सहभागाचे प्रमाण ठरत असते. व्यक्ती जर अहंकारी व आंतरमुख स्वभावाची असेल तर तिचा राजकीय सहभाग कमी असतो कारण अहंकारी स्वभावाच्या व्यक्तीना फार मित्र नसतात तसेच त्यांचा घराबाहेरील कार्यात सहभाग व वावर अत्यंत कमी असल्यामुळेही त्यांचा राजकीय सहभागाचे प्रमाण कमी असते. याउलट चार चौघात मिसळणाऱ्या वा उमदया स्वभावाची असेल तर ती व्यक्ती मोठया प्रमाणावर कुटुंबाबाहेरील कार्यात सहभागी होते. त्यातून त्यांचा स्वतःविषयी आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे त्यांचा राजकीय सहभाग जास्त वाढतो. कारण व्यक्तीचा स्वभाव हा व्यक्तीची भूमिका ठरवत असल्याने राजकीय सहभागाचे प्रमाण ठरविण्यातही व्यक्ती स्वभावाचा मोठया प्रमाणात कारणीभूत मानला जातो.

३) **व्यक्तीची सामाजिक गुण वैशिष्टये-** व्यक्तीच्या व्यक्तीगत गुणवैशिष्टयांप्रमाणे तिची सामाजिक गुणवैशिष्टये राजकीय सहभागाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असतात. समाजप्रिय किंवा मोकळया स्वभावाच्या व्यक्तीचा राजकीय सहभाग जास्त अशू शकतो. व्यक्ती सामाजिक कार्यात भाग घेते किंवा नाही यावरही राजकीय सहभाग अवलंबून असतो. बऱ्यादा व्यक्ती सामाजिक कार्यातून राजकारणात भाग घेते. व्यक्ती समाजभिमुख असेल मात्र समाजात अनुकूल वातावरण वा परिस्थिती नसेल तर राजकीय सहभाग कमी होतो. उदा. भारतात स्त्रियांनी राजकारणात भाग घेऊ नये ही विचारसरणी असल्यामुळे राजकारणात स्त्रियाचा सहभाग कमी दिसतो. समाजाकडून प्रोत्साहन मिळत असेल तर व्यक्ती राजकारणात सहभागी होते पण प्रेरणा मिळत नसेल तर व्यक्ती राजकारणापासून दूर राहते. अभ्यासकांना व्यक्तीचे सामाजिक स्थान आणि दर्जा यांचाही राजकीय सहभागावर परिणाम करतो हे आढळून आलेले आहे. उच्च सामाजिक स्थान व उच्च सामाजिक दर्जा असणाऱ्या व्यक्तीचा राजकीय सहभाग जास्त असतो. उच्च शिक्षण, उत्पन्न व व्यावसायिक दर्जा असणाऱ्या व्यक्तीचा राजकीय सहभाग जास्त असतो. समाजातील विविध गटांची किंवा समाजाची काही सर्वसाधारण वैशिष्टये असतात व ती त्या गटातील बहुसंख्य लोकांत दिसून येतात त्याचाही राजकीय सहभागावर परिणाम होता उदा. भारतात हिंदू व मुस्लिम गटांच्या राजकीय प्रवृत्तीत फरक असल्यामुळे राजकीय सहभागाच्या प्रमाणातही फरक आढळतो.

४) **राजकीय व्यवस्थेचे स्वरूप-** राजकीय व्यवस्थेचे स्वरूप व व्यवस्थांतर्गत एकूण परिस्थिती यांचाही व्यक्तीच्या राजकीय सहभागावर परिणाम होता. व्यक्ती ज्या राजकीय व्यवस्थेत जीवन जगत असते. त्या व्यवस्थेच्या स्वरूपावर राजकीय सहभाग अवलंबून असतो. लोकशाही व्यवस्थेत राजकीय सहभागाला उत्तेजन दिले जाते. त्यामुळे लोकशाहीच्या विकासाबरोबर राजकीय सहभागाचे प्रमाणही वाढत जाते.लोकशाही शासन पद्धती जनतेला मुक्त राजकीय सहभाग संधी असते. त्यामुळे लोक राजकारणात मोठया प्रमाणावर सहभागी होतात. हुकूमशाही व साम्यवाद असेल तर राजकीय सहभागातून बंदी असते. म्हणून लोक राजकारणापासून अलिप्त असतात. संघराज्य पद्धतीत ग्राम पातळी पासून देश पातळी पर्यंत सतत निवडणूका चालू असतात. सत्तेची अनेक पदे असतात. त्यामुळे अनेक लोकांना राजकारणात सहभागी होण्याची जास्त संधी मिळते. सार्वमत, प्रतिनिधी परत बोलविण्याचा अधिकार इ प्रत्यक्ष लोकशाही साधनाचा वापर ज्या राजकीय व्यवस्थेत होत असतो तेथे राजकीय सहभागाचे प्रमाणात मोठया प्रमाणावर वाढल्याचे आढळून आलेले आहे. लोकशाही व्यवस्थेच्या जागी अचानक सर्वंकष व्यवस्था आल्यास राजकीय सहभागावर प्रामुख्याने गुणात्मक परिणाम होता. कारण सर्वंकष व्यवस्थेत

लोकशाहीसारख्या राजकीय सहभाग मुक्त नसतो उलट राजकीय सहभाग नियंत्रित केला जातो. मर्यादित लोकांना राजकीय सहभाग दिला जातो.

५) **वर्गांवर आधारित राजकीय पक्ष-** वर्ग म्हणजे पैसा व प्रतिष्ठाच्या आधारावर समाजात निर्माण होणारे गट होय. आर्थिक हितसंबंध हा या वर्गाचा पाया असतो. समाजात तीव्र स्वरूपाचे वर्गभेद असतील तर वर्गावर आधारित राजकीय पक्ष व दबाबगट निर्माण होतात. अशा पक्षामुळे कनिष्ठ वर्गीयांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण वाढते. उदा. मुंबईला डॉ. दत्ता सांमत यांच्या नेतृत्वाखाली गिरणी कामागारांचा प्रदीर्घ संप झाला. या संपात कामागारात वर्गभावना निर्माण करण्यासाठी डॉ.सांमतानी कामगाराचे राजकीय शिक्षण घडवून आणले. वर्गावर आधारित दबाबगट निर्माण होतात. तेव्हा आर्थिक प्रश्नासाठी सर्व लोक एकत्र येतात व त्यामुळे राजकीय सहभाग होतो. उदा. साम्यवादी विचारधारेवर विश्वास ठेवणारे कम्युनिस्ट पक्ष आर्थिक प्रश्नावर श्रमिकांना जागृत करतात त्यातून श्रमिकांचा राजकीय सहभाग वाढतो.

६) **प्रादेशिकता-** प्रांतिक भेद वा प्रांतावर होणाऱ्या अन्यायकारक घटनातूनही राजकीय सहभाग वाढल्याची उदाहरणे आहेत. उदा. आंध्रप्रदेश राज्यात तेलंगणा प्रांत मागासलेला राहिल्याने वेगळया तेलंगणा राज्याची मागणी पुढे आली त्याकाळात त्या प्रदेशातील लोकांचा राजकीय सहभाग वाढलेला होता. काही वेळेस प्रादेशिक प्रश्न निर्माण होतात. प्रादेशिक प्रश्न लोकांच्या आक्षा-आकांक्षा वाढवणारे असतात. आपल्या प्रदेशाला राजकीय दर्जा मिळाल्यास आपली भाषा व संस्कृतीला महत्त्व प्राप्त होईल, रोजगार वाढेल असा विचार मांडता जातो. त्यामुळे लोकांचा राजकीय सहभाग अचानक वाढतो. उदा. धुळे जिल्हाचे विभाजन करून नंदुरबार जिल्हा निर्माण करतात. दोंडाईचा व पिपळनेर या गावांनी तालुक्याची मागणी केली त्यामुळे गावातील जनतेचा राजकीय सहभाग वाढला.

७) **शिक्षण, उत्पन्न, लिंग व वय-** देशात शिक्षणाचे प्रमाण जास्त असेल तर राजकीय सहभाग वाढतो. सुशिक्षित लोक राजकारणात मोठया प्रमाणात सहभागी होतात. त्यांच्याकडे राजकारणाबद्दलचे आवश्यक ज्ञान असल्याने त्यांचा सहभाग क्रियाशील स्वरूपाचा असतो. उच्च उत्पन्न गटातील लोकांचा उपजीवकेची फारशी चिंता नसते तसेच त्यांच्याकडे भरपूर मोकळा वेळ असल्याचे त्यांचा राजकीय सहभाग जास्त असतो. वयावरही राजकीय सहभाग अवलंबून असतो. समाजात तरूणांचे प्रमाण जास्त असेल तर त्यांचा राजकारणात जास्त सहभागी असतो. तरूण शारीरिक व मानसिक दृष्टया कणखर आणि उत्साही असल्याने वयोवृद्ध व्यक्तीपेक्षा त्यांचा सहभाग जास्त असतो. लिंगाचा राजकीय सहभागावर परिणाम होतो. स्त्रियाचा पुरूषापेक्षा राजकीय सहभाग कमी असतो. समाजात राजकारण हे क्षेत्र स्त्रियासाठी योग्य नाही हा समज असल्याने स्त्रिया राजकारणापासून अलिप्त राहणे पसंत करतात त्यामुळे त्यांचा सहभाग पुरूषांपेक्षा कमी असतो.

८) **तात्कालिक घटना-** राजकारणात काही घटना अचानक घडतात त्याचा समाजावर खोलवर परिणाम होतो. भारतात बाबरी मशिदीचे पतन ही घटना घडली. या घटनेमुळे हिंदू-मुस्लिम परस्परांच्या विरोधी गेले. या घटनेनंतर दोन्ही समाजातील लोकांनी वरचढ ठरण्याच्या भावनेतून राजकीय सहभाग वाढविला.

९) **मतदानविषयक अटी-** मतदान विषयक अटींचाही राजकीय सहभागावर परिणाम होता. सुरूवातीच्या काळात मतदानासाठी शिक्षण व संपत्तीची अट असल्यामुळे मर्यादित लोकांना मतदानाचा अधिकार असल्यामुळे इतरांचा राजकीय सहभाग शून्य स्वरूपाचा होता. विसाव्या शतकाच्या आधी कोणत्याही देशात स्त्रियांना मतदानाचा अधिकार नसल्यामुळे त्यांचा राजकीय सहभागही शून्य स्वरूपाचा होता. मात्र आधुनिक काळात प्रौढ मताधिकाराचे तत्त्व बहुसंख्य देशांनी स्वीकारलेले असल्यामुळे राजकीय सहभागाचे प्रमाण वाढलेले आहे.

**टिप- राजकीय सहभागाचे प्रकार वा वर्गीकरण-** राजकीय सहभागाचे असंख्य प्रकार आहेत. त्यांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न अनेक विचारवंतांनी केलेले आहेत. लेस्टर मिलबॅथ यांनी पोलिटिकल पार्टिसिपेशन ग्रंथात ग्लॅडिएटर, ट्रान्झिशनल, स्पेक्टेटोरियल अशा तीन प्रकारात वर्गीकरण केलेले आहे. या शिवाय विविध अभ्यासकांनी राजकीय सहभागाचे जे वर्गीकरण केलेले आहे. त्या आधारावर राजकीय सहभागाचे पुढील प्रकार पाडता येतात.

१) **संघटित आणि असंघटित राजकीय सहभाग-** काही लोक राजकारणात संघटित साधनाच्या माध्यमातून सहभागी होतात. राजकीय पक्षाच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेत आणि संघर्षात्मक मुद्यांवर जो सांघिक सहभाग असतो. तो संघटित स्वरूपाचा असल्याने त्यास संघटीत राजकीय सहभाग असे म्हणतात. उदा.राजकीय पक्षाचे क्रियाशील सदस्य होऊन सहभाग दाखविणे.तर काही लोक असंघटित स्वरूपात राजकीय सहभाग दाखवितात. अनौपचारिक राजकीय चर्चा करणे, मंत्र्याना निवेदन देणे, सभा परिषदांमधील उपस्थिती, राजकीय बातम्याचे सामूहिक वाचन या कृती सांघिक स्वरूपाच्या वाटत असले तरी असंघटित असतात.

२) **गुप्त आणि खुला राजकीय सहभाग-** काही लोक राजकारणात गुप्तपणे भाग घेतात. सर्वंकष व्यवस्थेत खुल्या सहभागाची शक्यता मर्यादित असते. जनतेवर असलेल्या निर्बंधाचा विचार करता जनता छुप्या व गुप्त पद्धतीने राजकीय सहभाग नोंदवितात. लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये राज्यकर्त्यांनी सत्ताभिलाषेपोटी आणीबाणी जाहीर करून हुकूमशाही राजवट लोकांवर लादलेली असते तेव्हा खुला सहभाग शक्य नसल्याने राजकीय कार्यकर्ते आणि जनता भूमिगत मार्गाचा अवलंब करून जगजागृतीचे कार्य करतात. म्हणजे एका अर्थाने गुप्त राजकीय सहभाग घेतात. उदा. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधीच्या पराभवासाठी लोक गुप्तपणे प्रचार करीत असत तर काहीचा सहभाग खुला स्वरूपाचा असतो. लोकशाही व्यवस्थेमध्ये राजकीय सहभागाचा अधिकार नागरिकांना दिलेला असतो. राजकीय सहभागासाठी मोठया प्रमाणावर उत्तेजन दिले जाते. त्यात निवडणुका लढविणे, पक्षाचे बॅनर लावणे, पक्षासाठी निधी गोळा करणे इ.गोष्टीचा समावेश खुल्या राजकीय सहभागात होतो.

३) **कायमस्वरूपी व तात्पुरता राजकीय सहभाग-** समाजातील सर्व लोकांचा राजकीय सहभागाचे प्रमाण सारखे नसते. राजकीय सहभाग काहीचा विशिष्ट काळापुरता मर्यादित असतो. निवडणुकीच्या काळात राजकीय वातावरण तापलेले असल्यामुळे त्या काळापुरते लोक राजकारणात सक्रिय होतात इतर काळात राजकारणापासून अलिप्त राहतात त्यास तात्पुरता राजकीय सहभाग असे म्हणतात. उदा. निवडणुकीचा काळात उमेदवाराचा प्रचार करणे, राजकीय सभेस उपस्थित राहणे तर काही लोकांचा राजकारण हा व्यवसाय असल्यामुळे आयुष्यभर ते राजकारणात सक्रिय असतात. राजकारणात कायमस्वरूपी व्यस्त असलेल्या लोकांचा राजकीय सहभाग हा कायमस्वरूपी राजकीय सहभागात मोडणारा असतो. उदा.शरद पवार, सोनिया गांधी यासारखे नेते आयुष्यभर राजकारणात सक्रिय असतात.

४) **सहेतूक आणि निहेतूक राजकीय सहभाग-** राजकीय सहभाग घेण्यामागे काही लोकाचा विशिष्ट हेतू असतो. उद्देश डोळयासमोर ठेवून महत्त्वाकांक्षी पद्धतीने राजकीय वाटचाल करणाऱ्या लोकांचा राजकीय सहभाग हा सहेतूक स्वरूपाचा असतो. उदा. पक्षाचे तिकिट मिळविण्यासाठी, पद वा सत्ता मिळविण्यासाठी दाखविलेला सहभाग सहेतूक असतो. याउलट राजकीय उत्तरदायित्वाची भावनेने कार्य करणारे नागरिक स्व-इच्छेने राजकारणात सक्रिय होतात. एखादया पक्षाचे तत्त्वज्ञान आवडले व मतदान करणे ही आपली जबाबदारी आहे. या भावनेने घेतलेला सहभाग निहेतूक असतो. निहेतूक राजकीय सहभागात कोणत्याही प्रकारची राजकीय महत्त्वाकांक्षा मनात न बाळगतात. उदा. निवडणुकीच्या काळात अनेक समाजसेवक जनतेने मतदानात सहभाग घ्यावा म्हणून आवाहन करतात. अशा प्रकारचे आवाहन करणे म्हणजे निहेतूक राजकीय सहभागाचे मानता येईल.

५) **संमतिदर्शक व विरोधदर्शक राजकीय सहभाग-** एखादा राजकीय नेता किंवा शासकीय धोरण व निर्णयाला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी लोक जो सहभाग करतात तो संमतिदर्शक राजकीय सहभाग मानता येईल. उदा. नेत्यांचे वाढदिवस साजरे करणे, नेत्यांच्या समर्थनार्थ मोर्चा आयोजित करणे काही लोक शासकीय धोरणाच्या विरोधात मोर्चे, निदर्शने, उपोषणे, धेराव इत्यादी मार्गाचा अवलंब करून प्रस्थापित व्यवस्थेविरोधात असंतोष व्यक्त करतात या सहभागाला विरोधदर्शक राजकीय सहभाग असे म्हणतात. विरोधदर्शक राजकीय सहभागाच्या रूपांतर क्रांती होण्याची शक्यता असते. म्हणून राज्यकर्ता वर्ग आश्वासने, घोषणा व आवाहनाचा वापर करून विरोधदर्शक सहभागाचे रूपांतर संमतिदर्शक राजकीय सहभागाचे करण्याचे प्रयत्न करतात. कधीकधी बळाचा वापर करूनही हा सहभाग मोडून टाकण्याचाही प्रयत्न केला जातो.

**राजकीय सहभागाच्या पातळया-** लोकांचा राजकीय सहभागा विविध पातळीवर असतो. राजकीय सहभागाच्या पातळयाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न अनेक संशोधकांनी केलेला दिसतो. व्यक्तीचा राजकीय सहभाग कोणकोणत्या पातळयावर असतो. त्या पातळया दाखविणाचा प्रयत्न रूश व ॲल्थॉफ या विचारवंतांनी ॲन इन्ट्रोडक्शन टु पोलिटिकल सोशालॉजी ग्रंथात पुढील आकृतीबंधाच्या आधाराने राजकीय सहभागाच्या पातळया दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. रूश आणि अल्थॉफ यांनी राजकीय किंवा प्रशासकीय पद धारण करणे या सर्वात वरिष्ठ पातळीवरील राजकीय कृतीपासून संपूर्ण उदासिनता दाखविणे या तळपातळीपर्यंत राजकीय सहभागाचे एकूण ११ प्रकार खालील आकृतीबंधात दाखविले आहेत.



राजकीय वा प्रशासकिय पद भुषविणे

राजकीय पद प्राप्तीसाठी प्रयत्न करणे

राजकीय संघटनेचे क्रियाशील सदस्य
राजकीय संघटनेचे सामान्य सदस्य
निम राजकीय संघटनेचे क्रियाशील सदस्य
निम राजकीय संघटनेचे सामान्य सदस्य
राजकीय सहभाग मोर्चे, निर्देशनात सहभाग
औपचारिक राजकीय चर्चत सहभाग
मतदान करणे

संपूर्ण राजकीय उदासिनता

रूश व अल्थॉफ यांनी दिलेल्या आकृतीबंधा वरून राजकीय सहभागाच्या पातळया समजू शकतात. ही आकृती सर्व व्यवस्थाच्या विश्लेषणासाठी उपयुक्त ठरू शकते. अर्थात या आकृतीबंधात दाखविलेल्या पातळया वेगवेगळया व्यवस्थेत कमी अधिक महत्त्वाच्या अशू शकतात. या आकृतीत सर्वात वरच्या पातळीवर राजकीय पद भूषविणारे असल्याने त्यांना जास्त महत्त्व असते. त्यानंतर पद मिळविण्यासाठी प्रयत्न करणारे आणि राजकीय पक्ष व दबाबगट सदस्यांचा क्रम लागतो. राजकीय सहभाग घेणारी व्यक्ती आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी कोणत्या तरी गटात सहभागी होऊन हितसंबंध सुरक्षित राखते. काही लोक राजकारणापासून दूर राहतात. त्यांचा समावेश उदासिनता या टप्यात होतो. या आकृतीत खालून वर जातांना राजकीय सहभागाचे प्रमाण कमी होते आणि वरून खाली येताना सहभागाचे प्रमाण वाढत जाते. राजकीय सहभागाच्या ज्या ११ पातळया या आकृतीत आहेत या सर्व व्यवस्थेत या प्रकारच्या असतील असे नाही. व्यवस्थागणिक व काळानुसार त्यात फेरबदल होतील म्हणून आकृतीबंध आदर्श स्वरूपाचा आकृतीबंध मानता येईल.



सत्ताधीश
सत्ता मिळवू पाहणारे
राजकीय दृष्टया जागृत
राजकीय दृष्टया उदासिन

रॉबर्ट ढालने वरील आकृतीबंधाच्या सहाय्याने राजकीय सहभागाच्या पातळया दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात रूश आणि अल्थॉफ प्रमाणे मर्यादित प्रमाणात त्यांनी राजकीय सहभागाच्या पातळया दाखविलेल्या आहेत. रॉबर्ट ढाल यांनी निर्णय प्रक्रिया व राजकीय सहभाग घेण्यासाठी चार गोष्टीची आवश्यकता सांगतो. आवड, संबंध, माहिती व क्रियाशीलता इ.गोष्टी होय. राजकीय सहभागाच्या पातळया अभ्यास करतांना राजकीय सामाजीकरणाची प्रक्रिया समजून घ्यावी लागते. कारण सामाजीकरणातून व्यक्तीच्या भूमिका निश्चित होतात. त्यातून व्यक्तीचा राजकीय सहभाग घडतो.

**टिप- राजकीय सहभागाची प्रमाणभिन्नता-** समाजाच्या विभिन्न घटकांमध्ये राजकीय सहभागाचे प्रमाण कमी-जास्त असते. सहभाग सुलभता, साधनसंपन्नता, फुरसत, सामाजिक धारणा, व्यक्तिगत क्षमता, सहभागावरील शासकीय निर्बंधाचा अभाव, सहभाग पातळी इत्यादी अनेक घटकांवर राजकीय सहभागाचे प्रमाण अवलंबून असते. राजकारण हे गलिच्छ व धकाधकीचे क्षेत्र असल्याने स्त्रियांनी त्यात भाग घेऊ नये ही भावना समाजात दृढमूल झाल्याने पुरूषांपेक्षा स्त्रियाचा राजकीय सहभाग कमी असतो. अशिक्षितापेक्षा सुशिक्षितांमध्ये, ग्रामवासियापेक्षा शहरी लोकांचा, वृद्धापेक्षा तरूणांचा राजकीय सहभाग जास्त असतो हे अनेक अभ्यासकांच्या निदर्शनात आलेले आहे. अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि मानसिक कारणाच्या प्रभावातून व्यक्तीचा राजकीय सहभाग कमी जास्त असू शकतो. राजकीय सहभाग संकल्पना अत्यंत गुंतागुंतीची असल्याने एस.एम. लिपसेट यांनी पोलिटिकल मॅन ग्रंथात मतदानात्मक राजकीय सहभागाचा प्रमाणातील फरक स्पष्ट करण्यासाठी पुढील तक्ता दिलेला आहे.

| अ.क्र | मतदान प्रमाण जास्त | मतदान प्रमाण कमी |
|---|---|---|
| १ | जास्त उत्पन्न | कमी उत्पन्न |
| २ | जास्त शिक्षण | कमी शिक्षण |
| ३ | उद्योगपती | अकुशल कामगार |
| ४ | कार्यालयीन कर्मचारी | घरचाकर |
| ५ | सरकारी अधिकारी | सेवा-चाकर |
| ६ | नगदी पिके घेणारा | अन्नधान्य पिकविणारा |
| ७ | संघटित समाजगट | असंघटित समाजगट |
| ८ | गोऱ्या वर्णाचे | काळया वर्णाचे |
| ९ | विवाहित | अविवाहित |
| १० | पुरूष | स्त्रिया |
| ११ | मध्यवयीन गट (वय वर्ष ३५ ते ५५) | तरूण किंवा वृद्ध वयोगट (३५ पेक्षा कमी व ५५ पेक्षा जास्त) |
| १२ | जुने रहिवासी | नवागत रहिवासी |
| १३ | आपत्कालीन स्थिती | सर्वसाधारण स्थिती |

यावरून समाजातील विविध घटकांत मतदानातील सहभागात तफावत दिसून येते. उच्च शिक्षित, संघटित वर्ग, उच्च वर्गातील लोकांचा मतदानातील प्रमाण जास्त आहे. राजकीय सहभागाचा सर्वात सोपा प्रकार मतदानाचा असतो. या प्रकारातून राजकीय सहभागाची प्रमाणभिन्नता लक्षात येते.

**टिप- राजकीय उदासीनता-** (Political Apathy)

काही लोक राजकीय प्रक्रियामध्ये सहभागी होतात. काही लोक राजकारणात सहभागी होत नाही. त्यांचा समावेश राजकीय उदासीनता घटकात करता येतो. उदासीनता याचा अर्थ व्यक्तीला एखादया राजकीय कृती, राजकीय व्यक्ती आणि राजकीय प्रकरणाबद्दल सामान्यता रस नसणे होय. उदासीनतेचे प्रमाण कमी जास्त असू शकते. एकच व्यक्ती काही बाबतीत उदासीन असू शकते तर काही बाबतीत सक्रिय सहभागी होऊ शकते. राजकीयदृष्टया सक्रिय असलेली व्यक्ती राजकारणातील विदारक अनुभवामुळे देखील उदासीन बनू शकते. उदासीनता सर्व समाजाच्या किंवा एखादया घटनेच्या दृष्टीने लक्षात घेतली जाते. उदासीनतेचा संबंध व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाशी जोडला जातो. समाजशास्त्रज्ञ उदासीन असणारे आणि उदासीन नसणारे हे दोन गट करतात. व्यक्ती उदासीन का राहते. व्यक्ती स्वतःची जबाबदारी ओळखण्यास असमर्थ असणे, स्वतःच्या भावना न समजणे, चिंताग्रस्त असणे, आत्मविश्वासाचा अभाव, राजकीय सहभाग संधी व प्रेरणाचा अभाव इ.गोष्टीमुळे व्यक्ती उदासीन राहते. याउलट उदासीन नसणाऱ्या व्यक्ती स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असणे, स्वतःच्या जबाबदारीची जाणीव असणे, राजकीय सहभागाची संधी व प्रेरणा इ.गुणाचा प्रभाव आढळतो. दोन्ही गटापैकी उदासीन असलेला गट राजकारणा पासून दूर राहतो. मॉरिश रोशनबर्गने राजकीय उदासीनतेची पुढिल तीन कारणे सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे होत.

१) **राजकीय कृतीच्या परिणामांची भीती-** राजकीय कृतीत भाग घेतल्याने काय परिणाम होतील याची जाणीव व्यक्ती मध्ये अनेक आकार धारण करते. राजकारणात भाग घेतल्यास जिवाला धोका, मित्रमंडळी व शेजारी गमाविण्याचा धोका, नोकरीवर गदा, विरोधी पक्षाचा त्रास, व्यवसायाचे नुकसान, वैवाहिक संबंधात दुरावा, स्वतःची प्रतिष्ठेला धक्का इ. उलट सुलट दडपणामुळे व्यक्ती राजकीय सहभागापासून दूर राहते.

२) **राजकीय कृतीची निष्फळता-** काही व्यक्तीच्या बाबत राजकीय सहभाग निरर्थक असतो. आपण सहभागी झाल्याने राजकीय प्रक्रियेवर काहीही परिणाम करू शकणार नाही. प्रत्यक्ष व्यवहारवाद व आदर्शवाद यातील तफावत आपल्याकडून दूर होणार नाही. राजकीय दृष्टया क्रियाशील राहूनही फायदा मिळण्याची किंवा स्वतःचा उद्देश साध्य होण्याची अशा वाटत नाही. आपण सहभागी झाल्याने काही फायदा होणार नाही हे व्यक्तीला वाटल्याने तो राजकीय दृष्टया उदासिन बनतो. लोकप्रतिनिधी लक्ष देत नाही किंवा राजकीय यंत्रणा कुचकामी या निकामी बनली आहे, अशी भावना व्यक्तीच्या मनात निर्माण झाल्यास व्यक्ती उदासीन बनते.

३) **राजकीय सहभाग प्रोत्साहन अभाव-** काही लोकांना राजकीय सहभागासाठी प्रेरणा मिळत नाही. तसेच राजकारणात भाग घेतल्याने लाभ वा समाधान मिळण्याची शक्यता नसते. भौतिक गरजा पूर्ण होणार नाहीत म्हणून व्यक्ती राजकारणापासून दूर राहते.

याशिवाय पर्याप्त माहितीच्या अभावी देखील काही लोक राजकीय प्रक्रियामध्ये सहभागी होत नाही. उदा. निरक्षर, एकाकी लोक व्यक्तीपाशी राजकीय सहभागासाठी आवश्यक क्षमताचा अभाव असल्यामुळे ते राजकीयदृष्टया उदासीन राहतात. काही लोकांकडे क्षमता असूनही जाणीवपूर्वक उदासीन राहून राजकीय सहभाग टाळतात. राजकीय सहभागातून मिळणाऱ्या लाभापेक्षा इतर क्षेत्रातून मिळणारे लाभ जास्त असतील तर काही व्यक्तीमध्ये राजकीय आत्मक्षमतेची भावना क्षीण असल्याने प्राप्त परिस्थितीत बदल होण्याची अजिबात शक्यता वाटत नाही, काही व्यक्ती राजकीय व्यवस्थेच्या कार्याविषयी असंतुष्ट असतात, काही व्यक्तीची विचारसरणी राजकीय सहभागाच्या विरोधी असते उदा. नक्षलवादी इत्यादी विविध कारणामुळे व्यक्ती राजकीय दृष्टया उदासीन राहत असते. राजकीय दृष्टया उदासीन वर्गाचे वाढते प्रमाण राजकीय व्यवस्थेच्या स्थैर्याच्या दृष्टीने योग्य नसते. मोठया प्रमाणात लोक राजकीय सहभाग घेत नसतील तर व्यवस्थेची अधिमान्यता धोक्यात येऊ शकते.

वरिल कारणामुळे व्यक्तीत राजकीय उदासिनता निर्माण होते.

**टिप- दौषकदृष्टी वा राजकीय अश्रद्धपणा-(Political Cynicism)**

दौषकदृष्टी ही एक वृत्ती असते. ती प्रत्यक्ष काम करण्याशी वा अलिप्त राहण्याशी संबंधित असते. राजकीय अश्रद्धपणा म्हणजे दुसऱ्याच्या हेतूबद्दल शंका असणे व समाजच स्वार्थी असतो अशी कल्पना बाळगून स्वतःपुरतेच पाहण्याची प्रवृत्ती असणे होय. राजकारण हे घाणेरडे असते किंवा राजकीय नेते विश्वासार्ह नसतात अशी मते या प्रवृत्तीची निदर्शक असतात. रॉबर्ट अँगरने राजकारणाकडे कुचेष्टेने पाहण्याची वृत्ती ही व्याख्या केली. वाढत्या शिक्षणाबरोबर ही भावना कमी होत जाते असे अँगरने अभ्यासात सिद्ध करून दाखविले आहे. व्यक्ती जितका राजकीयदृष्टया अश्रद्ध तितका राजकीय निर्णयावर प्रभाव टाकण्याचा आत्मविश्वास कमी असतो. आत्मविश्वासाच्या अभावातून व्यक्तीचा राजकीय सहभाग कमी होता. रॉबर्ट अँगरने राजकीय सहभाग व दौषकदृष्टीचे संबंध स्पष्ट केले. अमेरिकेतील डेमॉक्रेटिक व रिपब्लिक पक्ष समर्थकांचा अभ्यास केल्यानंतर डेमॉक्रेटिक पक्षातील लोकांत ही वृत्ती जास्त दिसून आली. उच्च उत्पन्न व उच्च शिक्षण घेणाऱ्या मध्ये ही दृष्टी कमी प्रमाणात दिसते. राजकारणावर आपण प्रभाव पाडू शकणार नाही ही भावना जशी-जशी वाढत जाते तसे-तसे दौषकदृष्टीचे प्रमाण वाढत जाते. त्यामुळे राजकीय सहभाग कमी कमी होत जातो. इतराच्या हेतूबद्दल शंका निर्माण होतात. आशावादापेक्षा निराशावाद वाढतो. त्यातून व्यक्तीचा राजकीय सहभाग कमी होतो. इंग्लंड देशातील दौषकदृष्टीचा अभ्यास केल्यानंतर पुढील निष्कर्ष निघालेले आहेत.

१) बहुतेक राजकारणी फक्त आश्वासने देतात ७८% लोकाचे मत आहे.
२) बहुतेक राजकारणी देशापेक्षा आपल्या पक्षाला जास्त महत्त्व देतात ६०% लोकाचे मत आहे.
३) बहुतेक राजकारणी फक्त आपला फायदा करतात ६७% लोकाचे मत आहे.
४) संसद सदस्य निवडल्यानंतर मतदारांना विसरतात ५५% लोकाचे मत आहे.

इंग्लंड सारख्या प्रगल्भ लोकशाही असलेल्या देशात दौषकदृष्टीचे प्रमाण बरेच आहे याचा परिणाम राजकीय सहभागावर झालेला दिसून येतो. दौषकदृष्टीमुळे लोक राजकारणात सहभाग घेत नाही. भारतातील राजकीय वर्तणूकविषयक अवलोकनात्मक अभ्यासात सिरसीकर यांनी मतदान न करणाऱ्या व्यक्तीचा समावेश तीन गटात केलेला आहे. राजकारणाविषयी चीड व आकस असणारा पहिला गट तर राजकीय नेतृत्व सत्तापिपासू आहे असे मानणारा दुसरा गट तर मतदानाविषयी माहिती नसलेला किंवा सामाजिक दृष्टया कनिष्ठ स्थानामुळे स्वतःबद्दल न्यूनगंड निर्माण झाल्यामुळे मतदानात सहभागी होत नाही हे तीन गट सांगितले. या पद्धतीने विविध कारणामुळे व्यक्तीत राजकीय अश्रद्धा निर्माण होते. या प्रवृत्तीमुळे व्यक्ती राजकारणापासून अलिप्त राहते.

**टिप- राजकीय अलगत्व वा विरक्ती- (Political Alienation)**

दौषकदृष्टीत राजकारणाबद्दल घृणा व नावडअसते तर विरक्ती मध्ये विरोध वा प्रत्यक्ष संघर्षाची भावना अस्तित्वात असते. रॉबर्ट लेनने विरक्तीची व्याख्या करतांना असे सांगता की,"विरक्तीच्या भावनेमुळे एकंदर राजकारणाविषयी दूरत्वाची भावना निर्माण होते राजकारण म्हणजे अयोग्य नियमांच्या आधारे इतरासाठी चालले कार्य होय. ते दुसऱ्याकडून व दुसऱ्यासाठी चालते व ते वाईट पद्धतीने चालते." ही भावना निर्माण होते. विरक्ती दौषकदृष्टीची पुढची पायरी आहे. अतिरेकी व जहाल विचारसरणीच्या लोकांमध्ये ही भावना मोठया प्रमाणावर आढळते. या लोकांना प्रस्थापित राजकीय व्यवस्था अमान्य असते. भारतात नक्षलवादी, अतिरेकी, जहाल धर्मांध प्रवृत्ती असलेल्या व्यक्तीत ही भावना आढळून येते. राजकीय अलगत्वामुळे व्यक्ती उदासीन बनू शकते त्यासोबत राजकीय दृष्टया अधिक क्रियाशील वा हिंसक बनू शकते. विल्यम कॉर्नहौसर अभ्यासकांने सामाजिक बदलातील शीघ्रता व हिंसकता, आणि राजकीय अतिरेकीपणा याचा संबंध दाखवून दिला आहे. वरिष्ठ स्तरापेक्षा कनिष्ठ स्तर हा जनता आवाहनास अधिक प्रतिसाद देतो. व्यक्तीचा सामाजिक संबंध जितका कमी तितका ती व्यक्ती जनता आवाहनास अधिक प्रतिसाद देते. त्यामुळे कॉर्नहौसर यांनी राजकीय अलगत्वाची भावना कमी करण्यासाठी सामाजिक संबंध सदृढ करण्याची शिफारश केलेली आहे. आल्मंड व व्हर्बा यांनी अमेरिका, जर्मनी, ब्रिटन, इटली व मॅक्सिको इ.देशाचा अभ्यास करून निष्कर्ष काढला की अमेरिकेत राजकीय अलगत्वाचे प्रमाण कमी दिसून येते तर

मॅक्सिको सारख्या देशात अधिक दिसून येते. शिक्षण, उत्पन्न यावरही विरक्तीचे प्रमाण ठरत असते. उच्च उत्पन्न व उच्च शिक्षण घेणा-यात राजकीय अलगत्वाचे प्रमाण कमी असते.

**टिप- अनास्था व प्रमाणक-हीनता-** (Political Anomic)

अनास्था शब्दाचा वापर सर्वप्रथम डरखिम यांनी केला. अनास्था संदर्भात राबर्ट लेन सांगतो की, अनास्थामुळे राजकारणा संबंधी एक प्रकारची गतीहिनता निर्माण होते. आपण राजकारणावर काहीही परिणाम करू शकत नाही. शासन आपल्यासाठी काहीही करू शकत नाही. ही भावना निर्माण होऊन राजकारणाविषयी उदासिनता व अनास्था निर्माण होते. प्रमाणहीनता असलेल्या व्यक्तीची वागणूक इतरांहून निराळया प्रकारची असू शकते. अधिकारी व्यक्ती वा शासन आपली दखल घेत नाही या भावनेने ध्येय व वागणूक मूल्यांवरील व्यक्तीची भावना कमी होऊन व्यक्ती कृतिहीन व निष्क्रीय बनत जाते. व्यक्तीत आग्रही किंवा अरेरावी प्रवृत्ती वाढत जाते. प्रमाणहीनकतेच्या भावनेतून व्यक्ती समाजापासून तुटकतेची भावना जाणवते. व्यक्ती व्यक्तिमत्त्वात गोंधळाची भावना निर्माण होते. त्यामुळे व्यक्ती राजकीय निर्णय घेण्याऐवजी तटस्थ राहणे पसंत करतो. वॉटसेन यांनी वंश, उत्पन्न व शिक्षण घटकांच्या आधारे अमेरिकेतील डेट्राईट शहरातील नागरिकाचा अभ्यास केला. या अभ्यासात निग्रोत अनास्थेचे प्रमाण ५३% तर श्वेत वर्णियात ३०% आढळले. उत्पन्नाच्या आधारावर उच्च वर्णियात २२% मध्यम वर्गात ३०% तर कनिष्ठ वर्गात ४७% बेकारात ५४% आढळले. शिक्षणाचा विचार करून महाविद्यालयीन शिक्षण घेण्यात ४५% आढळले याचा अर्थ जो वंश मागासलेला आहे. शिक्षणाचे प्रमाण कमी आहे त्या लोकात अनास्थेचे प्रमाण कमी दिसून येते.

राजकीय उदासीनता, राजकीय अश्रद्धपणा, राजकीय अलगत्व व राजकीय प्रमाणहीनता या भावना प्रत्येक राजकीय व्यवस्थेतील व्यक्तीमध्ये अस्तित्वात असतात. प्रत्येक राजकीय व्यवस्थेत त्यांचे प्रमाण कमी जास्त असते. राजकीय दृष्टया क्रियाशील व्यक्तीवरही त्यांचा प्रभाव पडत असतो. राजकीय उदासीनता म्हणजे राजकारणाबद्दल आवड नसणे तर राजकीय अश्रद्धपणा म्हणजे राजकारणाबद्दल अविश्वास व घृणा तर राजकीय अलगत्व म्हणजे राजकारणाविषयी तुटकता तर राजकीय प्रमाणहीनतेत व्यक्ती राजकीय दृष्टया गोंधलेली असते.

**टिप- हिंसा किंवा हिंसाचार-**

हिंसा हा देखील राजकीय दृष्टया उदासीन वर्गांचा महत्त्वपूर्ण मार्ग आहे. हिंसा मार्गाचा अवलंब सर्व पर्याय संपल्यानंतर केला जातो. प्रस्थापित व्यवस्था बळाचा वापर करत असेल तेव्हा प्रतिउत्तर म्हणून हिंसेचा आधार व्यक्तीकडून घेतला जातो. समाजव्यवस्थेपासून तुटकता वा अलगता बाळगणारे किंवा प्रस्थापित व्यवस्था मान्य नसणारे घटक हिंसेचा आधार घेतात. हिंसेचा आधार घेणारे व्यक्ती किंवा गट सर्व प्रकारच्या राजकीय सहभागाला विरोध करतात. उदा. भारतात नक्षलवादी निवडणुका व मतदानावर बहिष्कार टाकतात. जेव्हा सनदशीर मार्गान राजकीय सहभाग घेऊन एखादया प्रश्न सुटत नाही किंवा सनदशीर मार्गाने प्रश्न मांडून देखील शासन आपल्याकडे लक्ष देत नाही. अशा परिस्थितीत निराशेची भावना निर्माण होऊन माणूस हिंसेचा मार्ग स्वीकारतो. सनदशिर मार्गाने विद्यमान शासन व्यवस्था बदलणे शक्य नाही. ती बदलण्यासाठी दुसरा पर्याय म्हणून व्यक्ती हिंसेकडे वळतो. हिंसा वेगवेगळया मार्गाने प्रकट होते. राजकीय नेत्यावर हल्ला, शासकिय अधिकाऱ्यांचे अपहरण वा खून, सार्वजनिक ठिकाणी बॉम्बस्फोट, सरकारी मालमत्तेचे नुकसान इ.मार्गाचा अवलंब केला जातो. हिंसेच्या माध्यमातून होणारी परिवर्तने हुकूमशाही, साम्यवादी व नव्याने लोकशाही निर्माण झालेल्या देशात जास्त दिसून येतात. रसेल व त्यांच्या सहकाऱ्यांनी हिंसेचा तुलनात्मक अभ्यास करतांना पुढील निष्कर्ष काढले. ज्या देशात उत्पन्न पातळी खूप जास्त आहे तेथे हिंसेचे प्रमाण कमी असते. याउलट ज्या देशात उत्पन्नाचे प्रमाण मध्यम असते तेथे हिंसाचाराचे प्रमाण जास्त दिसते. हिंसा ही राजकीय विरक्तीचा अविष्कार मानली जाते.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

१. राजकीय सहभाग म्हणजे काय?
   उत्तर- मॅक्सोलीच्या मते शासकाच्या निवड प्रक्रियेत व सार्वजनिक धोरण निर्मिती प्रक्रियेत लोकांचा जो प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग असतो त्याला राजकीय सहभाग असे म्हणतात.

२. राजकीय सहभाग घडवून आणणारे दोन घटक कोणते?
   उत्तर- व्यक्तीला मिळणाऱ्या राजकीय चेतनेचे प्रमाण, व्यक्तीची वैयक्तिक व सामाजिक गुण वैशिष्टये आणि राजकीय व्यवस्थेचे स्वरूप इ. घटकावर राजकीय सहभाग अवलंबून असतो.

३. राजकीय सहभागाचे दोन प्रकार सांगा.
   उत्तर- राजकीय सहभागाचे संघटीत आणि असंघटीत राजकीय सहभाग, कायमस्वरूपी आणि तात्पुरता राजकीय सहभाग आणि गुप्त व खुला राजकीय सहभाग इ. प्रकार सांगता येतात.

४. राजकीय सहभागाच्या पातळया मांडणाऱ्या विचारवंताची नांवे लिहा.
   उत्तर- राजकीय सहभागाच्या पातळया रूश व अल्थॉफ आणि रॉबर्ट ढाल या विचारवंतानी मांडलेल्या दिसून येतात.

५. राजकीय उदासीनतेच्या कारणे सांगा.
   उत्तर- राजकीय कृतीच्या परिणामांची भीती, राजकीय कृतीची निष्फळता, राजकीय सहभाग प्रोत्साहन अभाव इत्यादी कारणामुळे व्यक्ती राजकीय दृष्टया उदासीन राहते.

६. रूश व अल्थॉफ यांनी कोणत्या ग्रंथात व किती राजकीय सहभागाच्या पातळया सांगितल्या आहेत.
   उत्तर- रूश व ॲल्थॉफ या विचारवंतांनी ॲन इन्ट्रोडक्शन टु पोलिटिकल सोशालॉजी ग्रंथात राजकीय सहभागाच्या ११ पातळया सांगितल्या आहेत.

७. राजकीय अश्रद्धपणा म्हणजे काय?
   उत्तर- राजकीय अश्रद्धपणा म्हणजे दुसऱ्याच्या हेतूबद्दल शंका असणे व समाजच स्वार्थी असतो अशी कल्पना बाळगून स्वत:पुरतेच पाहण्याची प्रवृत्ती असणे होय. राजकारण हे घाणेरडे असते किंवा राजकीय नेते विश्वासार्ह नसतात अशी मते या प्रवृत्तीची निदर्शक असतात. रॉबर्ट अँगरने राजकारणाकडे कुचेष्टेने पाहण्याची वृत्ती ही व्याख्या केली.

८. विरक्ती म्हणजे काय?
   उत्तर- रॉबर्ट लेनने विरक्तीची व्याख्या करतांना असे सांगता की,"विरक्तीच्या भावनेमुळे एकंदर राजकारणाविषयी दूरत्वाची भावना निर्माण होते राजकारण म्हणजे अयोग्य नियमांच्या आधारे इतरासाठी चालले कार्य होय. ते दुसऱ्याकडून व दुसऱ्यासाठी चालते व ते वाईट पद्धतीने चालते." ही भावना होय.

९. रॉबर्ट ढाल यांनी राजकीय सहभागाच्या किती व कोणत्या पातळया सांगितल्या आहेत.
   उत्तर- रॉबर्ट ढाल यांनी राजकीय सहभागाच्या चार पातळया सांगितल्या आहेत. त्यात सत्ताधीश, सत्ता मिळवू पाहणारे, राजकीय दृष्टया जागृत आणि राजकीय दृष्टया उदासीन या चार पातळया आहेत.

## प्रकरण २ रे

## राजकीय श्रेष्ठजन व राजकीय नेतृत्व

**प्र. १ ला. राजकीय श्रेष्ठजन म्हणजे काय ते सांगुन श्रेष्ठीजनाचे स्तर वा प्रकार स्पष्ट करा?**

राजकीय प्रक्रियेत सत्तास्थानी असणारा वर्ग अतिशय महत्त्वपूर्ण असतो. सत्तास्थानावरील व्यक्तींचा गट सत्ता कायम टिकविण्यासाठी प्रयत्नशील असतो. इतर व्यक्तींच्यावर हा गट हुकुमत गाजवतो व स्वतःच्या इच्छेनुसार समाजात मूल्यवाटप करण्याचा प्रयत्न करतो. समाजातील विविध गट आणि हितसंबंधी संघटना यांच्याशी संबंध ठेवून हा गट आपले जास्तीत जास्त प्रभुत्व निर्माण करत असतो. या वर्गास शासक वर्ग असे म्हणतात. प्रत्येक शासनव्यवस्थेत शासक व शासित असे दोन वर्ग अस्तित्वात असतात. शासकवर्गात काही थोडया व्यक्तीचा समावेश असतो. शासिताच्या पाठिंबावर किंवा आवश्यकता भासल्यास दंडशक्तीच्या जोरावर हा वर्ग सत्तेचा उपभोग घेत असतो. राजकीय व्यवस्थेत पदसोपान असते. या पदसोपानाच्या शिरोभागी राहून हा वर्ग सत्ता गाजवित असतो. कारण समाजात नेतृत्व आवश्यक व नैसर्गिक असते. हुशार व शूर व्यक्तीबद्दल समाजात आदराची भावना असते. म्हणजे नैसर्गिक गरजेतून राजकीयहेतूसाठी सत्ताधारी व सत्ताहीन असे दोन वर्ग निर्माण होतात. प्रत्येक राजकीय व्यवस्थेत सत्ता मूठभर लोकांच्या हाती असते. ज्या देशात लोकशाही असते तेथे देखील सर्व नागरिक सत्ता गाजवितात असे नाही म्हणजे प्रत्यक्ष सत्ता गाजविणारे थोडे लोक असतात अर्थात ते सर्वांच्या वतीने गाजवितात त्यांना श्रेष्ठीजन असे म्हणतात. प्रत्येक समाजात श्रेष्ठीजन संकल्पना कमी अधिक प्रमाणात आढळतात. या संकल्पनेचा संबंध नैसर्गिक व व्यावहारिक या दोन्ही गोष्टीशी निगडित आहे. निसर्गाला समता मान्य नाही. निसर्गाने प्रत्येकाला उपजत गुण दिले आहेत. ते सर्वांना सारखे मिळालेले नाहीत. बुद्धी, सौदर्य व शारिरीक क्षमता इ.बाबत नैसर्गिक विषमता जाणवते. परिणामी निसर्गाला विषमता मान्य आहे असा त्यांचा अर्थ होतो. यातून श्रेष्ठ व कनिष्ठ असे दोन वर्ग निर्माण होतात. प्रत्येक समाजात श्रीमंत गरिब, श्रेष्ठ कनिष्ठ, सत्ताधीश सत्ताहीन प्रत्येक व्यवस्थेत दिसून येतात.

**श्रेष्ठीजन व्याख्या वा अर्थ-**

१. **दुवर्जर-** श्रेष्ठीजन म्हणजे मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील सर्वाधिक कार्यक्षम वा कर्तृव्यवान व्यक्ती होय.
२. **रॉबर्ट ढाल-** राजकीय संघर्षाच्या निराकरणात ज्या विशिष्ठ लोकांच्या पसंतीनुसार सातत्याने निर्णय घेतले जातात अशा आकाराने लहान असलेल्या नियंत्रक गटास श्रेष्ठीजन म्हटले जाते.
३. **बटोमोर-** यांच्या मते, राजकीय सत्तेवर प्रभाव पाडणारा व सत्ता स्पर्धा किंवा सत्ता संघर्षात गुंतलेला असा व्यक्तींचा गट जो वर्ग असतो त्यापैकी विशिष्ट वेळी सत्तेचा प्रत्यक्ष वापर करणारा गट म्हणजे राजकीय अभिजनांचा गट होय.

वरील व्याख्याचा विचार करता असे दिसून येते की, प्रत्येक राजकीय व्यवस्थेत मूठभर लोकांचा एकजिनशी स्वरूपाचा गट वा वर्ग अस्तित्वात असतो. या वर्गाच्या प्रभावातून शासकीय धोरण, निर्णय आणि कार्यक्रम अंमलात आणले जात असतात. इतर लोकांपेक्षा त्यांच्या मताला जास्त महत्त्व असते. राजकीय व्यवस्थेत या गटांची मते ग्राहय धरले जातात.

**श्रेष्ठीजन, उदय वा सिद्धांत -**

राजकीय समाजात खरी सत्ता कोण गाजवितो या प्रश्नाचे उत्तर त्या समाजाच्या सहरचनेवर अवलंबून असते. सत्तेच्या सहरचनेवरून राज्यकर्ता गट व वर्ग कोणता हे शोधता येते. समाजात जो वर्ग सत्ता गाजवितो त्यास श्रेष्ठीजन असे म्हणतात. ज्या गटाजवळ सत्ता असते तो गट अल्पसंख्य असतो. श्रेष्ठीजन संकल्पनेबाबत काही विचारवंतांनी

सिद्धांत मांडलेले आहेत. पीटर बाखराख यांचा ' लोकशाहीकरणाचा सिद्धात' तर गेरंट पेरीचा ' राजकीय श्रेष्ठजन', बॉटो मोअर यांचे ' श्रेष्ठजन व समाज' तर रॉबर्ट ढालचा ' आधुनिक राजकीय विश्लेषण' या ग्रंथामध्ये श्रेष्ठीजन संकल्पनेचे वर्णन आहे. ह्या अभ्यासात दोन प्रकारची विचारसरणी आढळून येते. प्रथम प्रकारचे विचारंवत लोकशाही व्यवस्थेत श्रेष्ठीजन कोण असतात व त्याच्यावर कोणाचे नियत्रंण असते याचाच फक्त अभ्यास करतात. श्रेष्ठजनावर शासितांचे नियंत्रण मान्य करतात. शासितांनी शासकास अधिमान्यता दिली नाही तर श्रेष्ठीजनाची सत्ता प्रभावहीन बनते. प्रथम प्रकारचे विचारवंत वस्तुनिष्ठ पद्धतीने श्रेष्ठीजन संकल्पनेचा अभ्यास करतात.

दुसऱ्या प्रकारचे विचारवंत श्रेष्ठीजन संकल्पनेचा वस्तुनिष्ठरीत्या अभ्यास न करता श्रेष्ठजन सिद्धांतास समर्थन करून त्यांचे समर्थन करतात. हिटलरच्या माझा संघर्ष (Mein Campfe) या आत्मचरित्रात असे म्हणतो की, १०० मूर्ख माणसे एकत्र आणून देखील एक शहाणा माणूस बनविता येणार नाही. याचा अर्थ एका शहाण्या माणसाने १०० मुर्खावर राज्य करावे हा त्यांचा निसर्गदत्त अधिकार आहे. या सिद्धाताचा आधार फॅसिस्ट व नाझीझम यांनी घेऊन श्रेष्ठजनाचे समाज व्यवस्थेवर वर्चस्व निर्माण केले. हिटलरने या सिद्धांतास वंशवादाचा आधार दिला. या सिद्धांतास पॅरेटो यांनी 'मन व समाज' ग्रंथात उचलून धरला. मोस्का याच्या 'सत्तारूढ वर्ग' ग्रंथात त्याचे समर्थन केले आहे. रॉबर्ट मिचेल्स 'राजकीय पक्ष' आणि सी. राइट. मिल्स यांनी 'सत्तारूढ श्रेष्ठजन'ग्रंथात या सिद्धाचे समर्थन केले आहे. हे सर्व विचारवंत हिटलरच्या ग्रंथातील मतातून श्रेष्ठजन सिद्धांताचा जन्म झालेल्याचे मानतात. याचा अर्थ श्रेष्ठजन सिद्धांत लोकशाहीवादी आणि सर्वंकषवादी हे दोन गट निर्माण झालेले दिसतात.

**श्रेष्ठीजनवादाचे स्वरूप-** श्रेष्ठजनावादाच्या सिद्धांताचे अभ्यासकांच्या मताचा विचार करता असे दिसून येत की, समाजात एक असा अल्पसंख्य गट असतो. त्यांच्या हाती बुद्धी, सत्ता, संपत्ती, शिक्षण व प्रभाव एकवटला असतो. अल्पसंख्याक मूठभर लोकांची सामाजीक मिरासदारी प्रस्थापित होते. राज्यशास्त्र म्हणजे सत्ता कशी आकार घेते व विभागली जाते याचे अध्ययन असेल तर प्रत्यक्षात सत्ताधारक होण आहेत याचा अभ्यास करणे आवश्यक असते. म्हणून बहुतेक राज्यशास्त्राज्ञांनी समाजातील सत्ता संरचनेच्या सर्वसमावेशक अध्ययनाकडे लक्ष दिले आहे. त्यामुळे आपोआप श्रेष्ठीजनाच्या अध्ययनास महत्त्व प्राप्त झाले. मोस्काच्या मते, प्रत्येक समाजात राजसत्ता ही अल्पजन सत्ता असते. शासन प्रकार कोणताही असो सत्ता अखर मूठभर लोकांच्या हाती असते आणि ते समर्थनीय व समाजहितासाठी योग्य असते. सत्तेचे फार विस्तृत विभाजन होता कामा नये. लोकशाहीत श्रेष्ठजनांच्या हातात एकवटणे हे खरे असले तरी सत्तेच्या संगोपन व संरक्षणाची अंतिम जबाबदारी श्रेष्ठजनाकडे असते हे देखील तेवढेच महत्त्वपूर्ण आहे. पेरीच्या मते, श्रेष्ठजनवादाचा मुख्य गाभा म्हणजे प्रत्येक समाजात अल्पसंख्य गट समाज हिताचे महत्त्वपूर्ण निर्णय घेता. या निर्णयाची व्याप्ती मोठा असतो. त्याचा परिणाम अनेक लोकावर होता. याचा अर्थ राजकीय निर्णय कायदेमंडळ व शासकीय अधिकाऱ्याकडून घेतला जात नाही तर अल्पसंख्य गटाकडून घेतला जातो त्यास मोस्काने राजकीय वर्ग असे म्हटले आहे. या वर्गाला निवडणुकामुळे नव्हे इतर मार्गानी वर्चस्व मिळालेले आहे. मतदाराकडे जर कोणती सत्ता असेल तर ती निर्णय घेण्याची सत्ता नसून निर्णय कोणी घ्यावेत ही ठरविण्याची सत्ता असते असे श्रेष्ठजनवादी अभ्यासक मानतात. डार्विनच्या सिद्धांतानुसार सबलांनाच जगण्याचा अधिकार असतो. सर्वसामान्य जनहितासाठी राजकीय सत्ता मूठभर लोकांच्या हाती असते. जेथे लोकशाही असते तेथेही प्रत्यक्षात सत्ता मूठभर लोकांच्या हातात असते. लोकशाहीचा नुसता देखावा असतो हे सर्व व्यावहारिक दृष्टया योग्य असते.

**श्रेष्ठीजनाचे स्तर वा प्रकार-** श्रेष्ठीजनाचे अनेक प्रकार असतात. शासकीय श्रेष्ठीजन, बौद्धिक श्रेष्ठजन, औद्योगिक श्रेष्ठजन, राजकीय श्रेष्ठजन इत्यादी विविध प्रकारचे श्रेष्ठजन समाजात अस्तित्वात असतात. रॉबर्ट ढाल बहुलवादी श्रेष्ठजनाची संकल्पना मांडतो. या संकल्पनेत राजकीय श्रेष्ठीजन व वेगवेगळया व्यवस्थेतील श्रेष्ठीजनाचा समावेश होतो. बहुलवादी श्रेष्ठीजनाची संकल्पना मुक्त स्वरूपाची असून यात वेगवेगळया क्षेत्रातील श्रेष्ठीजनाचा समावेश होतो. बहुलवादी नमून्यात सत्ता जरी विशिष्ट श्रेष्ठजन गटाच्या हातात असली तरी त्या श्रेष्ठजन गटात इतरांना प्रवेश मिळविणे शक्य असते. या संरचनेत मुक्तद्वाराची असून इतरांचा प्रसंगानुसार समावेश होऊ शकत असल्यामुळे बहुलवादी हे नाव ढाल देता. याउलट सी.राइट मिल्स यांनी संघटित कट करणाऱ्या श्रेष्ठीजनाचा नमूना मानला आहे.

यात प्रामुख्याने बडे लष्करी अधिकारी, अंमलदार, उद्योगपती यांचा समावेश करतो. राजकीय श्रेष्ठीजन, आर्थिक श्रेष्ठीजन, बौद्धिक श्रेष्ठीजन, तंत्रज्ञ श्रेष्ठजन हे मोस्काच्या मते एकत्र येतात व निर्णय घेतात. त्यांच्या निर्णयाचा परस्परांवर परिणाम होत असतो. ढालच्या मते श्रेष्ठजनाचे हितसंबंध समान असतात तर मिलच्या मते समान नसतात या आधारावर समान हितसंबंध असलेले वा हितसंबंध नसलेले असे श्रेष्ठीजनाचे दोन प्रकार होऊ शकतात.

लांकशाही व श्रेष्ठीजन या दोहाचे संबंध विचारात घेण्यासारखे आहेत. अब्राहम लिंकनच्या मते लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही. ही अप्रत्यक्ष लोकशाहीची व्याख्या असली तरी अप्रत्यक्ष लोकशाहीत प्रतिनिधी निवडण्यासाठी निवडणुका आवश्यक असतात. आणि निवडणुका झाल्या तरी सत्ता शेवटी मुठभर लोकांच्या हातीच असते. तसेच निवडणुका कशा प्रकारे घडवून आणाव्यात, त्यांचा आपण सोयीस्कर उपयोग कसा करून घ्यावा ही व्यवस्थादेखील श्रेष्ठजनांच्या हातात असते. पॅरेटो समाजशास्त्राने Circulation of Elities म्हणजे श्रेष्ठीजनाचा सतत परिवर्तनाचा सिद्धात मांडला. या सिद्धातानुसार श्रेष्ठीजनाच्या दरबारात काहीचा नव्याने प्रवेश होतो तर काही निवडणुकीत अपयशी होऊन बाहेर फेकले जातात तर काही माणसे काळाच्या ओघात निष्क्रीय होऊन बाहेर पडतात.

रॉबर्ट ढॉल श्रेष्ठीजन संबंधी एक आकृतीबंध तयार करतो.




वरील आकृतीबंधानुसार सर्वच लोक राजकीय व्यवहाराबाबत जागृत असतात असे नाही. ज्यांना राजकीय जाणीवा आहेत त्याचा समावेश राजकीय लोकसंख्येत केला जातो. राजकीय वर्ग व श्रेष्ठीजन सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करतात. श्रेष्ठीजनाशी त्यांचे जवळचे संबंध असतात. म्हणून ते भावी राज्यकर्ते असतात. सर्वात वरती प्रत्यक्ष सत्ताधीश असतात. या आकृतीवरून आधारे समाजातील वेगवेगळया क्षेत्रामध्ये श्रेष्ठीजन कोण असू शकतात हे ठरविता येते. श्रेष्ठजनाचे खालील प्रकार आढळतात.

१. आर्थिक क्षेत्र- जमिनदार, भांडवलदार,सावकार
२. धार्मिक क्षेत्र- धर्मगुरू, पुरोहित, मुल्ला, पोप
३. सामाजिक क्षेत्र- जातीप्रमुख
४. शैक्षणिक क्षेत्र- उच्च शिक्षित, कुलगुरू
५. सांस्कृतिक क्षेत्र- नाटय, नृत्य व चित्रपट कलावंत, खेळाडू
६. तांत्रिक क्षेत्र- तंत्रज्ञ, संशोधक, शास्त्रज्ञ
७. लष्करी क्षेत्र- लष्करी अधिकारी

८. प्रशासकीय क्षेत्र- उच्च सनदी अधिकारी, न्यायाधीश

९. राजकीय क्षेत्र- आमदार, खासदार, मंत्री व उच्चपदस्थ नेते

अशाप्रकारे श्रेष्ठजन हे वेगवेगळया प्रकारचे दिसून येतात. अर्थात सर्व श्रेष्ठीजन राजकीय श्रेष्ठजन बनू शकतील असे नाही. इतर क्षेत्रातील राजकीय श्रेष्ठजन बनण्याची आस नसली तरी राजकीय क्षेत्रावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न मात्र करतात उदा. मुस्लिम धर्माचे धर्मगुरू निवडणुक काळात विशिष्ट पक्षाला मत देण्यासाठी फतवा जाहीर करतात. श्रेष्ठीजनामध्येही सत्तेचा संबंध लक्षात घेऊन राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक अशी वेगवेगळया पातळीवर श्रेष्ठीजन काम करत असतात. त्यांची एक उतरंड आपणास निर्माण करता येऊ शकते. राजकीय श्रेष्ठीजनाशी जवळचे संबंध असणाऱ्या राजकीय सवलती व फायदे मिळतात. सरकारी निर्णय प्रक्रियेत त्यांना महत्त्वाचे स्थान असते, त्यांना अर्थलाभ, प्रतिष्ठा व सवलती मिळतात. म्हणून श्रेष्ठीजन होण्यासाठी वेगवेगळया गटात स्पर्धा दिसून येते. या स्पर्धमुळे श्रेष्ठीजनाचे विविध स्तर दिसून येतात. त्यातून राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक पातळीवर श्रेष्ठीजनाची जडणघडण चालू असते. जिल्हा पातळीवर राजकारण करणाऱ्यांमध्ये नवीन नेतृत्व निर्माण होऊन होते तर राज्य पातळीवरिल जुने नेतृत्व कालबाहय होते. राज्यनेतृत्वातून राष्टीय पातळीवर नेतृत्व निर्माण होते. उदा.यशवंतराव चव्हाण कराड नगरपालिकेच्या राजकारणातून सातारा जिल्हा राजकारणात तेथून महाराष्ट्राच्या राजकारणात आणि शेवटी राष्ट्रीय राजकारणात गेले. अशाप्रकारे खालच्या पातळीवरून ते वरच्या स्तरावर नेतृत्व निर्माण होत असते. तर काही नेतृत्व वरच्या पातळीवर निर्माण होत असते उदा. सोनिया गांधी

**प्र. २ रा. राजकीय श्रेष्ठीजन निर्मितीचे आधार, प्रकार व घटक लिहा.**

प्रत्येक राजकीय व्यवस्थेत सत्ताधारी गटाकडे दोन प्रश्न असतात. एक म्हणजे ' सत्तेवर राहण्यास आपला गट कसा सर्वाधिक लायक आहे ' याचे समर्थन करणे व दुसरा म्हणजे आपल्या गटात अंतर्भाव करण्यास फारच थोडयाच व विशिष्ट व्यक्ती कशा लायक आहेत ते सांगण्यासाठी काही तत्त्वे व आधार शोधणे हे असते. राजकीय श्रेष्ठीजन समाजातून निवडक लोक निवडणे आणि इतर लोकांना वगळण्यासाठी खालील घटकाचा आधार घेत असतात. त्यामुळे श्रेष्ठीजन निर्मितीचे आधार पुढील घटक सांगता येतात.

१) **परंपरागत घटक-** जुन्या काळात परंपरागत घटकांचा प्रभाव जास्त होता. प्राचीन काळी अनुवांशिक घटकाच्या आधारवर राज्यकर्ते सत्तेवर येत असत. पण आधुनिक काळात जात, वंश, लिंग, कुळ इ. घटकाच्या आधारावर श्रेष्ठीजन निर्माण होतात. खानदान व जातकुळीच्या आधारावर श्रेष्ठीजन निर्माण होतो पण या घटकाचा प्रभाव स्थानिक पातळीवर जास्त प्रमाणात पडतो. भारतात श्रेष्ठीजन निर्मितीत आनुवांशिक घटक वा नातेसंबंधपेक्षा जातीचा जास्त प्रभाव पडतो. उदा. महाराष्ट्रात मराठा जातीतील लोकसंख्या जास्त असल्याकारणाने महाराष्ट्रात सर्वाधिक सत्ता स्थाने मराठा जातीतील लोकाना मिळतात. वंश घटकाच्या आधारावर श्रेष्ठीजन निर्माण होतात. उदा. हिटलरने आर्य वंशाच्या श्रेष्ठत्वाच्या आधारावर जर्मनीत सत्ता हस्तगत केली. लिंग हा घटक ही राजकीय श्रेष्ठीजन निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो. समाजात स्त्रियांनी राजकारणात भाग घेऊ नये हा परंपरागत विचार प्रभावी असल्यामुळे स्त्रियापेक्षा पुरूषामध्ये श्रेष्ठीजनाचे प्रमाण अधिक असते. काही देशात धर्माच्या आधारावर श्रेष्ठीजन निर्माण होतात. उदा. अरब देशात विशिष्ट धर्मियांना निवडणुकीत भाग घेण्याचा अधिकार आहे. वय हा घटक देखील श्रेष्ठीजन निर्मितीत महत्त्वाचा आहे. कारण काही पदासाठी वयाची अट असते.उदा. राष्ट्रपती पदावर निवडून लढविण्यासाठी ३५ वर्ष वयाची अट आहे. भारतीय राजकारणात अर्जित घटकाऐवजी पारंपरिक घटकाचा जास्त प्रभाव पडत असतो. उदा. भारतातील अनेक राजकीय पक्षात घराणेशाहीची प्रवृत्ती दिसून येते.

२) **अर्जित घटक-** व्यक्तीचे सामाजीकरण होतांना तिच्या गुणांचा विकास होत असतो. अर्जित गुण शिक्षणाच्या माध्यामातून मिळतात. या गुणाच्या जोरावर ते श्रेष्ठीजन बनू शकतात. प्राचीन काळात देखील अर्जित घटकांच्या आधारावर श्रेष्ठजन निवडले जात असते. प्राचीन काळी संरक्षणाच्या प्रश्नाला राजकीय क्षेत्रात महत्त्वाचे स्थान असल्यामुळे धाडसी, शस्त्र चालविण्याचे कौशल्य, युद्ध तंत्राचा अभ्यास इत्यादी घटकाच्या

आधारावर श्रेष्ठीजन निर्माण होत असत. विशिष्ट घराण्यात जन्म, व्यक्तीचे उत्पन्न, तिने केलेली समाजसेवा आणि नेतृत्व निवडीत तिच्या राजकीय कामगिरीचा विचार केला जातो. उदा. पंडित नेहरू मोतीलाल नेहरू सुपूत्र असले तरी इंग्लंड मधील शिक्षण, बुद्धिमत्ता आणि गांधीशी जवळीक व संघटन कौशल्य इ.गुणाच्या जोरावर भारताचे प्रथम पंतप्रधान म्हणून निवड झाली. आधुनिक काळात ज्ञान हा घटक ही महत्त्वाचा मानला जातो. प्रशासनात तांत्रिक बाबींचे महत्त्व वाढल्यामुळे प्रशासनातील गुंतागुंतीची उकल करण्यासाठी विशेष ज्ञान असलेल्या व्यक्तीकडे राजकीय सत्ता सोपविली गेल्याची अनेक उदाहरणे आहेत. उदा. डॉ.मनमोहनसिंगाना कोणतेही राजकीय पार्श्वभूमी नसतांना अर्थशास्त्रातील ज्ञानाच्या जोरावर ते भारताचे पंतप्रधान बनले. आधुनिक काळात संपत्ती हा अर्जित घटक श्रेष्ठीजन निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतो. निवडणुका लढविणे हे अत्यंत खर्चिक काम असल्यामुळे निवडणुकीत तिकिट वाटप करतांना निवडणुकीचा खर्च करू शकण्याची क्षमता असलेल्या व्यक्तीला तिकिट वाटप केले जाते किंवा निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांना देणग्या देणाऱ्या भांडवलदार व कारखानदार वर्गाला खुश करण्यासाठी राज्यसभेवर निवडून आणले जाते.

३) **नेमणुकीची प्रक्रिया-** आधुनिक काळात व पूर्वीच्या काळी देखील सत्तेला अधिमान्यता मिळविण्यासाठी आणि प्रशासन चालविण्यासाठी अनेक व्यक्तीची नेमणूक केली जात असे. उदा.सत्ताधारी पक्ष सत्तेवर बसल्यानंतर आपल्या पक्षाला निवडणूक काळात मदत करणाऱ्यांना राज्यपाल, राजदूत वा विविध आयोगाचे आणि महामंडळाचे अध्यक्ष व सदस्य म्हणून करत असतात. राजकीयदृष्टया कुशल व्यक्ती युक्ताप्रयुक्ता करून श्रेष्ठीजनाची मर्जी संपादन करून नेमणूक पदरात पाडून घेतात. काही देशात घटनेनुसार काही पदे नेमणुकीच्या आधारावर भरली जातात. उदा. भारतात राष्ट्रपतीला राज्यसभेत १२ सदस्यांची नेमण्याचा अधिकार आहेत. आधुनिक काळात प्रशासनातील गुंतागुंत आणि तांत्रिकता वाढल्यामुळे अनेक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी तज्ञाची गरज असते. शासनाकडून विविध प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी विविध समित्या नेमल्या जातात. या समित्यावर विशेष तांत्रिक ज्ञान असलेल्या लोकांची नेमणूक केली जाते. राज्यकर्त्यावर्गाकडून बुद्धिवान वर्गांना खुश करण्यासाठी समितीचे अध्यक्षपद व सदस्यपद बहाल करत असतात. अशा प्रकारच्या नेमणुकीच्या माध्यमातून श्रेष्ठीजन निर्माण होतात.

४) **निवडणुक प्रक्रिया-** लोकशाही निवडणुक हे माध्यम श्रेष्ठजन निर्मितीमध्ये अत्यंत प्रभावी माध्यम आहे. निवडणुकीत आपले सर्व कौशल्य लावून श्रेष्ठीजन वर्ग जास्तीत जास्त आपल्याला पाठिंबा देणारे घटक निवडून आणण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी धर्म, जात, राजकीय डावपेच, युक्ताप्रयुक्ता, युतीप्रयुती करून निवडणुकीत यश मिळविण्याचा प्रयत्न करतात. श्रेष्ठीजनांना निवडणुकीत यश न मिळाल्यास त्यांची अधिमान्यता नष्ट होत असते. तसेच निवडणुकीच्या माध्यमातून सत्तांतर होत असल्यामुळे ही प्रक्रिया श्रेष्ठीजनामध्ये बदल घडवून आणण्यात ही महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते. आधुनिक काळात इतर सर्व घटकापेक्षा या घटकाला अधिकृत मान्यता दिल्यामुळे निवडणुकीद्वारे श्रेष्ठीजन मोठया प्रमाणावर निवडले जातात.

५) **सत्तेची सोपान परंपरा-** श्रेष्ठजन निर्मितीत हा घटक फार महत्त्वाचा आहे. एखाद्यास पाठिंबा देणारी संरचना कितपत बळकट आहे हे अत्यंत महत्त्वाचे असते. श्रेष्ठीजन निर्मितीत वरिष्ठ वा उच्च पदस्थ श्रेष्ठीजनाशी काय लांगेबाधे आहेत हे देखील महत्त्वाचे आहेत. हे लागेबांधे नाहीसे झाले की सत्तेचा आधार नष्ट होता. कारण उच्चपदस्थांचा आधार हा समर्थकाच्या आधारापेक्षा अधिक मोलाचा व निर्णायक ठरतो. उदा. भारतात मुख्यमंत्राच्या निवडीत राष्ट्रीय पातळीवरील श्रेष्ठीजनाचा प्रभाव पडतो. परंतु वरिष्ठाशी संबंध महत्त्वाचे असले तरी असे संबंध नेतृत्व निर्माण करू शकत नाही. कारण ज्या पातळीवर कार्य करावयाचे आहे.त्या पातळीवरील राजकारणात त्या नेतृत्वाला कितपत पाठिंबा आहे तोही विचारात घेतला जातो.उदा. काँग्रेस पक्षात मुख्यमंत्राची निवड करण्याआधी विधिमंडळ सदस्याची मते जाणून घेतली जातात. बऱ्यादा वरून लादलेल्या नेत्याच्या विरोधात असंतोष निर्माण होऊ शकतो म्हणून या औपचारिकतेचाही वापर केला जातो.

**टिप- श्रेष्ठीजनाचे अभिसरण व बदल-** स्वतःकडे सत्ता टिकविण्यासाठी अभिजन वर्ग एकोप्याने वागतो असे अभिजनविषयक सिद्धातात मानले जाते. मात्र राजकीय श्रेष्ठीजनमध्ये एकोपा नसतो. पक्षांतर्गत गटबाजी, सत्ता संघर्ष, निवडणुका यामुळे अभिजन वर्गातील एकोपा नष्ट होता. उदा. भारतात काँग्रेस पक्षात पडलेली फूट संघटना काँग्रेस आणि नव काँग्रेस. श्रेष्ठीजन निर्मिती एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत श्रेष्ठीजनाचे सतत अभिसरण सुरू असते. अभिसरणाशिवाय कोणतेही व्यवस्था गतिमान होणार नाही. व्यवस्थेनुसार अभिसरणाची प्रक्रिया बदल असते. पुढील कारणामुळे श्रेष्ठीजनामध्ये बदल होतो.

१) **सत्ताधीश व प्रतिश्रेष्ठीजन-** सत्ताधीश म्हणजे प्रत्यक्ष सत्तेवर असलेले आणि प्रतिश्रेष्ठीजन म्हणजे सत्तेवर असणाऱ्यांना विरोध करणारे असे दोन वर्ग लोकशाहीत दिसून येतात. लोकशाहीत निवडणुकीमुळे राजकीय पक्षांमध्ये सत्तेचे सतत संक्रमण होत असते. आजचे सत्ताधीश निवडणुकीत पराभूत झाल्यास उद्याचे प्रतिश्रेष्ठीजन बनतात. उदा. इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये द्विपक्षपद्धती असल्यामुळे सातत्याने सत्तांतर होऊन श्रेष्ठीजनाच्या भूमिका बदलत असतात. अनेक देशात निवडणुकीच्या काळातील सत्तांत्तरामुळे श्रेष्ठीजनाच्या भूमिका बनतात. तसेच जे निवडून आलेले आहेत आणि ज्यांना बहुमत मिळले त्यांचा समावेश सत्ताधारी वर्गात होतो. याउलट जे निवडून आलेले असतात पण बहुमत न मिळाल्यामुळे ज्यांना विरोधात बसावे लागते त्यांचा समावेश प्रतिश्रेष्ठजन वर्गात होतो. सत्ताधीश आणि प्रतिश्रेष्ठजन यात सतत सत्ता मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू असते. या स्पर्धत ज्यांना बहुमत मिळते सत्ताधीश बनतो. निवडणुकामुळे श्रेष्ठीजनाचे अभिसरण होते.

२) **राजकीय भरतीच्या मार्गाने बदल वा अभिसरण-** राजकीय भरतीमुळे देखील श्रेष्ठीजन बदलतात. लोकशाही व्यवस्थेत विशिष्ट काळानंतर निवडणुका होतात. निवडणुकीत सत्ता बदल होत असल्याने श्रेष्ठीजन बदलतात. उदा. १९७७ साली जनता पक्ष सत्तेवर आला तर १९८० साली काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. निसर्गनियमाप्रमाणे काही लोक निवृत्त होतात त्यांच्या रिकाम्या जागी नवीन माणूस नेमला जातो. लोकशाही व्यवस्थामध्ये राजकीय पदासाठी कमाल वयाच्या मर्यादाची अट नसल्यामुळे त्यांची निवृत्ती ऐच्छीक असते. उदा. सिताराम केसरीच्या निवृत्ती नंतर सोनिया गांधी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष झाल्या. तसेच मृत्युमुळेही श्रेष्ठीजनाचे अभिसरण होते. लढाईतील मृत्यूमुळे राजकीय सत्तेचे अभिसरण होत असे. उदा. इंदिरा गांधीच्या मृत्युनंतर राजीव गांधी पंतप्रधान बनले. या शिवाय हुकूमशाही देशात पक्षांतर्गत गटस्पर्धा, सत्तास्पर्धा किंवा देशांतर्गत क्रांती होऊन एकाची सत्ता जाऊन दुसरा व्यक्ती सत्तेवर येतो. उदा. पाकिस्तानात नवाज शरीफ यांची सत्ता जाऊन परवेझ मुशर्रफ सत्तेवर आले. ही परिवर्तनीय विशेषतः हुकूमशाही देशामध्ये जास्त दिसून येतात.

३) **विविध स्तरावरील अभिसरण वा बदल-** राजकीय दृष्टिकोनातून राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक या पातळया पडतात. तीनही पातळीवर नेतृत्व तयार होते. सामान्यतः राजकीय कर्तृव्य, अनुभव, वरिष्ठ राजकीय नेत्याशी लागेबांधे आणि जनमतांचा पाठिंबा इत्यादींच्या आधारावर स्थानिक पातळीवरील श्रेष्ठीजन कालांतराने वरच्या पातळीवर जात असतात. उदा.व्ही.पी.सिंग हे उत्तर प्रदेशाच्या स्थानिक पातळीवरून मुख्यमंत्री त्यानंतर केंद्रीय मंत्री व पंतप्रधान बनले. ज्या पद्धतीने खालून वरती अभिसरण होते त्याच पद्धतीने वरून खाली देखील अभिसरण होत असते. उदा. शरद पवार केंद्रात संरक्षण मंत्री होते त्यानंतर ते परत राज्याचे मुख्यमंत्री बनले. याउलट काही राजकीय नेतृत्व राष्ट्रीय पातळीवर निर्माण होते. उदा. सोनिया गांधी आणि राहुल गांधी

४) **सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत बदल-** सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत बदलामुळे अभिजन वर्गात बदल घडून येतो. पारंपरिक समाजातील अभिजन वर्ग व आधुनिक समाजातील अभिजन वर्ग यांच्यात फरक दिसतो. सामाजिक व आर्थिक बदलामुळे भारतातील अनेक घटकराज्यांत मागासलेल्या राज्यकारणात सहभाग प्राप्त झाला. त्याचा परिणाम उच्च जातीतील पारंपरिक अभिजन वर्गाची पिछेहाट झाली. उदा. मायावती सारखी दलित स्त्री उत्तरप्रदेश राज्याची चारदा मुख्यमंत्री झाली. शिक्षणाचे प्रमाण वाढू लागताच विधिमंडळात सुशिक्षित वर्गाचे प्रमाण वाढू लागले. गुटस्मन यांनी ब्रिटनमधील राजकीय अभिजन विषयक अभ्यासात सामाजिक व आर्थिक बदलाबरोबर राजकीय अभिजन वर्गातही बदल होऊ लागला हे दाखवून दिले आहे. उदा.

१८६८ ते १८८६ पर्यंत कामगार वर्गाचा मंत्रिमंडळात एकही प्रतिनिधी नव्हता. १९३५ ते १९५५ या काळात कामगार वर्गाचे मंत्रिमंडळात २१ लोक प्रतिनिधित्व करत होते यावरून बदलत्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा परिणाम श्रेष्ठीजन अभिसरणात होत असतो.

**प्र. ३ रा. राजकीय नेतृत्वाचा अर्थ आणि आधारभूत घटकांचे विश्लेषण करा?**

प्रत्येक समाजात लोकांच्या आदरास पात्र ठरलेल्या अनेक महान व्यक्ती जगाच्या इतिहासात निर्माण झालेल्या असतात. त्यांनी आपआपल्या क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी केलेली दिसते. त्यापैकी अनेकांचा प्रभाव मृत्यूनंतरही दीर्घकाळ कायम राहिलेला आहे. या सर्वांसाठी नेतृत्व ही संज्ञा समाजशास्त्रात वापरली जाते. प्रत्येक क्षेत्र व काळात नेतृत्वाचे स्वरूप भिन्न असू शकतात. पण काही वैशिष्टये मात्र सर्वत्र सारखीच असू शकतात. त्या वैशिष्टयांच्या आधारावर नेतृत्वाच्या संकल्पनेचा अभ्यास करू शकतो. ॲरिस्टॉटलच्या मते, सामाजिक भावनिष्ठा (इथॉस), (कारुण्य) पथॉस आणि शब्दशक्ती (लॉगॉस) हे तीन गुण नेतृत्व निर्मितीसाठी आवश्यक मानतात. सामाजिक भावनिष्ठेतून नेत्याचे नैतिक चारित्र्य सूचित होते. इतरांचे मतपरिवर्तन करण्याची क्षमता त्यातून त्याला मिळते. कारुण्याच्या आधारे नेता लोकांच्या भावनांना हात घालून भावनिक प्रेरणा देऊ लागतो. शब्दशक्तीद्वारे नेता स्वतःच्या कृतीचे भक्कम व तर्कसंगत स्पष्टीकरण करून लोकांना बौद्धिक पातळीवर प्रेरित करू शकतो. निसर्गाने निर्माण केलेली माणसे समान असले तरी त्यांच्यात कोणकोणती भिन्नता आढळते. समाजातील काही लोकांकडे उपजत गुण असतात. त्या गुणाच्या जोरावर असे लोक श्रेष्ठ स्थान प्राप्त करतात. असे गुणवान लोक समाजाच्या आदरास पात्र ठरतात. अशा गुणवान लोकाकडून सर्वसाधारण जनता मार्गदर्शनाची अपेक्षा करते. अशा सामाजिक प्रक्रियेतून नेतृत्व निर्माण होते. प्रत्येक समाजात नेता व अनुयायी हे दोन वर्ग प्राचीन काळापासून दिसतात. राजकीय जीवनात नेतृत्वाची आवश्यकता असते. नेतृत्वाचे स्वरूप, ते कोणाला प्राप्त होते, कोणत्या आधारावर प्राप्त होते इ. दृष्टीने नेतृत्वाचा अभ्यास राज्यशास्त्रात होत असतो. समुदायात एखादा व्यक्तीचा प्रभाव जास्त प्रमाणात निर्माण होऊन ती व्यक्ती आपल्या प्रभावाने अनेक लोकाच्या व्यवहारावर तिला आवश्यक असलेला परिणाम करीत असते. असा प्रभाव पाडणारी व्यक्ती समूहचा नेता मानली जाते. आणि त्या प्रभावाने प्रभावीत झालेले लोक तिचे अनुयायी मानले जातात. त्यामुळे नेता व अनुयायी हे दोन्ही परस्पपूरक आहेत.

**नेतृत्व व्याख्या-** नेतृत्व ही संज्ञा आपल्या नित्य परिचयाची असली तरी तिचे संकल्पनीकरण करणे अत्यंत कठीण कार्य आहे.

१) **चेस्टर बर्नार्ड-** नेतृत्व म्हणजे व्यक्तीच्या वर्तणुकीतील असे गुण की ज्यामुळे संघटितपणे कार्य करणाऱ्या लोकांना आणि त्यांच्या कार्याला मार्गदर्शन मिळते.

२) **जॉर्ज टेरी-** लोकांना प्रभावित करून त्यांची संबंधित उद्दिष्टये साध्य करणारी कृती म्हणजे नेतृत्व होय.

३) **कुंटझ आणि आडोनेल-** नेतृत्व म्हणजे समान उद्दिष्ट सामूहिकरित्या साध्य करण्यासाठी लोकांचे मन वळविणारी कृती होय.

४) एखाद्या गटाचे विशिष्ट ध्येय प्राप्त करण्याच्या प्रयत्नांचे संघटन व दिग्दर्शन करण्याच्या हेतूने प्रेरित झालेले वर्तन म्हणजे नेतृत्व

**राजकीय नेतृत्वाचे आधारभूत घटक -**

नेतृत्व ही एक सामाजिक अवस्था आहे. या अवस्थेला राजकीय स्वरूप प्राप्त होते तेव्हा संबंधित नेतृत्वाला राजकीय नेतृत्व असे म्हटले जाते. त्यासाठी नेतृत्व करणारा, नेतृत्व स्वीकारणारा, नेतृत्वाला चालना देणारी परिस्थिती इ. चार घटक आवश्यक असतात. नेता, अनुयायी, गटाचे उद्दिष्ट आणि ते साध्य करण्याचे मार्ग यानुसार नेतृत्वाचे स्वरूप बदलत असते. नेतृत्वासाठी लागणारे गुण व वैशिष्टये परिस्थितीनुसार बदलत असतात. नेतृत्वाशी संबंधित अनेक बाबतीत विविधता असली तरी नेता आणि अनुयायी यांचे संबंध मौलिक स्वरूपाचे दिसून येतात. नेत्यांच्या ठिकाणी आज्ञा करण्याची आणि अनुयायांकडून त्या सत्तेला आज्ञापालनाच्या स्वरूपात प्रतिसाद मिळत असतो. नेतृत्वासाठी खालील आधारभूत घटक आवश्यक असतात.

१. **नेता-** नेतृत्व एखादा गटात निर्माण होते. विशिष्ट हितसंबंधावर आधारित लोकांचा संचाला गट म्हणतात. गट आकाराने लहान वा मोठा असू शकतो. गटातील कार्याचा व्याप लक्षात घेता त्या गटातील नेत्यांची संख्या कमी जास्त होऊ शकते. म्हणजे त्या विशिष्ट गटात एक प्रमुख नेता आणि इतर उपनेते असतात. नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात काही विशेष गुण असतात. त्यात पुढाकार घेण्याची वृत्ती, विश्वास संपादन करण्याची कला, मार्गदर्शन करण्याची बुद्धिमत्ता, पेचप्रसंग सोडविण्यासाठी लागणारे धैर्य, नेत्याचा जन्म, शिक्षण, अनुभव, वक्तृत्व इ. गुण आवश्यक असतात. ॲरिस्टॉटलने इथॉस, पॅथॉस आणि लॉगॉस हे तीन गुण चांगल्या नेतृत्वासाठी आवश्यक मानले आहेत. इथॉस म्हणजे सामाजिक भावनिष्ठा त्यातून नैतिक चारित्र्य व मनपरिवर्तन क्षमता दिसते तर पथॉस म्हणजे कारूण्य होय. कारुण्याच्या आधारावर लोकांच्या भावनांना होत घालू शकतो व त्यांना भावनिक प्रेरणा देऊ शकतो. लॉगॉस म्हणजे स्वतःच्या कृतीचे भक्कम व तर्कसंगत स्पष्टीकरण करून बौद्धिक पातळीवर लोकांना प्रेरित करू शकतो. नेतृत्व कार्य व परिस्थितीसापेक्ष असते. म्हणून निरनिराळया परिस्थितीत एकच व्यक्ती नेतृत्व करतांना दिसत नाही. कारण कार्य आणि परिस्थितीच्या आधारावर नेतृत्व निर्माण होते. याच आधारावर नेतृत्व देखील बदल होतो. एखादया प्रसंगी एखादी व्यक्ती उत्तम प्रकारे नेतृत्व देऊ शकेल तीच व्यक्ती दुसऱ्या परिस्थितीत परिणामकारक नेतृत्व देवू शकेल याची खात्री नसते त्यामुळे एकच व्यक्ती संपूर्णपणे नेतृत्व करेल असे म्हणता येत नाही.

२. **अनुयायी-** नेतृत्वाच्या संबंधात अनुयायांनासुध्दा महत्त्वाचे स्थान असते. नेता नेतृत्व करता म्हणजे आपल्या अनुयायांना सोबत घेऊन ध्येयप्राप्तीचा प्रयत्न करतो. त्यासाठी नेत्यांला दोन गोष्टी कराव्या लागतात. कामाच्या स्वरूपानुसार अनुयायाचे वर्तन घडण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे व प्रेरणा देणे आणि अनुयायाच्या भावना व काम करतांना जाणवणाऱ्या समस्या समजावून देणे ही कार्य नेता पार पाडत असतो. गटांच्या व्यवहारात अनुयायी सक्रिय असले पाहिजेत. नेता व अनुयायी यांचा कार्यभाग परस्परपूरक आहे. नेत्याला सर्व प्रकारचे सहाय्य करणे हे अनुयायाचे काम असते. यात कार्यात सल्ला देणे, माहिति देणे, मतप्रदर्शन करणे इ. गोष्टीचा समावेश होतो. अनुयायाची संख्या, निष्ठा, नेतृत्वाची स्वीकृती इ. घटकावर नेतृत्वाचा विकास व प्रभाव आणि अनुयांयाचे समर्थन अवलंबून असते. अनुयायी आणि नेता यांचा संबंध दुमार्गी संबंध असतो. नेतृत्वाकडून अनुयायांना मार्गदर्शन व प्रेरणा मिळते, तर अनुयायांकडून नेतृत्वाला माहिती व प्रतिसाद मिळत असतो. नेतृत्व-अनुयायी हे सत्तासंबंध नसून समानुभूतिपूर्ण समजुतदारपणाचे संबंध आहेत हे सूत्र मान्य केले तर दुमार्गी व्यवहारांना महत्त्व प्राप्त होते. अनुयायांकडून मिळणारे समर्थन वा प्रतिसाद हा नेत्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा वा उत्साह वाढविणारा असतो.

३. **परिस्थिती-** व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आणि सभोवतालचे भौतिक आणि सामाजिक पर्यावरण यांच्यात सतत आंतरक्रिया सुरू असते. नेतृत्वाचे सुप्त गुणांना पैलू पाडण्याचे कार्य पर्यावरणाद्वारे होत असते. व्यक्तीच्या नेतृत्व गुणांना प्रेरणा देण्याचे कार्यही पर्यावरण करत असते. परिस्थितीत गटाची वैशिष्टये, गटातील लोकांची संस्कृती, भौगालिक परिस्थिती, लोकांची बौद्धिक क्षमता, गटातील व्यक्तीचे परस्परसंबंधातून निर्माण झालेली रचना इ. गोष्टीचा समावेश होतो. गटात नवीन लोकांची भरती व असलेल्याचे बर्हिगमन यामुळे देखील परिस्थितीत बदल होऊ शकतो. परिस्थिती लक्षात घेऊन नेतृत्व निश्चित केले जाते. केवळ व्यक्तिमत्त्वाचे गुण महत्त्वाचे नाहीत तर परिस्थितीनुसार नेतृत्व निर्माण होते. नेतृत्वाला परिस्थिती अनुकुल अथवा प्रतिकुल आहे यावर त्याची शक्ती व क्षमता ठरते. परिस्थिती अनुकुल असेल तर नेतृत्वाची शक्ती जास्त राहते तर प्रतिकुल परिस्थितीत नेतृत्वाचा कस लागतो.

४. **कार्य-** कार्याच्या आधारावर नेतृत्व निश्चित केले जाते. नेतृत्व करण्यासाठी अनेक प्रकारची क्षेत्रे असतात. त्यापैकी कोणत्या क्षेत्रात कोणत्या प्रकारचे कार्य करणे आवश्यक आहे. ते किती प्रमाणाम यश अपयश किती मिळाले यावर नेतृत्व अवलंबून असते. कारण कोणत्या प्रकाराचे कार्य आहे व त्याकरिता कोणत्या प्रकारचे नेतृत्व आवश्यक आहे हे ठरविणे आवश्यक असते. व्यक्तीगत नेतृत्वापेक्षा कार्यभाग पार पाडणाऱ्या नेतृत्वाला

आज जास्त महत्त्व आहे. नेतृत्व व्यक्तिगत असते. व्यक्तीव्यक्तींमधील जवळीक हा तिचा आधार असतो. त्यांच्या आपापसातील क्रिया-प्रतिक्रिया, परस्परांविषयीच्या भावना व अभिवृत्ती नेतृत्वाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असतात. नेतृत्व क्रियाशीलतेतून व्यक्त होते यांचा अर्थ नेतृत्व ही गतिशील संकल्पना आहे.

वरील चार घटकांच्या आधारावर नेतृत्व संकल्पनेची उभारणी होत असते. या घटकाशिवाय नेतृत्वाची उभारणी होऊ शकत नाही.

**प्र.४ था. राजकीय नेतृत्व म्हणजे काय ते सांगुन राजकीय नेतृत्वाची वैशिष्टये व गुण स्पष्ट करा?**

**उत्तर-** नेतृत्व ही संकल्पना समाजाशी निगडित असली तरी नेतृत्व हे व्यक्तिगत स्वरूपात विकसित होत असते. व्यक्ती व्यक्तीतील जवळीक आणि तिच्यातील गुणाचा समुच्चय यावरून नेतृत्वाचे विकसित होणे अवलंबून असते. नेतृत्व ही गतिशाील प्रक्रिया असल्यामुळे नेतृत्व विकसनासाठी पुढील वैशिष्टये वा गुण आवश्यक मानले जातात.

१. **गुणसमुच्चय-** नेतृत्वासाठी आवश्यक गुणांची यादी अनेक अभ्यासकांनी आपआपल्या धारणेनुसार केलेली आढळते. प्रत्येक अभ्यासक आपआपल्या मतानुसार गुणांना कमी अधिक महत्त्व देत असले तरी काही गुणाबाबत मतैक्य आढळून येते. प्रबल इच्छाशक्ती, धाडस, निग्रह, भविष्याकडे पाहण्याची वृत्ती, संवेदनशीलता, स्पष्ट विचार, समूहमनाची ओळख, निःपक्षपातीपणा, नैतिक चारित्र्य, समूहाच्या आशा आकांक्षा व्यक्त करण्याची क्षमता, छाप पाडणारा आवाज, वक्तृत्व कौशल्य इत्यादी गुण नेत्यामध्ये असणे आवश्यक असते. स्वतःच्या रागलोभ मोहमाया इत्यादी विकारांवर नियंत्रण ठेवता येणेही यशस्वी नेतृत्वासाठी आवश्यक मानले जाते. सर्वसामान्य जनतेप्रमाणे हताश व निराश होऊन चालत नाही. संकटकाळात जनता नेत्याकडे अपेक्षेने पाहत असते. त्या अपेक्षांना नेतृत्व मूर्त स्वरूप देऊ शकत नसेल तर जनता नेत्यांप्रति नाराज होण्याची वा पाठिंबा काढण्याची शक्यता असते. म्हणून नेत्यामध्ये विविध सद्‌गुणाचा समुच्चय असला पाहिजे त्यांच्या जोरावर तो कोणत्याही प्रकारच्या परिस्थितीवर मात करण्याची क्षमता मिळवू शकतो.

२. **पर्यावरण व परिस्थिती-** व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आणि सभोवतालचे भौतिक आणि सामाजिक पर्यावरण यांच्यात सतत आंतरक्रिया सुरू असते. नेतृत्वाचे सुप्त गुणांना पैलू पाडण्याचे कार्य पर्यावरणाद्वारे होत असते. व्यक्तीच्या नेतृत्व गुणांना प्रेरणा देण्याचे कार्यही पर्यावरण करत असते. राजकीय नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास फ्राईडच्या मनोविश्लेषणा पद्धतीचा वापर करून हॅरोल्ड लास्वेलने केला आहे. त्यांच्या मते लिंकनच्या नेतृत्वाच्या मुळाशी बालपणी त्याच्या वाटयाला आलेला संतुलित सुरक्षिततेचा व प्रेमाचा अभाव ही कारणे होती. प्रौढपणीही ही असुरक्षितपणाची भावना लिंकनच्या व्यक्तिमत्त्वात कायम होती आणि प्रेम-जिव्हाळा यांची भरपाई करण्याच्या प्रयत्नाच राष्ट्रपतिपदावरून त्याने केलेल्यया अरेरावीतून व्यक्त होता. राजकीय नेतृत्वाच्या जडणघडणीत पर्यावरणाचा सर्वात मोठा वाटा असतो. योग्य पर्यावरण नेतृत्वाला बहरू शकते तर अयोग्य पर्यावरण नेतृत्व नष्ट करू शकते म्हणून राजकीय नेतृत्वाचा दर्जा व कार्याचा अभ्यास करतांना स्थल-काल-परिस्थिती विचारात होणे आवश्यक आहे.

३. **असामान्यत्व व सामान्यत्व-** राजकीय नेतृत्वामध्ये आपल्या सहकाऱ्यापेक्षा किंवा इतरापेक्षा चांगल्या प्रकारे करू शकतो किंवा सामाजिक पर्यावरणावर प्रभाव टाकू शकतो ही असामान्यत्वाची जाणीव अलौकिक कामगिरी पार पाडू शकतो. हे असामान्यत्व अनुयायांच्या प्रतिसादातून अधिक भक्कम होत असते. नेत्याला मिळणाऱ्या प्रतिसाद आणि अनुयायांच्या पाठिंबातून दिव्यवलयी नेतृत्वाची निर्मिती होत असते. नेतृत्वात असमान्यत्व आवश्यक असले तरी सामान्यांच्या पातळीवर उतरून परिस्थिती यथायोग्य जाणीव करून घेण्यासाठी नेत्याचे सामान्यत्व कायम ठेवणे गरजेचे असते. कारण परिस्थितीचे आकलन झाल्याखेरीज कार्याची प्रभावी आखणी करू शकत नाही. कार्याच्या यशाशिवाय जनमताचा पाठिंबा नेतृत्वाला मिळू शकत नाही. म्हणून नेतृत्वाच्या ठिकाणी असामान्यत्व आणि सामान्यत्व असणे गरजेचे असते.

४. **संधी-** संवेदनक्षम नेत्याला सभोवताली घडणाऱ्या घडामोडीचे ज्ञान असणे आवश्यक असते. त्याला समूहाशी सहज संवाद साधता आला पाहिजे, जनसामान्यांशी निगडीत प्रश्नांना प्रभावी वाचा फोडता आली पाहिजे. प्रतिक

निर्मिती करता आली पाहिजे या सर्वांचा वापर करून योग्य संधी नेता निर्माण करू शकतो. संधी न मिळाल्यास नेतृत्व गुणांचा अविष्कार होऊ शकत नाही. संधी प्रत्येक वेळेस आपोआप निर्माण होण्याची शक्यता नसल्याने नेतृत्वाने स्वत:मधील कौशल्य व ज्ञानाचा वापर करून अचूक संधी निर्माण केली पाहिजे त्यासाठी नेतृत्वात निर्णय क्षमता आणि भविष्याकडे पाहण्याची अचूक क्षमता असणे गरजेचे आहे. या क्षमतेच्या आधारावर नेतृत्व संधीचे रूपांतर यशात करू शकतो.

५. **सहानुभूती-** सहानुभूती म्हणजे दुसऱ्या व्यक्तीची भूमिका तिच्या दृष्टिकोनातून समजावून घेण्याची क्षमता होय. नेत्याच्या अंगी जर ही क्षमता नसेल तर तो मार्गदर्शन करणे, प्रेरणा देणे, दुय्यम सहकाऱ्यांकडून माहिती मिळविणे यापैकी काहीही करू शकणार नाही आपल्याला अमूक गोष्ट कशी वाटते यापेक्षा ज्यांच्यावर या गोष्टीचा परिणाम होणार आहे त्यांनी ती कशी वाटते याचा अचूक अदमास घेऊन नेतृत्व करणाऱ्या नेत्याला व्यक्तीची सहानुभूती प्राप्त करता येऊ शकते. आपल्यासंबंधी इतराच्या धारणेच्या आधारावर नेतृत्व परिस्थितीचे योग्य आकलन करून योग्य निर्णय अंमलात आणू शकतो. सहानुभूतीच्या आधारावर तो जनतेला प्रभावित करून आपली अधिमान्यता विकसित करू शकतो.

६. **वस्तुनिष्ठता-** उत्तम नेतृत्वासाठी व्यक्तिगत संबंधात वस्तुनिष्ठता सांभाळता येणे गरजेचे असते. प्रत्येक व्यक्ती वर्तनामागे निश्चित काहीतरी हेतू असतो. व्यक्तीच्या वर्तनांची योग्य कारणमीमांसा करून त्यांच्या वर्तनाचे योग्य आकलन केले तर नेतृत्व अनुयायी व आपल्याला पाठिंबा देण्याचे हेतू लक्षात घेऊ शकतो त्या आधारावर तो वस्तुनिष्ठ निर्णय घेऊ शकतो. परंतु वस्तुनिष्ठताचे आकलन व कारणमीमांसा करणे सोपे नसते. इतरांच्या वर्तनाला आपला प्रतिसाद सामान्यतः भावनिक असतो. वाढत्या कार्यभाराच्या बोजामुळे नेतृत्वाला दुय्यमांच्या वर्तनाचा वस्तुनिष्ठ व तटस्थपणे अभ्यास करणे शक्य नसले तरी उत्तम नेतृत्वाला सहानुभूती आणि वस्तुनिष्ठता यांच्या संतुलन राखून कार्य पार पाडावे लागते अन्यथा अनुयायी नेतृत्वाच्या सत्ता व प्रभावाचा वापर करून आपले नेतृत्व प्रस्थापित करू शकतो किंवा मनमानीपणे वागून नेतृत्वाला बदनाम करू शकतो.

**टिप- नेतृत्वाचे राजकीय स्वरूप-** सामाजिक व आर्थिक बदलामुळे आजच्या राजकीय व्यवस्थेमध्ये वेगवेगळया समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे राजकीय नेतृत्वाला या सर्व गोष्टींची दखल घ्यावी लागते. जनता आपल नेते विधिमंडळात निवडून देतात. त्यातून मंत्र्याची निवड होते. मंत्री म्हणजे शासकीय नेतृत्व होय. लोकशाही व्यवस्थेच्या उदयामुळे जनतेला नेतृत्व देण्याची जबाबदारी शासकीय पुढाऱ्यावर असते. कार्यकारी मंडळ केवळ शासनाची एक शाखा म्हणून महत्त्वाची नसून सर्व राजकीय व्यवस्थात एक महत्त्वाची यंत्रणा आहे. कार्यकारी मंडळामार्फत कायदेमंडळाली केलेले कायदे आणि न्यायमंडळाने दिलेल्या निकालाच्या अंमलबजावणीची जबाबदारी पार पाडली जाते. त्यामुळे आधुनिक काळात कार्यकारी मंडळाचे महत्त्व व जबाबदारी वाढलेली आहे. राजकीय नेतृत्व देखील कार्यकारीमंडळात विकसित होत असते.

नव्याने स्वतंत्र झालेल्या आफ्रोआशियाई राष्ट्रांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. त्या देशातील लोकशाही व्यवस्था त्या देशातील नेत्याच्या संमोहित व्यक्तिमत्त्वावर टिकून आहेत. उदा. भारतातील लोकशाहीच्या यशात पंडित नेहरुच्या नेतृत्वाचा मोठा वाटा आहे. सर्वंकष राष्ट्रात विचारधाराच्या आधारावर नेते आपली सर्वश्रेष्ठ सत्ता प्रस्थापित करतात. एखादया संघटनेद्वारे राष्ट्रांत एकता प्रस्थापित करण्याचे कार्य नेत्याला करावे लागते. त्यासाठी नेतृत्वाच्या कार्याचे दोन भाग पडतात. १) राष्ट्राचा नेता २) शासकीय नेता  ही दोन्ही कार्य परस्परपूरक आहेत. राष्ट्रासमोर एखादी समस्या निर्माण झाल्यास नेता लोकांना आवाहन करतो. अशा प्रसंगी राष्ट्राच्या इच्छेचे प्रतिक म्हणून नेता कार्य करतो तर शांततेच्या काळात नेता शासकीय स्वरूपाची कार्य करतो.

प्राचीन काळी समाजातील विशिष्ट स्तरातून नेतृत्व निर्माण होत असे. आज ही परिस्थिती बदलेली आहे. कारण राज्याची शक्ती संविधान आणि कायदयानुसार संघटित झालेली आहे. प्रत्येक पदाच्या सत्तेचे क्षेत्र व मर्यादा निर्धारित केलेल्या असतात. नेतृत्वातील बदल नियमनुसार होतात. बळाच्या जोरावर सत्ता हस्तगत केली जात नाही. नेमणुका आणि निवडणुका हे सत्ता बदलाचे दोन मार्ग सर्वमान्य झालेले आहेत. व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप या गुणावर आधारित

नेतृत्वाची संकल्पना आज मागे पडत आहे. कार्य पार पाडण्याची क्षमता हे आधुनिक राजकीय नेतृत्वाचे प्रमुख लक्षण मानले जाते. राजकीय नेतृत्व परिस्थितीजन्य असते. नेत्याची निवड अनेकदा परिस्थितीच्या आधारावर केले जाते. नेते जन्मतः निर्माण होतात या तत्त्वाऐवजी आधुनिक काळात ते तयार होत असतात किंवा परिस्थितीच्या आधारावर तयार केले जातात असे मानले जाते. पेचप्रसंगाच्या वेळी जनता योग्य नेत्याची निवड करत असते. उदा. दुसऱ्या महायुद्ध काळात इंग्लंडच्या जनतेने चेंबरलेनचे नेतृत्व अमान्य करून चर्चिलला नेता निवडले. त्याच जनतेने महायुद्ध समाप्तीनंतर चर्चिलला निवडणुकीत नाकारून ॲटलीच्या हाती सत्ता सूत्रे दिली. शांततेच्या काळात गटागटात ऐक्य निर्माण करणाऱ्या नेत्याची निवड होते. संकटकाळात जनता कणखर नेत्यांच्या हाती सत्ता सूत्रे देत असते. नेतृत्वाचा अभ्यास दोन दृष्टीने केला जात असतो. लहानलहान गटाच्या आधारावर नेतृत्वाचा अभ्यास करणे ही एक पद्धत तर मोठ्या स्तरावर म्हणजे राष्ट्राच्या स्तरावर नेतृत्वाचा अभ्यास करणे ही दुसरी पद्धत होय. या दोन्ही पद्धतीचा वापर करून आधुनिक काळात राजकीय नेतृत्वाचा अभ्यास केला जात असतो.

**शासकिय वा राजकीय नेतृत्वाची वैशिष्टये-** शासकीय नेतृत्वाची खालील वैशिष्टये सांगता येतात.

१) **दूर अंतरावर असलेले नेतृत्व-** राजकीय व्यवस्थेचा प्रमुख नेता सर्वसाधारण जनतेपासून दूर अंतरावर राहतो. त्याचा लोकाशी प्रत्यक्ष संबंध फारसा येत नाही. रेडिओ, वर्तमानपत्रे, दूरदर्शन अशा सामुदायिक स्वरूपाच्या राजकीय संसूचन माध्यमाद्वारे नेता जनतेशी संबंध प्रस्थापित करतो. नेता आणि अनुयायी संबंध मध्यस्थ नेताद्वारे साधले जात असतात. राजकीय व्यवस्थेच्या निरनिराळया स्तरावर हे मध्यस्थ पुढारी आपआपले कार्य करीत असतात व त्यामार्फत वरिष्ठ स्तरावरील नेत्याशी संबंध प्रस्थापित केला जातो. आधुनिक समाजाची वाढती लोकसंख्या आणि भौगालिक विस्ताराचा विचार करता नेता व जनता संबंध दूर अंतराच्या स्वरूपात असतो. ते अंतर कमी करण्यासाठी राजकीस संसूचन माध्यमाच्या माध्यमातून म्हणजे मुलाखती, आवाहन, सभा, संमेलने इत्यादी माध्यमातून नेता जनतेशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतो.

२) **अनेक कार्यभाग पार पाडणारे नेतृत्व-** आधुनिक नेतृत्वाला अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. राजकीय नेत्याला राजकीय पक्ष, शासकीय कर्मचारी व सर्व साधारण जनता इ.सर्वांच्या अपेक्षा लक्षात घेऊन कार्य करावे लागते कारण तो एकाच वेळेस राजकीय पक्ष नेता, शासकीय यंत्रणेचा प्रमुख आणि राष्ट्राचा नेता असतो. नेत्याला या सर्व भूमिकेतून कार्य करावे लागते. त्या सर्व भूमिकात त्याला योग्य समन्वय प्रस्थापित करावा लागतो. अर्थात हे सर्व नेत्याच्या अंगी असलेल्या कौशल्य आणि बुद्धिमत्तेवर सर्वस्वी अवलंबून असते. म्हणून प्रत्येक नेतृत्वाची काम करण्याची शैली असते. या शैलीच्या आधारावर आपले कार्य करत असतो. आधुनिक काळात कार्य करणाऱ्या नेतृत्वाला जनतेची अधिमान्यता सहज प्राप्त होते.

३) **विधिनिहित नेतृत्व-** नेत्याला विशिष्ट यंत्रणेद्वारा आपले कार्य करावे लागते. त्याला मदत व सल्ला देण्यासाठी कर्मचारी वर्ग असतो. भाषणे लिहून दिली जातात, प्रतिनिवेदने तयार केली जातात, राजकीय नेत्यांची दौरे आखणे, भेटीची वेळ निश्चित करणे इत्यादी सर्व कार्य नेतृत्वाला करणे शक्य नसल्याने या कामासाठी सचिवालय ही यंत्रण निर्माण केलेली असते.

४) **संस्थात्मक व्यवहार-** आजच्या नेत्याला नियम व प्रस्थापित प्रथा ह्या नुसार व्यवहार करावा लागतो. अर्थात हे नियम लवचिक स्वरूपाचे असतात. पदधारण करणाऱ्या नेत्याला त्या पदाची परंपरा लक्षात घ्यावी लागते. यालाच नेतृत्वाचा वारसा असे म्हणतात. काळाच्या आधोत प्रत्येक पदाच्या विशिष्ट अशा परंपरा विकसित झालेल्या असतात त्या परंपराचा आदर करणे नेतृत्वाचे काम असते.

**टिप- राजकीय नेतृत्व आणि विचारधारा-** राजकीय नेतृत्व आपला प्रभाव वाढविण्यासाठी विशिष्ट विचारसरणीचा आधार घेतात. विचारसरणीच्या आधारावर नेतृत्व व्यवस्थेची पायाभरणी करतात. उदा. हिटलरने आपली राजवट नाझी वंशवादाच्या तत्वज्ञानावर केली. एखादया नेत्याच्या राजकीय प्रभावाचे राजकीय अधिकारात रूपांतर करण्याचे कार्य विचारसरणीद्वारा केले जाते. उदा. लेनिनचा जबरदस्त प्रभाव रशियन जनतेवर होतो.या प्रभावाचे अधिकारात रूपांतर करण्यासाठी त्यांनी साम्यवादी विचाराचा आधार घेऊन रशियात क्रांती घडवून आणली. राजकीय नेतृत्व

आपल्या सत्तेला आधिमान्यता मिळविण्यासाठी अनेकदा विचारसरणीचा आधार घेतात. उदा. जनतापक्षाच्या अस्थिर सरकारमुळे १९८० निवडणुकीत कॉग्रेसने स्थिर सरकार ही विचारसरणी प्रचारात वापरली. विघटनवादी प्रवृत्ती समाजात मोठयाप्रमाणात असेल तर अशा समाजाला संघटित करण्याकरिता राजकीय नेते विचारसरणीचा आधार घेतात. समाजात राजकीय अस्थिरता वा अराजक निर्माण झाल्यास नेते समाजाला दिशा देण्याकरिता नवीन विचारसरणी निर्माण करतात. उदा. पाकिस्तानला गोंधळातून बाहेर करण्यासाठी अयुब खानने बेसिक डेमॉक्रसीची विचारसरणी मांडली. लोकशाहीत विशिष्ट हितसंबंधाच्या रक्षणाकरिता नेते नवी विचारसरणी निर्माण करतात. उदा. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज ठाकरेनी मराठी माणसाच्या हक्कांचा मुद्दा पुढे आणला. राजकीय नेते राजकिय परिवर्तनासाठी विचारसरणीचा आधार घेतात. उदा. भाडंवलशाहीच्या शोषणाला शह देण्यासाठी मार्क्सने साम्यवादी विचारसरणी मांडली.

अशाप्रकारे नेतृत्व आपली ध्येय साध्य करण्याकरिता विचारप्रणालीचा आधार घेतात. विचारप्रणालीमुळे त्यांच्या नेतृत्वाला नवी चकाकी मिळते.

**टिप- राजकीय नेतृत्व आणि अधिमान्यता-** राष्ट्रातील लोकांच्या सर्वसाधारण आंकाक्षा पूर्ण करणारे नेतृत्व अधिमान्य समजले जाते. समाज प्राथमिक अवस्थेत असो वा विकसित, त्या समाजाला मान्य असलेल्या मूल्याशी नेतृत्व सुसंगत असते. समाजाच्या समस्या सोडविण्याची क्षमता असेल तरच नेतृत्व अधिमान्य होत असते. नेतृत्व विकास व बदल करण्याची सनदशीर व्यवस्था असेल तर नेतृत्वाचे स्थैर्य आढळून येते. नेतृत्व, जबाबदारी व उत्तरदायित्व इ. चा समतोल लोकशाही चांगल्या पद्धतीने असल्याने लोकशाहीत नेतृत्वाला अधिमान्यता जास्त प्रमाणात असते. नेमणुका व भरतीवरही नेतृत्वाची अधिमान्यता अवलंबून असते. निवडणुका आणि नेमणुकाद्वारे निर्माण होणारे नेतृत्व अधिमान्य स्वरुपाचे मानले जाते. लोकांच्या वतीने बोलण्याचा अधिकार अशा नेतृत्वाला प्राप्त होतो. त्या नेत्याला राष्ट्राचा म्हणून ओळखले जाते. प्रतिकात्मक नेतृत्व निरनिराळया संस्था व शिष्टमंडळाना भेटत असल्यामुळे लोकांना त्यांच्या कामाविषयी एक प्रकारे समाधान वाटते. भेटीद्वारे लोकांचा विश्वास संपादन केला जातो. नेतृत्वाची अधिमान्यता त्याने घेतलेले निर्णय आणि ते अंमलात आणण्याची शक्ती यावर आधारित असते. उक्ती आणि कृतीत यात मेळ साधण्यावर अधिमान्यता अवलंबून असते.

राजकीय नेतृत्वाची अधिमान्यता तणावपूर्ण वातावरणात डळमळीत होते. नेत्याचे नैतिक जीवन व चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला किंवा भ्रष्ट्राचारी व्यवहार प्रकट केल्यास अधिमान्यता संशयास्पद बनते. जनता आणि कर्मचारी वर्गात संपर्क नसल्यास अधिमान्यतेत अडचणी येतात. कधीकधी नेत्याकडून कार्याची अवास्तव अपेक्षा केली जाते. प्रशासकीय कायदयाची चौकट नेत्याच्या कार्यातील मोठी अडचण असते. एखादया नेत्याला पदानुरूप प्रभाव पाडता येत नाही. अशावेळी नेता अपयशी ठरून त्यांची अधिमान्यता धोक्यात येते. वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरध्वनी इ. जनता संपर्क माध्यमाचा वापर करून नेतृत्व अधिमान्यतेच्या मार्गातील बऱ्याच अडचणी दूर करू शकतो.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

१. राजकीय श्रेष्ठीजन म्हणजे काय?
उत्तर- रॉबर्ट ढालच्या मते राजकीय संघर्षाच्या निराकरणात ज्या विशिष्ट लोकांच्या पसंतीनुसार सातत्याने निर्णय घेतले जातात अशाआकाराने लहान असलेल्या नियंत्रक गटास श्रेष्ठीजन म्हटले जाते.

२. राजकीय श्रेष्ठीजनांचे दोन आधार सांगा.
उत्तर- राजकीय श्रेष्ठीजनाच्या पारंपरिक घटकात जात, धर्म, लिग, वंश आणि वर्ण या घटकाच्या आधारावर आणि अर्जित घटकात वय व ज्ञानाच्या जोरावर श्रेष्ठीजन निर्माण होत असतात. म्हणून पारंपारिक आणि अर्जित घटक हे श्रेष्ठीजन निर्मितीतील प्रमुख दोन आधार सांगता येतात.

३. प्रतिश्रेष्ठीजन म्हणजे काय?
उत्तर- प्रतिश्रेष्ठीजन म्हणजे जे निवडुन आलेले आहेत पण बहुमत नसल्यामुळे विरोधात बसावे लागते किंवा सत्तेवर असलेल्या सत्ताधारी गटाला विरोध करणाऱ्यांना प्रतिश्रेष्ठीजन असे म्हणतात.

४. राजकीय श्रेष्ठीजनाचे अभिसरण वा बदल कोणत्या कारणामुळे होते ते लिहा.
उत्तर- श्रेष्ठीजनाचे अभिसरण राजकीय भरती, निवडणुका, सामाजिक व आर्थिक परिस्थिती होणाऱ्या बदलामुळे होत असते.

५. राजकीय नेतृत्वाचे आधारभूत घटक कोणते?
उत्तर- नेता, अनुयायी, नेतृत्वासाठी आवश्यक परिस्थिती आणि नेत्याचे कार्य हे राजकीय नेतृत्वाचे आधारभूत घटक मानले जातात. या घटकांच्या आधारावर नेतृत्व अवलंबून असते.

६. राजकीय नेतृत्वासाठी आवश्यक असलेले दोन गुण लिहा.
उत्तर- गुणसमुच्चय, पर्यावरण, असामान्यत्व, वस्तुनिष्ठता आणि सहानुभूती हे गुण राजकीय नेतृत्वासाठी आवश्यक मानले जातात.

७. राजकीय नेतृत्वाची दोन वैशिष्टये लिहा.
उत्तर- दूर अंतरावर असलेले नेतृत्व, अनेक कार्यभार पार पाडणारे नेतृत्व, विधिनिहीत नेतृत्व, संस्थात्मक व्यवहार हे राजकीय नेतृत्वाची दोन वैशिष्टये सांगता येतात.

८. राजकीय नेतृत्वाची अधिमान्यता कोणत्या घटकावर अवलंबून असते ते सांगा.
उत्तर- सर्व सामान्य जनतेच्या आंकाक्षापूती करणारे, समाज मूल्याशी संसुगत वर्तन करणारे, सामाजिक समस्या सोडविण्याची क्षमता, जबाबदारी व उत्तरदायित्व मानणारे नेतृत्व अधिमान्य समजले जाते.

९. नेतृत्वाच्या कार्याचे कोणते दोन भाग पडतात.
उत्तर- राष्ट्राचा नेता आणि शासकीय नेता हे नेतृत्वाच्या कार्याचे दोन भाग पडत असतात.

१०. राजकीय नेतृत्व विचारसरणीचा आधार का घेतात दोन कारणे कोणती?
उत्तर- आपला राजकीय प्रभाव वाढविण्यासाठी, सत्तेला अधिमान्यता मिळविण्यासाठी, राजकीय व्यवस्थेला स्थैय प्राप्त करून देण्यासाठी राजकीय नेतृत्व विचारसरणीचा आधार घेत असतात.

## प्रकरण ३ रे
## राजकीय संसूचन

**प्र.१ ला राजकीय संसूचनाची व्याख्या सांगुन राजकीय संसूचनाचे कार्य व महत्त्व स्पष्ट करा?**

कोणत्याही शासनाला आधिमान्यता मिळविण्यासाठी जनता व शासन यात समन्वय निर्माण करण्यासाठी राजकीय संसूचन ही महत्त्वाची प्रक्रिया करावी लागते. प्राचीन काळी दंवडी देऊन किंवा राजदूत पाठवून सत्ताधारी लोक विशिष्ट संदेश लोंकापर्यंत पोहचवत असत. राजकीय व्यवस्थेच्या रचनेचा अभ्यास करतांना व्यवस्थेच्या रचनेमध्ये वेगवेगळे विभाग असतात. या विभागाना संसूचन माध्यमाच्या माध्यमातून एकमेकांना जोडले जाते. जनतेच्या मागण्या शासनापर्यंत पोहचविणे त्याला आदान म्हणतात. या आदानावर शासनाने निर्णय घेतल्यास त्याला प्रदान असे म्हणतात. ते प्रदान जनतेपर्यत पोहचते. त्यावर जनता प्रतिकुल वा अनुकूल प्रतिक्रिया देते त्याला प्रत्यादान असे म्हणतात. ते शासनापर्यंत पोहचवणे हे संसूचनाचे काम करते. आदान प्रदान व प्रत्यादान चक्राद्वारे राजकीय संसूचनाचे कार्य सतत चालू असते. आधुनिक काळात लोकशाही व सर्वंकष प्रकारच्या दोन्ही व्यवस्थांत शासनास सनदशीरता प्राप्त व्हावी म्हणून संसूचन माध्यमांच्या सहाय्याने लोकमत अनुकूल बनविण्याचा प्रयत्न मोठया प्रमाणात केला जातो.

**राजकीय संसूचन अर्थ व व्याख्या-**

राजकीय व्यवस्था ही लोकांतील विशिष्ट संबंधातून साकार होत असते. व्यवस्थेचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी व्यक्तीव्यक्तीतील संसूचन महत्त्वाचे असते. व्यक्ती स्वतःचे हितसंबंध गटाच्या माध्यमातून व्यक्त करतात. परस्परविरोधी हितसंबंधातून गट संघर्ष अस्तित्वात आल्यानंतर निर्णय केंद्राशी विविध व्यक्ती व गट संपर्क साधतात. समान हितसंबंध असणाऱ्या गटांशी संपर्क साधण्यात येतो व स्वतःच्या हितसंबंधाचे महत्त्व वाढविण्यात येते. निर्णय घेणाऱ्या व्यक्ती परस्परविरोधी गटांशी विचारविनिमय किंवा तडजोड समन्वय घडवून आणतात. तसेच निर्णयाची अंमलबजावणीसाठी शासन व जनता संपर्क साधण्याची आवश्यकता असते. या सर्व प्रक्रियेत वैचारिक देवाणघेवाण करण्यासाठी राजकीय संसूचनाची आवश्यकता असते.

१) **रूस व अल्थॉफ-** राजकीय दृष्टया सुसंगत माहितीचे राजकीय व्यवस्थेच्या एका भागातून दुसऱ्या भागाकडे संचलन करणे म्हणजे राजकीय संसूचन होय.

२) **रिचर्ड रोझ-** राजकीय व्यवस्थेतील भिन्न भिन्न घटकांना जोडणारा दुवा म्हणजे राजकीय संसूचन होय.

**राजकीय संसूचनाचे कार्य-** राजकीय संसूचनामुळे राजकीय व्यवस्थेतील भिन्न भिन्न घटकात संबंध प्रस्थापित होतात व सर्व व्यवस्था एकाच दिशेने कार्य करू शकते. विविध पातळीवरील शासनसंस्थात राजकीय संसूचनामुळे शक्य होते. राजकीय संसूचन Horizontal व Vertical ह्या दोन प्रकारचे असते. समान स्थानावरील व्यक्तीतील संसूचनास Horizontal संसूचन म्हणतात तर असमान दर्जातील म्हणजे नेता व अनुयायी यातील संसूचन Vertical राजकीय संसूचन असते. राजकीय संसूचन हे व्यवस्थेच्या स्थिरतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी राजकीय संसूचनाला पुढील कार्य पार पाडावी लागतात.

१. **व्यवस्थेच्या विविध भागात समन्वय घडवून आणणे-** राजकीय व्यवस्थेच्या अंतर्गत अनेक उपव्यवस्था असित्वात असतात. त्या उपव्यवस्थेत समन्वय नसेल तर व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर विपरित परिणाम होऊ शकतो. उदा. संसदेत कायदेनिर्मितीसाठी विविध समित्या अस्तित्वात असतात. त्या समितीत समन्वय नसल्यास कायदे निर्मितीच्या कार्यावर विपरित परिणाम होईल. राजकीय व्यवस्थेत संघर्ष निर्माण झाल्यास त्यांचे निराकरण करावे लागते. संघर्ष निराकरण करण्याचे माध्यम म्हणून संसूचन कार्य करित असते. विविध व्यवस्थेत निर्माण झालेले संघर्ष त्या व्यवस्थेचे प्रतिनिधी प्रत्यक्षात चर्चा करून संघर्षाचे निराकरण करू शकतात आणि हे राजकीय संसूचनामुळे शक्य असते. राजकीय सूसंचनाच्या अभावातून संघर्ष तीव्र रूप धारण करू शकतात. उदा. कामगार व मालक योग्य संसूचनाच्या अभावामुळे संघर्षातून संपासारख्या साधनाचा वापर करून कामगार कारखान्यातील उत्पादन थांबवू शकतात. व्यवस्थेतील एकजिनशीपणा हा योग्य संसूचनामुळे

अस्तित्वात येत असतो. योग्य संसूचनाच्या अभावातून व्यवस्थेतील एकजिनशीपणा नष्ट होऊ शकतो या दृष्टीने राजकीय संसूचन यंत्रणेचे महत्त्व लक्षात येते.

२. **उपव्यवस्था संगोपनाचे कार्य-** लोकांच्या राजकीय सामाजीकरणाद्वारे व्यवस्थेचे संगोपन करण्याचे प्रयत्न प्रत्येक राजकीस व्यवस्थेत होत असतो. कारण राजकीय सामाजीकरण व राजकीय संसूचन यांचा जवळचा संबंध असतो. कुटुंब, शाळा, धर्म इ. च्या प्रभावामुळे तुटक राजकीय संस्कृती निर्माण झाल्यास त्या तुटकतेतून एक नवी राजकीय संस्कृती निर्माण करण्याचे कार्य संसूचन करत असते. उदा. स्वतंत्र भारतात प्रादेशिक भाषेतील शिक्षण, वत्तृपत्र आणि प्रादेशिक भाषेतील चित्रपटामुळे स्वतंत्र भारतात प्रादेशिक भाषेचा विकास झाला. स्वतंत्र भारतात प्रादेशिक भाषा विकासामुळे प्रादेशिक निष्ठा वाढल्या. भाषावाद, भाषावार प्रांत रचना व प्रादेशिक भाषा शिक्षणाचे माध्यम असल्याने राष्ट्रीय एकात्मतेत अडथळे निर्माण होतात. अशा परिस्थितीत राष्ट्रीय एकतेची जाणीव निर्माण करण्यासाठी राजकीय संसूचन माध्यमे उपयोगात आणली जातात. त्यासाठी प्रजासत्ताक दिन, नेत्याच्या जयंत्या, विकास प्रकल्पाचे उद्‌घाटन, राष्ट्रीय इमारतीची कोनशिला, इ.गोष्टीतून विविधतेतून एकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणजेच राजकीय संसूचनामुळे जशी तुटकता निर्माण होते त्याप्रमाणे व्यवस्थेत एकात्मता विकसित होऊ शकते.

३. **व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविणे-** सर्व राजकीय व्यवस्था उपलब्ध साधनसंपत्ती व मानवी संसाधने याचा समाजकल्याणासाठी वापर करण्यासाठी समाजातील व्यक्तीच्या प्रवृत्ती बदल्याव्या लागतात. त्यासाठी राजकीय संसूचन हे समाजिक संघटनाचे महत्त्वाचे माध्यम असते. व्यवस्थेची कार्यक्षमता व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. आल्मंडच्या मते कार्यक्षमतेतील वाढ जनता संसूचन माध्यमाचा समाजातील सर्व स्तरात शिरकाव, राजकीय पक्षाद्वारे नवीन दृष्टिकोनाचा प्रसार व मोठया प्रमाणावर शैक्षणिक उपाययोजना इत्यादीवर अवलंबून असते. उदा. भारतात आर्थिक नियोजन यशस्वी करावयाचे असेल तर साधनसामुग्रीच्या वापराबरोबर हिंदू मुस्लिमानाच्या दृष्टिकोणात व प्रवृत्तीत बदल घडवून आणावा लागेल ते काम संसूचन माध्यमाद्वारे पार पाडावे लागते. यासोबत प्रशासन व्यवस्थेतील कार्यक्षमता किंवा राजकीय प्रक्रियेतील निर्णय घेण्याची कार्यक्षमता संसूचनावर मोठया प्रमाणात अवलंबून असते. राजकीय संसूचन साधनाची मोठया प्रमाणावर उपलब्धता विशाल आणि गुंतागुंतीच्या प्रशासन व्यवस्था योग्य रीतीने राबविणे शक्य असते.

४. **नियम निर्मितीचे कार्य-** संसूचनाचे कार्य म्हणजे रूपांतराचे कार्य असते. समाजातील कच्चा मालाचे रूपांतर पक्का मालात करणे आवश्यक असते. ते काम संसूचन करत असते. लोकांच्या विविध मागण्या स्पष्ट करून धोरण विषयक निर्णय घेणे हे महत्त्वाचे काम असते. त्यामुळे लोकांच्या मागण्या योग्य रितीने स्पष्ट होणे आवश्यक असते. त्यावर निर्णय प्रक्रिया अवलंबून असते. जनतेच्या मागण्या निर्णय केंद्रापर्यंत योग्य रितीने पोहचवाव्या लागतात. त्या कार्यात संसूचन माध्यमाची प्रमुख भूमिका पार पाडतात. निर्णय केंद्रापर्यंत माध्यमानी न पोहचविल्यास निर्णय केंद्रास मागण्याचे आकलन होत नाही. उदा. आणीबाणीच्या काळात प्रसार माध्यमावर इंदिरा गांधीनी कडक नियंत्रण ठेवल्यामुळे त्यांना लोकमताचा अंदाज येऊ शकला नाही त्यांचा परिणाम त्यांचा निवडणुकीत पराभव झाला. म्हणून निर्णय केंद्रापर्यंत नीट जाणे आवश्यक असते यात संसूचन माध्यमाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. उदा. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी पुरेशी स्पष्ट असली तरी राष्ट्रीय पातळीवरील निर्णय केंद्रापर्यंत मध्यस्थ माध्यमातून पुरेशी स्पष्ट न झाल्याने निर्णय केंद्राने संयुक्त महाराष्ट्रा ऐवजी द्विभाषिक मुंबई राज्याचा पर्याय पुढे ठेवला त्यातून महाराष्ट्रात काँग्रेसविरुद्ध निर्माण झाला.

५. **लोकशाही व्यवस्था सुकर बनविणे-** संसूचनाचे महत्त्व सर्वच व्यवस्थात असले तरी लोकशाही ते सर्वाधिक असते. लोकशाहीत संसूचनाला जास्त महत्त्व असते. जनतेचा राजकीय सहभाग किती व कशा प्रकारचा आहे यावर लोकशाहीचे यश व परिणामकारकता अवलंबून असते. जनता राजकीयदृष्टया उदासीन वा विचार स्वातंत्र्यावर बंधने असतील तर राजकीय सहभागाचे प्रमाण कमी होऊन शासन संस्थेचे लोकावरचे नियंत्रण कमी राहील. ही गोष्ट राजकीय संसूचनाच्या योग्य नाही. लोकशाहीत विशिष्ट काळात निवडणुका होतात.

त्यावेळी लोकांच्या मतदान निर्णयावर संसूचन माध्यमे प्रभाव टाकतात. निवडणुकीचे वातावरण तापविणे. निवडणूक निकालाविषयी उत्सुकता निर्माण करणे इ.बाबत माध्यमाचा फार मोठा फार वाटा असतो. माध्यमामुळे राजकीय सहभाग वाढत असल्यामुळे लोकशाहीच्या यशासाठी संसूचन माध्यमे महत्त्वाची असतात. निवडणुकीनंतरच्या काळातही विशिष्ट लोकमत निर्माण करण्यात विरोधी पक्षांना यश मिळाल्यास शासनावर नियंत्रण राहू शकते म्हणून लोकशाही संसूचन माध्यमे महत्त्वपूर्ण असतात.

**प्र.२ रा राजकीय संसूचनाची मार्ग, साधने व माध्यमे सांगा?**

**किंवा**

**लोकमत निर्मितीची माध्यम व साधने स्पष्ट करा?**

**किंवा**

**जनता संसूचन माध्यमे स्पष्ट करा?**

राजकीय स्वरूपाची वैचारिक देवाणघेवाण ही राजकीय संसूचनाच्या अनेक प्रकारच्या माध्यमांतून होत असते. यात वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरचित्रवाणी ही सर्व परिचित असली तरी या माध्यमाशिवाय इतर माध्यमे देखील राजकीय संसूचन घडवून आणण्यामागे प्रभावी भूमिका बजावित असतात.

१) **वृत्तपत्रे -** संसुचनाची अनेक माध्यमे असतांना देखील वर्तमानपत्राचे महत्त्व कमी झालेले नाही. साक्षरामध्ये हे माध्यम विशेष प्रभावी असते. वर्तमानपत्रात दैनिक, साप्ताहिक, मासिके इ. चा समावेश होतो. छपाई कलेचा शोध लागल्यानंतर वर्तमानपत्राचा झपाटयाने प्रसार झाला. दररोज लक्षावधी लोकाकडून वर्तमानपत्र वाचली जातात. लोकशाही व हुकूमशाही व्यवस्थामध्ये वर्तमानपत्र लोकनिर्मितीचे प्रभावी साधन आहे. वर्तमानपत्राचे स्वातंत्र्य लोकशाहीत महत्त्वाचे मानले जाते. बातम्या प्रसारावर शासनाचे नियंत्रण असले तरी खाजगी मालकीची वर्तमानपत्रे बऱ्याच देशात दिसून येतात. वर्तमानपत्राचे वाचक बहुदा निश्चित असतात. उदा. तरूण भारत वाचणारा वाचक बहुदा भाजपला मतदान करतो. निवडणुकीच्या वेळी हे माध्यम अधिक क्रियाशील असते. संपादकीय, अग्रलेख, व्यंगचित्र, जाहिरनामा, छायाचित्रण इत्यादीद्वारे वृत्तपत्रे लोकमतावर प्रभाव टाकण्याचे कार्य करतात. जनतेच्या मागण्या शासनापर्यंत नेणे व शासनाचे कार्यक्रम जनतेपर्यंत नेणे हे दूहेरी स्वरूपाचे कार्य देखील वर्तमानपत्र करतात. लोकमताच्या जडणघडणीमध्ये वृत्तपत्राचा मोठा वाटा असला तरी प्रत्येक वृत्तपत्रावर कोणत्या कोणत्या राजकीय पक्षाचा, संघटनेचा आणि तत्त्वज्ञानाचा प्रभाव असतो. पूर्णतः निपक्षपाती आणि निरपेक्ष वृत्तपत्र आढळत नाही असे असले तरी विविध मतांच्या प्रभावातून बातम्या प्रकाशित करणारे विविध वृत्तपत्रातील बातम्याचे आकलन करून योग्य तथ्यापर्यंत पोहचविता येते.

२) **आकाशवाणी-** वर्तमानपत्राच्या खालोखाल नभोवाणीला महत्त्व आहे. हे साधन निरक्षर लोकापर्यंत पोहचू शकते. ज्या देशात निरक्षरतेचे प्रमाण जास्त असते. तेथे हे माध्यम प्रभावी ठरते. या माध्यमाच्या माध्यमातून कोटयवधी लोकांना एकाच वेळेस माहिती पुरविता येते. या माध्यमाचा मुख्य उद्देश मनोरंजन असला तरी त्यासोबत लोकमत देखील घडवून आणते. बातम्या, राजकीय चर्चा व युद्ध वर्णन इ. माहिती नभोवाणीद्वारा दिली जाते. या माध्यमावर शासनाचे कठोर नियंत्रण असल्याने सत्ताधारी पक्षाला जास्त वाव दिला जातो. निवडणुकीच्या काळात सर्वच पक्षांना प्रचारासाठी वेळ व संधी दिली जाते. उपग्रह क्रांतीमुळे जगाच्या बातम्या एका सेकंदात आपल्याला कळू शकतात. सद्या हे माध्यम खाजगी झाल्यामुळे विरोधकांनाही भरपूर संधी मिळते.

३) **दूरचित्रवाणी-** हे संसुचनाचे अत्यंत प्रगत माध्यम आहे. हे दृकश्राव्य माध्यम असल्याने इतर माध्यमापेक्षा जास्त प्रभाव पडतो. अर्थात हे माध्यम अत्यंत खर्चिक असल्याने राजकीय पक्षाना याचा वापर मोठया प्रमाणावर करता येत नाही. अमेरिकेसारख्या देशात या माध्यमांचा खूप प्रभाव पडतो. उदा. १९६० मध्ये कॅनेडी व निक्सन यांच्यातील टि. व्ही. वरिल वादविवादामुळे कॅनेडीचा मतदारावर प्रभाव पडला. शासकीय योजना, बातम्या, राजकीय चर्चा व करमणूक इ. माध्यमातून दूरचित्रवाणीचे कार्य चालते. अनेक देशात सरकारचे या माध्यमावर सरकारचे नियंत्रण असल्याने सत्ताधाऱ्यांना जास्त वाव दिला जातो. अर्थात खाजगी चॅनल्स सुरू झाल्यामुळे

विरोधकांना ही भरपूर संधी मिळते. हे माध्यम एकाच वेळेस माहितीचे विश्लेषण व दृश्य स्वरूपाचे चित्र दाखवत असल्याने इतर माध्यमापेक्षा जास्त प्रभाव निर्माण करते. हे माध्यम अत्यंत प्रभावी असले तरी ते अतिखर्चिक असल्यामुळे भांडवलदार वर्ग या माध्यमाचा उपयोग करून आपले तत्त्वज्ञान रूजविण्याचा प्रयत्न करत असतो. तसेच निवडणुकी कार्यात या माध्यमाचा प्रभाव पडल्यामुळे निवडणुका मोठया प्रमाणावर खर्चिक होण्यास हातभार लागलेला दिसतो.

४) **चित्रपट व नाटके-** ही माध्यमे मनोरंजनाची साधने असली तरी आधुनिक काळात या माध्यमाचा वापर राजकीय संसूचनासाठी मोठया प्रमाणावर केला जातो. राजकीय संसूचनामध्ये चित्रपट व नाटके यांना महत्त्वाचे स्थान आहे. एकच चित्रपट एकाच वेळेस अनेक ठिकाणी दाखवितो येतो. चित्रपटांना राजकीय शिक्षणाचे मूल्य असू शकते. राजकीय विचारप्रणालीचा प्रचार चित्रपटांद्वारा होऊ शकतो. चित्रपटाद्वारे किंवा नाटकाद्वारे एखादा उपदेश वा संदेश जनते पर्यंत प्रभावीपणे पोहचविता येतो. त्याचा प्रभाव जनतेवर खूप मोठया प्रमाणावर पडतो. या साधनामुळे मनोरंजनाबरोबर एखादा उपदेशही देता येतो. या माध्यमावर सरकारचे कडक नियंत्रण असते. सामाजिक राजकीय मूल्य प्रसारित करणाऱ्या माध्यमाला सरकारची संमती आवश्यक असते. सरकारला नको असलेल्या कलाकृतींना सरकार सेन्सॉरच्या माध्यमातून कात्री लावत असतो. उदा.इंदिरा गांधीच्या काळात आंधी चित्रपटावर बंदी लादली होती. चित्रपट आणि नाटकाशिवाय सरकारच्या नभोवाणी खात्यामार्फत तयार केल्या जाणाऱ्या लधुपटाच्या माध्यमातून देखील राजकीय संसूचन साधनाचा प्रयत्न केला जात असतो.

५) **लोकनेते-** राष्ट्रीय, राज्य व स्थानिक पातळीवर काही नेते आपल्या व्यक्तिमत्वाने किंवा भाषणाने जनतेवर प्रभाव पाडून लोकमत तयार करीत असतात. यांना लोकनेते असे म्हणतात. राजकीय संसूचनामध्ये राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्त, स्वयंसेवी संघटनाचे कार्यकर्त, शासकिय अधिकारी, शिक्षक, किर्तनकार व समाजसेवक इ. लोकमत निर्मितीचे कार्य करतात. आपली राजकीय भूमिका लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न करतात. तसेच विरोधकांच्या भूमिकेचेही खंडन करण्याचा प्रयत्न करतात. इंदिरा गांधी सारख्या राष्ट्र नेत्याचा लोकमतावर खुप प्रभाव होतो.

६) **कायदेमंडळाचे सभासद-** अप्रत्यक्ष लोकशाहीत प्रतिनिधीच्या मार्फत राज्यकारभार चालतो. प्रतिनिधी ज्या भागाचे नेतत्व करतात. तेथील लोकांचे प्रश्न सरकारकडे नेतात. मतदारसंघ, स्थानिक शासन, पक्षिय यंत्रणा, शासकिय यंत्रणा इत्यादी महत्त्वपूर्ण राजकीय घटकाशी विधिमंडळाचा सदस्याचा संबंध येत असतो. सरकार व जनता यातील दुवा म्हणून काम करतात. आपला प्रभाव वाढविण्यासाठी किंवा पक्षाचा कार्यक्रम पटवून देण्यासाठी जनसंपर्क दौरा काढून लोकांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन लोकमत घडविण्याचे कार्य प्रतिनिधी करतात.

७) **प्रत्यक्ष संपर्क, सभा व संभाषणे-** प्रत्यक्ष जनसंपर्काने जे राजकीय संसूचन साधले जाते ते अधिक परिणामकारक असते. प्रत्यक्ष भेटीमुळे वैचारिक देवाण घेवाण होते. लोकाच्या शंका दूर करून आपली मते पटवून देता येतात. अर्थात सर्वाच्या प्रत्यक्ष भेटी घेणे शक्य नसते. त्या ऐवजी सार्वजनिक सभा घेऊन नेते मंडळी लोकमत निर्मितीचा प्रयत्न करतात. सभेत आकडेवारी, घोषणाबाजी व भावनिक प्रश्नाचा अवलंब करून नेते मंडळी लोकमत आपल्याला अनुकूल करून घेतात.

८) **राष्ट्रीय दौरे-** प्रत्येक देशाचे राष्ट्रीय नेते संपर्क वाढविण्यासाठी निवडणुकीच्या काळात देशभर दौरे काढतात. दौऱ्यामुळे त्याचे व्यक्तिमत्व उजळते. लोकमतावर चांगला परिणाम होतो. संसदीय पद्धती पंतप्रधान किंवा निवडणुकीत पंतप्रधान पदासाठी घोषित केलेल्या उमेदवाराचा दौरा विशेष उल्लेखनीय मानला जातो. विरोधी पक्षातील नेते लोकमत आपल्या बाजूकडे वळवून घेण्यासाठी राष्ट्रीय दौरे काढत असतात. भारतात इंदिरा गांधी व अटलबिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी यांचे दौरे विशेष गाजलेले दिसतात. हवाई वाहतुकीमुळे देशभर दौरे काढणे आणि देशाच्या काना कोपऱ्यात जनसंपर्क प्रस्थपित करणे सोपे झाले आहे. जनतेशी प्रत्यक्ष संपक साधणे आणि आपली भूमिका मांडणे हा दौऱ्यामागील उद्देश असतो. भारतात लोकसभा निवडणुकीच्या काळात

राष्ट्रीय नेते दौरे, रोड शो, सभा इत्यादीच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर लोकमत घडवून आणण्याचा प्रयत्न करतात.

९) **शासकीय समित्या आणि चौकशी आयोग-** राजकारणातील वाद्ग्रस्त घटनेची चौकशी करण्यासाठी शासनाकडून चौकशी आयोग नेमला जातो. किंवा एखादया प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली जाते. समिती वा आयोग ज्या कारणासाठी नेमला असेल त्या कारणाची चौकशी करण्यासाठी व माहिती मिळविण्याकरिता त्या परिसरात जाते. लोकाशी विचारविनिमय करून माहिती गोळया केली जाते. घटनेशी संबंधित लोकाच्या साक्षी घेतल्या जातात. कागदपत्राचे विश्लेषण केले जाते. त्या आधारावर अहवाल तयार करून शासनाला सोपविला जातो. शासन तो अहवाल कायदेमंडळात मांडते. कायदेमंडळातील चर्चा प्रसिद्धी माध्यमापर्यंत प्रसारित केली जाते. जनता देखील आपल्या प्रतिक्रिया देते. त्यातून लोकमताची निर्मिती होते.

**प्र.३ रा लोकमत म्हणजे काय ते सांगुन लोकमत निर्मितीची प्रक्रिया स्पष्ट करा?**

ग्रीक नगरराज्य व रोमन साम्राज्याच्या काळात लोकमत या संज्ञेच्या समानार्थी संज्ञा वापरल्या जात असल्या तरी लोकमत ही संकल्पना आधुनिक राज्य व लोकशाहीच्या विकासातून उदयाला आलेली आहे. लोकमत शब्द १८व्या शतकात प्रचलित झाला. लोकशाहीच्या विकासाबरोबर लोकमताचे महत्त्व वाढले. लोकांमध्ये निर्माण झालेल्या राजकीय जाणीव जागृतीतून लोकमत ही संकल्पना अर्थपूर्ण बनली आहे. उदारमतवादी लोकशाहीतून विकसित झालेल्या सार्वत्रिक प्रौढमताधिकार तत्त्वातून लोकमत निर्मितीच्या दृष्टीने पोषक ठरलेल्या दिसतात. आधुनिक काळात शासन हे लोकमताला जबाबदार असते. लोकमत शब्दात दोन शब्दाचा समावेश आहे. लोक आणि मत दोघांचा अर्थ संदिग्ध आहे. लोक म्हणजे किती लोक, कोणते लोक तर मत म्हणजे काय? मत म्हणजे एकमत की बहुमत याचा निश्चित अर्थ सांगणे अवघड आहे. लोक शब्दाचा अर्थ सर्व लोक असा न होता विशिष्ट प्रश्नाशी जे लोक निगडित असतील त्या प्रश्नासंदर्भात संगोपाग चर्चा करून अनुकूल किंवा प्रतिकूल मत तयार करतात त्या मताला लोकमत असे म्हणतात. विशिष्ट प्रश्न वा घटनेबद्दल समुदायाचा वा गटाचा जो आवाज वा सूर असतो त्याला लोकमत असे म्हणतात.

**लोकमत संकल्पना व्याख्या-**

लोकमत शब्दांत अनेक अर्थ लपलेले असल्याने लोकमताची निश्चित व्याख्या करणे निश्चित अवघड आहे. लोकमत म्हणजे बहुसंख्याकांचे मत नसते तसेच समाजातील सर्व व्यक्तींच्या मतांचा संसच नसते. लोकमत निर्माण होण्यासाठी एखादी घटना घडावी लागते व त्या घटनेच्या संदर्भात लोकांच्या व्यक्त केलेल्या प्रतिक्रियातून लोकमत निर्माण होते. लोकमताची व्याख्या करतांना विशिष्ट घटनेच्या किंवा प्रकरणाच्या संदर्भात करावी लागते. विशिष्ट प्रकरणांच्या लोकांचे दृष्टिकोन, श्रद्धा व मूल्य व्यक्त होतात. म्हणजेच घटनेची जाणीव व परस्परांत त्याविषयीच्या वैचारिक देवाण-घेवाणातून लोकमताची निर्मिती होते. त्यामुळे सार्वजनिक स्वरूपाच्या विशिष्ट प्रश्नावर लोकांमध्ये असलेला दृष्टिकोन व त्यांचे मते यांच्या समुच्चयाला लोकमत असे म्हणता येईल. लोकमतातून लोकांच्या एखाद्या विशिष्ट प्रकरणविषयीचा समान दृष्टिकोन व्यक्त होत असतो. लोकमतातून दिशा व्यक्त होते. लोकांची अनुकूलता किंवा प्रतिकूलता व्यक्त होते. सार्वजनिक दृष्टया महत्त्वाच्या बाबीवर अनुकूल व प्रतिकूल अशी दोनही प्रकारची मते असू शकतात किंवा काही प्रमाणात अनिश्चितता असू शकते.

१) **किम्बाल यंग-** एखादया विशिष्ट वेळी लोकांचे जे मत असते ते लोकमत होय.

२) **लॉवेल-** सुबंध लोकांना मान्य होण्यासारखा दोन किंवा दोनापेक्षा जास्त विसंगत विचारप्रवाहापैकी जो विचारप्रवाह बहुसंख्य लोकांना मान्य आहे तो विचारप्रवाह म्हणजे लोकमत होय.

३) **जॉन लॉक-** सार्वजनिक धोरणाची निर्मिती, नियंत्रण, अंमलबजावणी व चिकित्सा या प्रक्रियांमधील लोकांचा सहभाग म्हणजे लोकमत होय.

४) **एच.एल. चाइल्डस-** समूहाच्या सदस्यांनी वा लोकांनी शब्दांत अभिव्यक्त केलेल्या आपल्या अभिव्यक्तींना लोकमत असे म्हणतात.

**टिप- लोकमत निर्मितीची प्रक्रिया-** लोकमत हे अलगपणे किंवा तुटक अवस्थेत निर्माण होत असते. लोकमत निर्मितीवर रूढी, परंपरा व समाजातील मूलभूत विचारसरणीचा प्रभाव पडतो. समाजाची मूलभूत विचारसरणी सदैव सुप्त स्वरूपात अस्तित्वात असते ती लोकमतातून व्यक्त होत असते. त्यामुळे लोकमताबदल साधारणतः अंदाज व्यक्त करता येऊ शकतो. लोकमताची निर्मिती संसूचन प्रक्रियेवर मोठया प्रमाणावर अवलंबून असते. समाजात संसूचन माध्यमे किती व कशा प्रकारची आहेत यावर लोकमताची निर्मिती अवलंबून असते. कारण ज्या प्रकरणावर लोकमत तयार होते ते प्रकरण लोकांपर्यत पोहचवावे लागते. त्यासाठी संसूचन माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात. लोकमत निर्माण होण्याची प्रक्रिया मानसिक असते. लोकमत निर्मितीसाठी लोकांचा दर्जा व नेतृत्व देखील आवश्यक असते. लोकमताची निर्मिती समाजातील एखादया थोडया गटात सुरू होतेआणि बऱ्याच लोकांनी तो विचार मान्य केल्यानंतर त्याचे लोकमतात रूपांतर होते. लोक एखादया प्रकरणाबद्दल उलट सुलट विचार मांडतात त्यातूनही लोकमत तयार होते. उदा.दाभोळ येथे विजनिर्मिती प्रकल्प उभारण्याचा निर्णय झाल्याबरोबर लोकांनी विरोध दाखविला व त्यातून पुढे राज्यभर एरॉन्स विरोधात लोकमत तयार झाले.

**लोकमत निर्मितीच्या पायऱ्या-** प्रा.डेव्हिसन यांनी लोकमत निर्मितीच्या पुढिल पायऱ्या सांगितल्या आहेत.

१) एखादया घटनेतून समाजात एखादा प्रश्न निर्माण होतो. उदा. पक्ष प्रतिनिधीच्या पक्षांतरामुळे पक्षांतर विरोधी विधेयक व कायदे याबद्दल समाजात चर्चा सुरू झाली.

२) लोकांच्या निरनिराळया गटात त्या प्रश्नावर चर्चा होते. हितसंबंधी गट आणि व्यक्ती यात प्राथमिक स्वरूपाची चर्चा सुरू होते.

३) एखादया नेत्याकडून त्या विषयावर विचार मांडले जातात.त्या विचाराच्या आधारावर लोक चर्चा करतात.

४) गटात होणारी चर्चा समाजात पसरते व त्या विषयावर सर्वेत्र चर्चा होते.

५) त्या विशिष्ट प्रश्नाबद्दल लोकांचा दृष्टिकोण तयार होतो.

६) पूर्वीचा अनुभव लक्षात घेऊन लोक दृष्टिकोण निश्चित करतात आणि त्या दृष्टिकोणानुसार लोकांची कृती होते.

लोकमत घडविणाऱ्या काही पायऱ्या प्रा.डेव्हिडसने सांगितल्या असल्या तरी त्या क्रमाने लोकमत घडेल या विषयी शंका असली तरी लोकमतासाठी पुढील गोष्टी आवश्यक मान्यल्या जातात. लोकांचे विचार वाहनासाठी संसूचन सोयी अस्तित्वात असाव्या लागतात. इतराशी संबंध प्रस्थापित करण्याचे वा संपर्क साधण्याचे स्वातंत्र्य असावे लागते. लोकांमध्ये सार्वजनिक प्रश्नावर विचार करण्याची पात्रता असली पाहिजे. सार्वजनिक प्रश्नाबद्दल नागरिकात रस वा जागृती असावी लागते. एखादी महत्त्वाची वा गंभीर घटना अस्तित्वात यावी लागते. त्या घटनेबद्दल जागृती निर्माण करणारी एखादी व्यक्ति पुढे यावी लागते किंवा एखाद्या गटाला पुढाकार घ्यावा लागतो. कारण लोकमत निर्मिती सर्व व्यक्तीचा समावेश नसतो तर थोडयाच व्यक्ती समावेश असतो. या सर्व गोष्टी अस्तित्वात आल्यास लोकमत तयार होते. म्हणून ग्रामिण भागापेक्षा शहरी भागात, अविकसित देशापेक्षा विकसित देशात लोकमताची निर्मिती जलद गतीने होते.

**प्र.४ था. लोकमततील बदल घडवून आणणारे घटक स्पष्ट करा?**

लोकमत हे तात्पुरते व विशिष्ट प्रसंगापुरते मर्यादित असते. ते कधीही स्थिर किंवा कायमस्वरूपी नसते त्यात नेहमी बदल होत असतो. लोकमतात बदल घडून आल्यास लोकशाही व्यवस्थेत एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे सत्ता गेल्याचे दिसून येते. उदा.१९७७ निवडणूकीत जनता पक्ष तर १९८० च्या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाचा विजय झाला. रस्किनच्या मते, प्रत्येक चित्राचे व ग्रंथाचे चाहते अलग अलग असतात त्याप्रमाणे प्रत्येक प्रसंगात विविध प्रकारचे लोकमत व्यक्त होते. त्यामुळे लोकमत बदलाची पुढील कारणे व घटक सांगता येतात.

**१) परिस्थितीतील बदल-** परिस्थितीत काळाप्रमाणे नेहमी बदल होत असतो. द१९४७ च्या वेळेस असलेली भारताची परिस्थिती आणि २०१० मधील परिस्थिती यात खूप बदल झालेला आहे. त्यामुळे त्या वेळेचे लोकमत आज असणे शक्य नाही. देशाचा आर्थिक विकास, शिक्षण प्रसार, संसूचन माध्यमातील वाढ, राजकीय व प्रशासकीय संस्थाचा वापर, इ. मुळे राजकीय सहभाग व हक्कविषयक नव्या जाणीवा निर्माण झाल्यामुळे लोकमतात

बदल झाला आहे. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात निर्माण केलेल्या घटनेतील कालबाहय कायदे रद्द केले पाहिजे हा विचार मांडला जाऊ लागला आहे. हे लोकमततातील बदल परिस्थितीच्या बदलामुळे झाले.

**२) नेतृत्वाचा प्रभाव-** नेतृत्वाच्या प्रभावामुळे ही लोकमतात बदल घडून येतो. नेतृत्वाचा प्रभाव इतरांपेक्षा जास्त पडत असतो. सर्वसाधारण व्यक्तिच्या मतापेक्षा पंतप्रधानाच्या मताला जास्त महत्त्व असते. नेतृत्व व आकर्षित व्यक्तिमत्व यांचा लोकमतावर खूप प्रभाव पडतो. उदा.इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखाली बांगलादेश युद्धात भारताला विजय मिळाल्यामुळे १९७१च्या निवडणूकीत त्यांच्या नवकाँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले आणि त्यांची तुलना दुर्गा देवीशी  केली जाऊ लागली. भारतात लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेला अनुकूल लोकमत बनविण्यात नेहरूच्या नेतृत्वाचा मोठा राहिलेला दिसतो.

**३) घटनांचा प्रभाव-** एखादी विशिष्ट घटना घडल्यामुळे लोकमतात बदल होऊ शकतो. भारतीयाच्या मनात चीन बद्दल सहानुभूती होती मात्र १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केल्यामुळे चीन बद्दलची सहानुभूती कमी झाली. १९६६ मध्ये लोकमत विषयक राष्ट्रीय संस्थेने केलेला एका अभ्यासात १९६५ साली झालेल्या भारत-पाक युद्धामुळे रशिया व ब्रिटन विषयीच्या दृष्टिकोनात बदल होऊ लागला. ताश्कंद करार करण्यात रशियाने बजावलेल्या भूमिकेतून रशियाविषयी भारतीय जनतेत ममत्व निर्माण झाले होते. याचा अर्थ विशिष्ट घटनेतून लोकमत निर्मितीला चालना मिळत असते.

**४) संसूचन माध्यमाचा प्रभाव-** वर्तमान पत्रे, रेडिओ, टि.व्ही., राजकीय पक्षाच्या प्रचार मोहिमा इ.माध्यमे लोकमत निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण मानली जातात. या माध्यमाच्या माध्यमातून प्रकाशित होणारी माहिती खरी व विश्वसनीय मानण्याची प्रवृत्ती लोकांमध्ये मोठया प्रमाणावर दिसते. या माध्यमानी बातम्या प्रसारित करतांना आशयात बदल केला तरी लोकमतात बदल होण्याची शक्यता असते. संसूचन माध्यमांमुळे लोकमतात बदल होत असल्याने राजकीय पक्ष व नेते माध्यमांना महत्त्व देतात. संसूचन माध्यमाचा प्रसार ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात अधिक असल्यामुळे शासनविरोधी व लोकमताला अनुकूल चळवळीची सुरूवात शहरी भागात होताना दिसते.

वरिल घटकामुळे लोकमतात बदल होत असला तरी लोकमताचाही वरील घटकावर प्रभाव पडत असतो. उदा.पंडित नेहरूचे व्यक्तिमत्व कितीही मोठे असले तरी चीन युध्दात पराभव झाल्यामुळ इच्छा नसतांना त्या वेळेचे संरक्षण मंत्री श्री .कृष्ण मेनन यांचा राजीनामा घ्यावा लागला.हा निर्णय नेहरूनी लोकमताच्या दबाबातून घेतला होता. अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट कितीही लोकप्रिय असले तरी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे न्यू डील कार्यक्रम अंमलात आणू शकले नाही. लोकमताच्या विरोधामुहे अनेक लोकप्रिय नेत्यांनाही पदत्याग करावा लागल्याची उदाहरणे आहेत. लोकमता बदल होण्यासाठी काही घटक प्रभावी असले तरी लोकमतामुळेही वरील घटक प्रभावित होतात हे नाकारता येणार नाही.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

१. राजकीय संसूचन म्हणजे काय?
उत्तर- रूस व अल्थॉफच्या मते राजकीय दृष्टया सुसंगत माहितीचे राजकीय व्यवस्थेच्या एका भागातून दुसऱ्या भागाकडे संचलन करणे म्हणजे राजकीय संसूचन होय.

२. लोकमत म्हणजे काय?
उत्तर- लॉवेलच्या मते, सुबुंद्ध लोकांना मान्य होण्यासारखा दोन किंवा दोनापेक्षा जास्त विसंगत विचारप्रवाहापैकी जो विचारप्रवाह बहुसंख्य लोकांना मान्य आहे तो विचारप्रवाह म्हणजे लोकमत होय.

३. राजकीय संसूचनाची दोन कार्य लिहा.
उत्तर- राजकीय संसूचन व्यवस्थेच्या विविध भागात समन्वय घडवून आणणे, व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविणे आणि लोकशाही व्यवस्था सुकर बनविणे इत्यादी कार्य करत असते.

४. राजकीय संसूचनाची दोन माध्यमे कोणती?
उत्तर- राजकीय संसूचनाची वर्तमान पत्रे, रेडिओ आणि दूरदर्शन व चित्रपटे प्रमुख माध्यमे आहेत.

५. लोकमतात बदल घडवून आणणारे दोन घटक सांगा.
उत्तर- नेतृत्वाचा प्रभाव, संसूचन माध्यमाचा प्रभाव आणि विशिष्ट घटनांचा प्रभावामुळे ही लोकमतात बदल घडवून येत असतो.

६. प्रा. डेव्हिसनने सांगितलेल्या दोन पायऱ्या कोणत्या?
उत्तर- एखादया घटनेतून समाजात एखादा प्रश्न निर्माण होतो, लोकांच्या निरनिराळया गटात त्या प्रश्नावर चर्चा होते या प्रमुख दोन पायऱ्या प्रा. डेव्हिसनने सांगितलेल्या आहेत.

७. लोकमत निर्मितीसाठी आवश्यक असलेले दोन घटक लिहा.
उत्तर- संसूचनाच्या सोयी, विचार स्वातंत्र्य, एखादी घटना घडवावी लागते हे घटक लोकमत निर्मितीसाठी आवश्यक मानले जातात.

## प्रकरण- ४ थे

## राजकीय विकास आणि राजकीय आधुनिकीकरण

### प्र .१ ला.राजकीय विकास व्याख्या, अर्थ व दृष्टिकोन आणि महत्त्व स्पष्ट करा?

आधुनिक राज्यशास्त्राच्या अभ्यासात राजकीय विकास संज्ञेला फारच महत्त्व प्राप्त झाले आहे. राजकीय परिर्वतन ही जुनी संकल्पना आहे पण राजकीय विकास त्यामानाने खूप नवी संकल्पना आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका खंडातील राष्ट्रे स्वतंत्र झाली. त्या राष्ट्रासमोर राष्ट्रीय एकता व राष्ट्रबांधणी कार्य पार पाडण्याचे आवाहन होते. त्यासाठी त्यांनी पाशीमात्य देशातील राजकीय प्रक्रिये, राजकीय मूल्य व शासन प्रणालीचा स्वीकार केला होता. त्या काळात हाच सर्वोत्तम आहे अशी भावना सार्वत्रिक होती. इंग्लंड आणि अमेरिकेतील उदारमतवादी लोकशाहीने जगाला फॅसिस्टवादापासून वाचविले ही वंदता होती त्यामुळे उत्साहाच्या भरात नवस्वतंत्र देशांनी त्यांची शासन प्रणाली स्वत:साठी स्वीकारली पण काळात हे स्पष्ट होऊ लागले की भांडवलशाहीचे अपत्य असलेली उदारमतवादी लोकशाही विकसनशील देशाचे प्रश्न सोडवूच शकत नाही. तिसऱ्या जगातील अविकसित राष्ट्रामधील पाश्चिमात्य धर्तीच्या राजकीय व्यवस्था अपयशी ठरू लागल्याचे दिसताच लोकशाही सिद्धांतकारांनी एकदम नव्या शैली व गृहितकांच्या आधारावर उदारमतवादी लोकशाहीची पाठराखण सुरू केली. त्यामागे नवस्वतंत्र राष्ट्रांनी चिकटून राहावे मार्क्सवादी विचारावर आधारित साम्यवादी पर्यायाचा स्वीकार करू नये हा त्यामागचा उद्देश होता. त्यासाठी राजकीय परिवर्तनाचे सिद्धांत आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी मांडण्यास सुरूवात केली. उदारमतवादी लोकशाहीची कास सोडल्यास अस्थैर्य, हिंसाचार व अराजक हा एक पर्याय उरतो अशी स्पष्ट मांडणी सुरू केल्यामुळे स्थैर्य, संतुलन, सातत्य आणि जैसे थै मुद्यांवर विलक्षण भर दिला. राजकीय विकासाचा अभ्यास करणाऱ्या आधुनिक अभ्यासकांचे लक्ष नवस्वतंत्र आफ्रोआशियाई व लॅटिन अमेरिका राष्ट्रांतील राजकीय घडामोडींवर होते.

नवोदित राष्ट्रानी पाशीमात्य देशातील संस्थाचा स्वीकार करून आपल्या कार्याला सुरूवात केली. पण भिन्न सामाजिक वातावरण असलेल्या विकसनशील देशात पाशीमात्य राजकीय प्रक्रिया विशेष फायदेशीर ठरू शकल्या नाहीत. त्यामुळे त्या देशातील राजकीय प्रमुखांनी पाशीमात्य दृष्टीकोन वगळून एक नव्या पद्धतीचा स्वीकार करून आपले विकासविषयक कार्य करण्यास सुरूवात केली. त्यातून राज्यशास्त्रात राजकीय विकास आणि आधुनिकीकरण संकल्पना अस्तित्वात आल्या. त्यातूनच आधुनिक राज्यशास्त्राची अभ्यास मर्यादा पाशीमात्य देशातील प्रश्नापुरती मर्यादित राहता नवोदित राष्ट्रांच्या राजकीय समस्याचाही अभ्यास व्हावा हा व्यापक वा उदार दृष्टिकोन निर्माण झाला.

**राजकीय विकास अर्थ व व्याख्या-** जगातील विविध विचारवंतानी राजकीय विकासाच्या पुढील व्याख्या केलेल्या दिसतात.

**१) आयसेन्टाड-** सातत्याने होणाऱ्या बदलास पचविण्याची क्षमता असणारी संस्थात्मक यंत्रणा निर्माण होणे म्हणजे राजकीय विकास होय.

**२) मेकंझी-** राजकीय विकास म्हणजे समाजाच्या उच्चस्तरीय अनुकुल असणाऱ्या बाबीं विषयीची अनुकू लता असण्याची क्षमता होय.

**३) अल्फ्रेड डायमंड-** विशिष्ट राजकीय परिस्थिती निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे राजकीय विकास न मानता सतत वृद्धीगत होणाऱ्या राजकीय समस्या सोडविण्यासाठी संस्था व व रचनाची उभारणी करणे म्हणजे राजकीय विकास होय.

**राजकीय विकासाचे स्वरूप-** राजकीय विकास संकल्पना व व्याख्याचा विचार करता राजकीय विकास संकल्पनेत पुढील आशय दिसून येतो.

१. **समता-** राजकीय विकास संकल्पनेत समता म्हणजे राजकीय सहभाग व समावेशन या बाबतीत सर्वांना समान संधी, कायद्याचे राज्य, कायद्याची सार्वत्रिकता व व्यक्तिनिरपेक्षता आणि जन्मतत्त्वाऐवजी गुणतत्त्वास सर्वत्र प्राधान्य हा राजकीय विकास संकल्पनेत समतेचा आशय मांडलेला आहे.

२. **राजकीय व्यवस्थेची क्षमता-** राजकीय व्यवस्थेची कार्यक्षमता राजकीय विकासातील सर्व कार्यात दिसून आली पाहिजे परंतु प्रदान कार्याची अंमलबजावणी अंमलबजावणीच्या कार्याशी विशेष प्रमाणात दिसून येते. समाजातील सर्व क्षेत्रावर प्रभाव पाडण्याची क्षमताही यात अभिप्रेत असते. ऐहिकता, तत्परता व वैचारिकता या गोष्टींना अंमलबजावणीच्या क्षेत्रात महत्त्व प्रदान केले जाते.

३. **अलगीकरण व विशेषीकरण-** संस्था व संरचनाच्या बाबतीत श्रमविभागणी केलेली असते. विशिष्ट कार्यासाठी विशिष्ट रचना अस्तित्वात असते. अलगीकरणाच्या वाढीमुळे राजकीय भूमिकांच्या बाबतीत विशेषीकरण निर्माण होते. उदा. हितसंबंधाची आविष्करण हितसंबंधी गटामार्फत तर एकत्रीकरण राजकीय पक्षामार्फत होत असते.

२० व्या शतकाच्या आरंभीच्या काळात युरोपीयन देशाच्या राजकीय संस्कृतीचा भाग होती. नवीन राष्ट्रांनी त्यांचा स्वीकार करणे म्हणजे राजकीय विकास साधणे अशीच कल्पना रूढ झाली. मात्र विचारवंतानी राजकीय विकास हा विकासात्मक सापळा ठरू नये म्हणून वरील तीनही गोष्टीत संतुलन साधण्याची गरज व्यक्त केलेली आहे.

**राजकीय विकास विविध दृष्टिकोन-** राजकीय विकास संकल्पनेबाबत विचारवंतामध्ये एकमत नाही. राजकीय विकासाचे विविध दृष्टिकोन सांगीतले जातात.

**१) राजकीय विकास म्हणजे आर्थिक विकासाचे साधन-** राजकीय परिस्थिती आर्थिक विकासाला कारणीभूत असते. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी अगोदर राजकीय विकास आवश्यक आहे असे मानले जाते पण हा राजकीय विकासाचा नकारात्मक अर्थ आहे. कारण प्रत्येक समाजाचे आर्थिक प्रश्न निरनिराळे असतात आणि त्या संदर्भात जर आपण राजकीय विकासाचा विचार करु लागला तर राजकीय विकास समाजपरत्वे भिन्न भिन्न स्वरूपाचा होऊ शकतो. अविकसित देशात आर्थिक बाबींपेक्षा राजकीय बाबींना जास्त महत्त्व असते . या देशातील लोकोचे लक्ष राजकीय विकासाकडे जास्त असते. की जो आर्थिक विकासापासून स्वतंत्र असतो. म्हणून राजकीय विकास ही संकल्पना आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून मांडली जाते.

**२) राष्ट्रराज्याचा विकास म्हणजे राजकीय विकास-** राष्ट्रराज्याची बांधणी म्हणजे राजकीय विकास असेही म्हटले जाते. पूर्वी फक्त राज्याची वैशिष्टये असलेले एक तांत्रिक रचना म्हणून राज्याकडे पाहिले जात. राज्याची ही फार जुनी संकल्पना होती. राज्याबद्दल त्या भूप्रदेशातील लोकोना जिव्हाळा आणि आत्मीयता वाटली पाहिजे. देशासाठी त्याग करण्याची तयारी दाखविली पाहिजे. म्हणून राष्ट्रराज्याचे राजकीय संस्थाच्या संदर्भात चालणारे राजकारण म्हणजे राजकीय विकास असेही म्हटले जाते.

**३) राजकीय विकास म्हणजे आधुनिकीकरण-** औदयोगिकदृष्टया संपन्न व विकसित राष्ट्रे आणि त्या देशातील पुढारलेले राजकारण म्हणजे राजकीय विकास हा विचार मांडला जातो. पाशीमात्य राष्ट्रे उदयोग प्रधान विकसित स्वरूपाची आहेत तिथे उदयोगप्रधान अर्थव्यवस्था आणि राजकीय व्यवस्था आहे. त्या देशात सामाजिक विकास घडून आला यात शंका नाही. अशा देशात विकसित प्रथा निर्माण झालेल्या दिसतात. म्हणून राजकीय विकास म्हणजे आधुनिकीकरण असाही विचार मांडल जातो. अशा देशात कायदे, नियम व राजकीय संस्थाना अतिशय प्रगत स्वरूप प्राप्त झालेले दिसते.

**४) राजकीय विकास म्हणजे प्रशासकिय व वैधानिक विकास-** ज्या राजकीय व्यवस्थेत सर्व सार्वजनिक स्वरूपाची कामे करण्याची क्षमता नसते त्या व्यवस्थेला विकसित व्यवस्था मानता येणार नाही. आज जवळजवळ सर्व राजकीय व्यवस्था निश्चितपणे प्रशासकिय व वैधानिकदृष्टया प्रगत राजकीय व्यवस्था बनलेल्या आहेत. जुन्या काळातील प्रशासकीय यंत्रणा व कायदा अत्यंत मागासलेल्या स्वरूपात होत्या. पोलिसी राज्य व संरक्षण क्षेत्रापुरता

या यंत्रणा मर्यादित होत्या. पाशीमात्य देशाच्या प्रभावामुळे या कल्पनांचा विकास झालेला आहे. ज्या ज्या मागास देशात पाशीमात्या साम्राज्य निर्माण झाले. त्या देशात नव्या नव्या प्रशासकीय व वैधानिक व्यवस्था अस्तित्वात आल्या व त्यांचा अजूनही विकास होत आहे. त्यामुळे प्रशासकीय व वैधानिक विकासाला राजकीय विकास म्हटले जाते.

**५) राजकीय विकास म्हणजे लोकांचा सहभाग-** राजकारणात जनतेचा राजकीय सहभाग म्हणजे राजकीय विकास ही संकल्पना मांडली जाते. राजकीयदृष्टया लोक जागृत बनतात व त्याच्यात नागरीकत्वाची भावना जागृत होते. तेव्हा लोकांचा दैनंदिन प्रशासनात सहभाग वाढतो. तेव्हा खऱ्या अर्थाने जनताभिमुख शासन निर्माण होईल. आधुनिक युगात लोकशाही शासन व्यवस्था असूनही अन्य प्रकारे राजकीय विकास झालेला दिसतो. उठसुट संप करणे, उपोषण करणे याला आपण खऱ्या अर्थाने राजकीय सहभाग म्हणू शकत नाही.

**६) राजकीय विकास म्हणजे लोकशाहीकरण -** लोकशाही हा अंत्यत प्रगत शासन प्रकार मानला जातो. जगातील जवळजवळ सर्वच राष्टांनी लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीला बळकटी आणून देण्याची प्रक्रिया आहे तिला राजकीय विकास म्हणतात. जगातील लोकशाहीवादी देश लोकशाही मूल्यांचा सर्वत्र प्रसार करण्याचा प्रयत्न करतात. हुकूमशाही जुना व अपरिपक्व शासन प्रकार आहे. राजकीय विकासाच्या संदर्भात लोकशाही शासनप्रकार उत्तम मानला जातो. त्यांची वाढ व बळकट करणे म्हणजे राजकीय विकास होय.

**७) राजकीय विकास म्हणजे स्थैर्य-** कोणत्याही शासनपद्धतीत स्थैर्य फार आवश्यक आहे. लोकशाही शासन प्रकार कितीही चांगला असला जरी त्याला स्थैर्य नसेल तर त्या देशाचा विकास होऊ शकणार नाही. जलदगतीने देशाचा विकास करायचा असेल तर राजकीय आणि आर्थिक स्थैर्याची गरज असते. स्थैर्य असेल तर दूरगामी धोरणे आखून नियोजनपूर्वक आणि सुव्यवस्थिपणे देशाचा विकास घडवून आणता येतो. अर्थात राजकीय विकासाचा संबंध स्थैर्याशी जोडतांना स्थिरता राजकीय विकासाला कितपत सहाय्य करते याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**८) राजकीय विकास म्हणजे शासकिय शक्ती-** राज्यकारभार ज्यांच्या हातात असतो. त्यांची शक्ती म्हणजे राजकीय विकासाचे मुख्य साधन होय. जुन्या काळात शासकीय शक्ती एककेंद्रीत असूनही विकास झाला नाही. संरजामी शासनव्यवस्थेनंतर लोकांनी शासकिय शक्तीत भाग घेण्यास सुरूवात केली. गेल्या शतकाच्या उत्तरार्धात शासकीय शक्तीचा विकास होऊन राजकीय विकासाला वेग प्राप्त झाला. औदयोगिकरणामुळे पोस्ट, तार, रेल्वे इ. भौतिक सुधारणामुळे शासनाला आपली शक्ती अधिक विस्तृत करता आली. त्यामुळे राजकीय विकासाला अनुकुल परिस्थिती आधुनिक काळात निर्माण झालेली दिसते.

**९) राजकीय विकास म्हणजे विविध साधनांची जुळवाजुवळ-** कोणतीही राजकीय व्यवस्था समाज उपयुक्त असली पाहिजे. या दृष्टीने विचार करता विचारवंताच्या मतानुसार लोकशाही शासन प्रणाली अपुरी असते. कार्यक्षमतेच्या आधारावर शासन संस्थेचे काही नमुन स्पष्ट करण्यात आले आहेत. बलशाली राजवटीत निर्णय घेणाऱ्या शक्ती बलसंपन्न असतात. देशात उपलब्ध असलेली साधनसामुग्री जास्तीत जास्त प्रमाणात एकत्र करून त्याचा पुरेपूर उपयोग करण्याची शक्ती म्हणजे राजकीय विकास मानला जातो. परंतु आधुनिक काळात लोकशाही शासनव्यवस्थेत लोकांच्या संमती व सहकार्याने साधनसामुग्रीची जुळवाजुळव हुकूमशाहीपेक्षा अधिक प्रभावीपणे करतांना दिसतात.

**१०) राजकीय विकास म्हणजे सामाजिक बदल-** सामाजिक हे अनेकदा राजकीय विकास घडवून आणतात. समाजातील वेगवेगळया दिशेने होणाऱ्या बदलाचा राजकीय विकासावर निश्चितपणे परिणाम होत असतो. समाजातील आर्थिकक व सामाजिक रचना राजकीय विकासाला कारणीभूत ठरत असतात. समाजव्यवस्थेत ज्या मार्गाने बदल होत जाईल त्या मार्गाने राजकीय विकास साधला जाईल म्हणून राजकीय म्हणजे सामाजिक बदल असे मानले जाते.

राजकीय विकासाचे विविध दृष्टिकोन सांगता येतात.

**प्र.२ रा. राजकीय विकास म्हणजे काय ते सांगुन राजकीय विकासाचे मूलभूत घटक लिहा.**

आधुनिक काळात राजकीय विकास संकल्पनेला महत्त्व प्राप्त होत आहेत. राजकीय विकास घडवून आणण्यासाठी अनेक साधने कारणीभूत मानली जातात. डॉड, रोस्टो इत्यादी विचारवंतांनी राजकीय विकासाचे पुढील मूलभूत घटक सांगितलेले आहेत.

१. **राजकीय पक्ष-** राजकीय पक्षाशिवाय लोकशाहीची कल्पना करता येणार नाही. राजकीय पक्ष लोकशाहीला गतिमान करण्यासोबत राजकीय विकासाला गती देण्याचेही कार्य करत असतात. राजकीय पक्षाचे कार्याचा विचार दोन दृष्टीने केला जातो. सर्वंकष सत्तावादी राजवटी राजकीय पक्ष राजकीय विकासाचे कार्य करतात. उदा. रशिया, चीन देशात साम्यवादी पक्ष पक्ष सामाजिक, आर्थिक विकासाचे प्रमुख साधन बनले आहेत. लोकशाही व्यवस्थेत सत्ताधारी राजकीय पक्ष जनमतांचा पाठिंबा कायम ठेवण्यासाठी विकासाच्या नव्या नव्या योजना आखत आणतात व त्या अंमलात आणण्याचा प्रयत्न करतात. शासन पद्धती कोणत्याही प्रकारची असली तरी राजकीय विकासाच्या बाबतीत राजकीय पक्षाचे अमान्य करता येणार नाही. मात्र एकपक्षीय राजवटीपेक्षा बहुपक्षीय राजवटी असलेल्या देशात होणारा राजकीय विकास अधिक परिपक्व व संतुलित स्वरूपाचा असतो.

२. **लष्करी बळ-** सध्याच्या काळात राजकीय व्यवस्थेमध्ये सैन्यशक्तीला दिवसेंदिवस महत्त्व प्राप्त होत आहेत. भारताच्या शेजारी राष्ट्रामध्ये सैन्यच राजकीय व्यवस्था चालवितात. अनेक देशात नागरी सत्ता लयास जाऊन देशात लष्करी सत्ता प्रस्थापित होत आहेत. कारण लोकांना अपेक्षित असलेला राजकीय विकास घडवून आणण्यास नागरी सत्ता अपयशी ठरल्यास सैन्याने सत्ता हाती घ्यावी हे लोकमत अपेक्षित करत असते. लष्करी सत्ता देखील जनमताचा पाठिंबा मिळविण्यासाठी नव्या नव्या कल्पना अंमलात आणण्याचा प्रयत्न करतात. उदा. पाकिस्थानात जनरल अयुबखान यांच्या राजवटीच्या काळात अनेक संकल्पना व योजना राबविण्यात आलेल्या होत्या. हटिंगटनच्या मते, सैन्याचा हस्तक्षेप सैन्याद्वारे राज्यकारभारात होता आणि त्यांची नागरी प्रशासनापासून मुक्ती होते हे राजकीय विकासाचे लक्षण मानले जाते.

३. **सुबुद्ध व गतिशील नेतृत्व-** राजकीय विकास राजकीय परिवर्तनाचे एक गतिशील स्वरूप असते. कोणतेही परिवर्तन शीघ्र गतीने करण्यासाठी योग्य नेतृत्वाची गरज असते. गतिशील राजकीय नेतृत्वातून राजकीय विकासाची प्रक्रिया वेग घेत असते. राज्यकारभारातील उणिवा दूर करण्यासाठी आणि प्रेरणा देण्यासाठी गतिशील नेतृत्व प्रयत्न करत असते. उदा. भारतात पंडित नेहरू सारख्या नेत्यामुळे भारताच्या विकासाची प्रक्रिया गतिमान झाली. समाजाच्या आशा आकांक्षा आणि प्रशासन यांची सांगड नेत्याला घालता आली तर नेतृत्वाभोवती आदर व दिव्यवलयी कवच निर्माण होते अशा नेत्याला राजकीय विकास सहज घडवून आणता येतो. अशा नेतृत्वाने केलेल्या कार्याला जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळतो.

४. **राजसत्तेचे नेतृत्व-** वास्तविक हा शासन प्रकार परंपरागत व प्राचीन काळाचा मानला जात असला तरी आधुनिक काळात राजकीय विकासात यांचे योगदान दिसते. राजसत्तेने दूरदृष्टीने विद्युतवेगाने राजकीय विकास घडवून आणता येता. आजही सौदी अरेबिया, कुवत आणि मध्य पूर्वतील अनेक देशात राजसत्ता राजकीय विकासाची प्रमुख साधन बनली आहे. राजसत्तेला आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी राजकीय विकासाशिवाय अन्य कोणताही पर्याय नाही. त्याशिवाय राजसत्तेला अधिमान्यता मिळणार नाही.

५. **समाजाचा सहभाग-** राजकीय विकासाच्या गतीवर सामाजिक परिस्थिती व समाजाच्या सहभागाचा फार मोठा परिणाम घडून येतो. राजकीय व्यवस्था आणि सामाजिक रचना हे परस्परांशी निगडीत असतात. समाजाची स्थिती, समाजाची विचारसरणी आणि समाजाचा राजकीय व्यवस्थेतील सहभाग यावर राजकीय सहभाग अवलंबून असतो. ज्या समाजातील जनता राजकीय व्यवस्थेत सहभागी होत नाही तेथील राजकीय विकास खुंटतो. सामाजिक सहभाग वाढविण्यासाठी समाजात गतिशील नेतृत्व असणे आवश्यक असते. नेतृत्व प्रेरणा, उत्साहपूर्ण वातावरण निर्माण करून समाजाला विकासाच्या मार्गात सहभागी करू शकतो.

६. **राजकीय व्यवस्थेची समर्थता-** आधुनिक काळात जनतेच्या शासनाबद्दलच्या अपेक्षा प्रमाणापेक्षा जास्त वाढलेल्या आहेत. त्यातून समाजाच्या राजकीय मागण्या वाढलेल्या आहेत. त्या मागण्यांचे धोरण व निर्णयात रूपांतर करून राजकीय व्यवस्था आपले सामर्थ्य वाढवू लागला की राजकीय विकास घडून येतो पण हे लोकशाही व्यवस्थेत शक्य असते. कारण लोकशाही नोकरशाही राजकीय विकासाचे माध्यम म्हणून कार्य करत असते. वैधानिक, प्रशासकीय व राजकीय पातळीवर नोकरशाहीच्या मदतीने राजकीय विकास घडवून आणू शकतात.

७. **साम्यवादी नमुना-** राजकीय विकास घडविण्याचे मुख्य साधन म्हणजे साम्यवादी शासन व्यवस्था असल्याचे अनेक विचारवंताचे मत आहे. १९१७ साली लेनिनने मार्क्सवादाच्या आधारावर सर्व राजकीय शक्ती केंद्रीत करून अल्पकाळात रशियाचा विकास घडवून आणला. रशियाच्या विकासापासून प्रेरणा घेऊन चीन व साम्यवादी देशानी राजकीय विकास घडवून आणला. साम्यवादी विकास मॉडेलने प्रभावित होऊन विचारवंत या विकास प्रतिमाचे समर्थन केले करू लागलेले आहेत. लोकशाही देशात विकासाची संथ आणि दीर्घकालीन असते. त्यामुळे कम्युनिस्ट देशातील विकास प्रक्रिया गतीशिल असते. कारण राजकीय विकास संकल्पनेला विचारसरणीचे स्वरूप प्राप्त करून दिले जाते व त्यासंबंधीची लोकांमध्ये एक प्रकारची जाणीव, निष्ठा निर्माण केली जाते. त्यामुळे राजकीय विकासाचा हा नवीन नमुना सर्वमान्य नाही. त्यांच्या यशाबद्दल शंका आहेत.

**टिप- राजकीय विकास आणि राजकीय आधुनिकीकरण -**

राजकीय आधुनिकीकरणाची प्रकिया ही बदल विषयक प्रक्रिया आहे व यात बदल हा विकासाच्या अभिप्रेत असतो. राजकीय विकास आणि राजकीय आधुनिकीकरण हे शब्द समानार्थी वापरले जातात. पण या दोन्ही संकल्पनात भेद दिसून येते. मात्र या दोन शब्दात निश्चित फरक दाखविणे अवघड आहे. विकास या शब्दापेक्षा आधुनिकीकरण हा शब्द अधिक व्यापक आहे. व आधुनिक काळातील प्रगत समाजाच्या संदर्भात तो वापरला जातो. विकसित व्यवस्था हा शब्द प्राचीन काळातही अस्तित्वात होता. परंतु आधुनिकता ही अगदी अलीकडची व नवीन संकल्पना आहे. समाजात घडलेले आधुनिकीकरण आपण पाहू शकतो. पण विकासाची निश्चित अशी कल्पना स्पष्ट करता येत नाही. उदा. भारतातील व्यवस्था विकसित संज्ञेस पात्र होईल पण तिला आधुनिक व्यवस्था म्हणता येणार नाही. विकासाचा विचार आधुनिकीकरणाशिवाय करता येऊ शकतो, पण आधुनिकरणातच विकास अभिप्रेत असतो. पाश्चिमात्य व्यवस्थेत विकसित व आधुनिक दोनही स्वरूपाच्या असल्याने या शब्दांत फरक दाखविला जात नाही ते शब्द समानार्थी वापरले जातात.

आधुनिकीकरण हा शब्द दुसऱ्या महायुद्धानंतर बराच चर्चिला जात आहे. आशिया व आफ्रिकेतील बरीच नवोदित राष्ट्रे स्वतंत्र झाली व त्यांनी आपली स्वतंत्र राजकीय व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला ते करित असतांना त्याच्यासमोर ज्यांनी प्रशासन चालविले त्याचा आदर्श होता. राजकीय व्यवस्थेत मागास राष्ट्रात ज्या घडामोडी होऊ लागल्या त्याचा परिणाम अमेरिकेतील अनेक विचारवंतावर होऊन राजकीय आधुनिकीकरणाच्या नव्या कल्पनेला त्यांनी राजकीय विश्लेषणाच्या अभ्यासात अतिशय महत्त्वाचे स्थान दिले. युरोप खंडात प्रबोधनाचे युग सरू झाले असे मानले जाते. प्रबोधन युगात सुरू झालेल्या परिवर्तनाने राजकीय क्षेत्रात नव्या गोष्टी निर्माण केल्या. राजकीय क्षेत्रापासून धार्मिक क्षेत्राचे अलगीकरण, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात संधीच्या समान वाटपाला महत्त्व देण्यात येऊ लागले. राजकीय विकासात राज्याची निर्मिती व राष्ट्राची निर्मिती यांचा विचार होतो आणि आधुनिकीकरण मात्र यानंतरची अवस्था असते. तरी या संकल्पनेत स्पष्ट सीमारेखा ओढून काढणे फार कठिण आहे. राजकीय आधुनिकीकरणाला लोकमताचा पाठिंबा मिळविणे फार आवश्यक असते. राजकीय विकासातून राजकीय आधुनिकीकरण घडून येणार आहे. त्यातून काही बिकट समस्या निर्माण होतात व त्या सोडविण्यासाठी मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून लोकांचा पाठिंबा मिळविणे फारच आवश्यक असते.

थोडक्यात राजकीय परिवर्तन शासनाच्या शक्तीत लोकांचा सहभाग, विकेंद्रीकरण, शासन शक्तीचा विस्तार, नवीन रचनाची निर्मिती इ. राजकीय आधुनिकीकरण म्हणता येईल.

**टिप-राजकीय परिवर्तन आणि क्रांती-** क्रांती म्हणजे आकस्मिकपणे होणारा बदल होय. एखादी व्यवस्था राजकीय परिवर्तनास प्रतिबंध करू लागली की ताणतणाव वाढू लागतात आणि संतप्त सामाजिक गट प्रचलित शासन व्यवस्थविरूध्द बंड करू लागतात आणि त्यातून राजकीय क्रांती घडू शकते. लोकाच्या तक्रारीची दाद घेतली तर अशी क्रांती टाकता येऊ शकते.शासन जर लोकाभिमुख असेल परिवर्तन हे सनदशीर आणि शांततेच्या मार्गाने करता येते. शासन लोकाभिमुख नसेल जनतेवर अन्याय अत्याचार करत असेल आणि जनतेच्या रास्त मागण्या मान्य करत नसेल तर मात्र क्रांतीच्या साहयाने राजकीय परिवर्तन घडून येते. सुधारणंच्या मार्गाने हळुहळु निश्चित व इच्छीत असे परिवर्तन घडून येते मात्र क्रांतीद्वारे जे परिवर्तन होते त्याचा निश्चित अंदाज बाधता येत नाही. उदा. फ्रेंच राज्यक्रांती नंतर निर्माण झालेली अराजकता. त्यामुळे क्रांतीनंतर परिवर्तन चांगले किंवा वाईट या कोणत्याही प्रकारचे होऊ शकते. सार्वत्रिक मतदानाचा अधिकार अर्ज वा विनंतीने मिळाला तर ते परिवर्तन असते. पण तोच अर्ज फेटाळला गेला तर क्रांती होते आणि त्यातूनही परिवर्तन घडते. पण चळवळीतून जेव्हा क्रांती होते ते ही एक प्रकारचे परिवर्तन होते. चळवळीच्या माध्यमातून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. पाकिस्तानात जनरल झियानी आपल्या हाती सत्ता घेतली ती क्रांती आणि परिवर्तनच होते.भारतात प्रचंड वेगाने सुधारणा घडतात आहेत त्यांना परिवर्तनच म्हणता येईल. सुधारणा नियोजनपूर्वक करून परिवर्तन घडवून आणता येते. पण क्रांती कशी होईल आणि यातून होणारे परिवर्तन कशा स्वरूपाचे असेल याचा अंदाज करता येत नाही उदा. इराण मधल्या क्रांतीने आज जे वळण घेतले ते सरूवातीला कधीही अपेक्षित नव्हते.

राजकीय परिवर्तन आणि क्रांती या बाबीं परस्पर संलग्न असतात. परिवर्तनाचे विरोधक क्रांतीची भीती दाखवून परिवर्तनाच्या विरोधी वातावरण तयार करतात. अर्थपूर्ण राजकीय बदल घडवून आणतांना क्रांती पूर्णपणे कशी टाळता येईल हा प्रश्न अविकसित देशापुढे निर्माण होतो. क्रांतीमुळे अस्थिरता निर्माण होते. अस्थिरता पूर्णपणे टाळता येणे कठिण असले तरी हिंसा व रक्तपाताचे प्रमाण कमी करून बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. क्रांतीच्या आधारावर परिवर्तन घडविण्यात हिंसा व अस्थिरतेला निमंत्रण ठरू शकते. म्हणून राजकीय क्रांती टाळून शांततेच्या माध्यमातून राजकीय परिवर्तनाचा प्रयत्न आधुनिक काळात केला जातो.

**प्र. ३ रा. राजकीय आधुनिकीकरण व्याख्या, वैशिष्टये आणि परिणाम स्पष्ट करा?**

**राजकीय आधुनिकीकरण म्हणजे काय-**

आधुनिकीकरणाचा प्रश्न दुसऱ्या महायुद्धानंतर सामाजिक शास्त्रात विचार होऊ लागला. आधुनिकीकरण म्हणजे काय हे निश्चित सांगणे अवघड आहे. आधुनिकीकरण ही एक प्रक्रिया आहे ती सामाजिक व राजकिय जीवनात अव्याहत पणे चालू असते. समाज हा गतीशिल आहे. त्यातील लोकांच्या आशा आकांक्षा कधी स्वतःहून तर कधी कधी इतर बाहय प्रभावामुळे बदलत जातात व त्यानुसार समाजाची रचना बदविण्याचा प्रयत्न होत असतो असा हा सतत वाढत जाणारा बदल याला आधुनिकीकरण म्हणता येईल. समाजात उपलब्ध साधनसामुग्रीचा विचारपूर्वक उपयोग करून त्या आधारा समाजात नवीन बदल घडवून आणणे यालाही आधुनिकीकरण म्हणणात येते. पाशीमात्याच्या देशाच्या प्रभावाने आणि औदयोगिकरणातून समाजाला स्वरूप बदले तेथून आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली असे मानले जाते. आज आधुनिकीकरण म्हणजे पाश्चिमात्यीकरण असा ठोबळ मानाने अर्थ घेतला जातो अर्थात हा अर्थ पूर्णपणे योग्य नाही. सर्वच क्षेत्रात आधुनिकीकरणाच्या प्रेरणा पाश्चमात्य राष्ट्राकडून आलेल्या असल्या तरी आधुनिकीकरण म्हणजे पाश्चिमात्यीकरण असे ठोबळमानाने मानता येत नाही.कारण आधुनिकीकरणात पाश्चिमात्यीकरणापेक्षा व्यापक प्रक्रिया आहे.

**राजकीय आधुनिकरणाच्या व्याख्या-** आधुनिकीकरण ही संकल्पना संदिग्ध स्वरूपाची असल्याने तिचा नेमक्या भाषेत अर्थ व्यक्त करणे कठीण आहे. आधुनिकीकरण ही सामाजिक व राजकीय जीवनात अखंड चालणारी प्रक्रिया आहे. समाजातील उपलब्ध साधनसामुग्रीचा बुद्धिनिष्ठ उपयोग करून नव समाज निर्माण करणे आणि त्यातून समाजाची रचना बदलण्याचा प्रयत्न केला जातो असा सतत होत जाणारा प्रयत्न म्हणजे राजकीय आधुनिकीकरण होय.

१. **रॉबर्ट वार्ड-** आधुनिक समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने उपलब्ध साधनसामुग्रीचे विचारपूर्वक नियोजन आणि यासंबंधी ती प्रक्रिया असते त्यास आधुनिकीकरण असे म्हणतात.

२. **हटिंग्टन** - मानवी विचार व क्रिया यासंबंधीच्या सर्व क्षेत्रात बदल घडवून आणणारी बहु-मुखी प्रक्रिया म्हणजे आधुनिकीकरण होय.

३. **क्लॉद वेल्च-** साधनसामुग्रीच्या विचारपूर्वक वापरावर आधारित व आधुनिक समाज निर्मितीचा उद्देश असलेली प्रक्रिया म्हणजे आधुनिकीकरण होय.

४. **रॉजर्स व स्वेनिंग-** आधुनिकीकरण प्रक्रिया म्हणजे अशी प्रक्रिया की जिच्या आधारे व्यक्ती पारंपरिक जीवनप्रणालीचा त्याग करून अधिक गुंतागुंतीची, तांत्रिकदृष्टया प्रगत व गतिमान अशी जीवनप्रणाली स्वीकारत असते.

**राजकीय आधुनिकरणाची वैशिष्टये वा उद्दिष्टये**

आज आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेपासून कोणताही देश अलिप्त राहू शकत नाही. काही देशात ही प्रक्रिया संथगतीने तर काही देशात जलद गतीने असते. पाश्चिमात्य देशांशी संपर्क आशिया आफ्रिका खंडातील नवीन राज्यात आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली परंतु स्पित्झ यांनी विसाव्या शतकातील नवीन राज्यात सुरू असलेली राजकीय आधुनिकीकरणाची प्रक्रियेहून भिन्न आहे. युरोपातील उदारमतवादी किंवा व्यक्तिवादी विचारसरणीच्या प्रभावाने तेथील आधुनिकीकरण झालेले आहे. परंतु नवीन राज्यातील आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत शासनाचा वाटा व हस्तक्षेप मोठया प्रमाणावर दिसून येतो. लुसियन यांच्यामते युरोपीयन देशात राजकीय विकास व आधुनिकीकरणाच्या प्रश्नांची सोडवणूक स्वतंत्र व अलगपणे करता आली परंतु विकसनशील नवीन राज्यात मात्र सर्व प्रश्न एकाच वेळी हाताळावे लागत आहेत. राजकीय आधुनिकीकरण ही एकाकी घडणारी प्रक्रिया नाही. जीवनाच्या विविध क्षेत्रात फार मोठया प्रमाणावर आधुनिकीकरण सुरू आहे त्याचा एक अंश म्हणजे राजकीय आधुनिकीकरण होय. पूर्वापार चालत आलेल्या राजकीय संस्थात एकाकी बदल होऊ लागतात हे बदल स्थिर झाले की त्यालाच राजकीय आधुनिकीकरण स्वरूप प्राप्त होते.

१. आधुनिकीकरणाच्या साहयाने समाजातील निरनिराळे राजकीय प्रश्नाचे विश्लेषण करणे शक्य व सोपे होते. समाजात बदलाचे स्वरूप कोणते हे लक्षात येऊ शकते.

२. विकसित देशानी आपल्या समोर विकासाच्या दृष्टीने कोणते ध्येय ठेवले होते. अविकसित देशाने कोणते ध्येय ठेवावे तसेच ही ध्येय कशी प्राप्त केली जातात व प्रत्यक्षात ती कितपत साध्य होऊ शकतात हे आधुनिकरणाच्या सहाय्याने लक्षात येऊ शकते.

३. समाज कोणत्या दिशेने प्रगत होत आहे. समाजातील सामाजिक, आर्थिक व राजकीय शक्ती कितपत साहय करीत आहे वा त्यांच्या मार्गात अडचणी निर्माण करीत आहे. समाजातील अपेक्षित बदल कितपत व किती साध्य होऊ शकेल हे आधुनिकीकरणामुळे जाणून घेता येते.

४. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला भौगालिक मर्यादा नाही. जगात कोणत्याही भागात तिचा सर्वत्र होऊ शकतो. प्रत्येक देशाची परंपरागत व्यवस्था आहे. त्यानुसार त्या देशात एक निश्चित स्वरूपाची शक्तीशाली सामाजिक व राजकीय रचना निर्माण झाली असते. अशा परिस्थितीत आधुनिकीकरणामुळे तुलनात्मक अभ्यासाला प्रेरणा मिळू शकते.

५. विकसनशील देशाच्या आशा व आकांक्षाची माहिती आधुनिकीकरणामुळे शकते. या देशात आकांक्षा कशा निर्माण होतात त्यापूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात याची माहिती प्राप्त होऊ शकते.

६. आधुनिकीकरणाच्या सहाय्याने विकसित देशातील उपलब्धी याचे स्वरूप लक्षात येऊ शकते. आणि त्यांचे मापन करता येते. विकसित देशाचे आधुनिकरणाचे उदाहरण समोर ठेवून आपल्या देशाच्या आधुनिकीकरणाचे स्वरुप निश्चित करू शकते.

**राजकीय आधुनिकीकरणाचे परिणाम -**

राजकीय आधुनिकीकरण ही एकाकी घडणारी प्रक्रिया नाही. राजकीय आधुनिकीकरण सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात होणाऱ्या बदलावर अवलंबून असते. एक व्यापक स्वरूपाच्या आधुनिकीकरणाचा राजकीय आधुनिकीकरण एक भाग आहे. परंपरागत राजकिय व्यवस्थेत हे बदल स्थिर स्वरूपात कायम झाले म्हणजे ती राजकीय व्यवस्था आधुनिक स्वरुपाची मानली जाते.

१. परंपरागत राजकीय व्यवस्थेत सत्तेचे स्थान श्रेष्ठ वर्गात जन्म व स्थानावर आधारित असे. आधुनिक व्यवस्थेत उपलब्धी व गुणवत्ताच्या आधारावर निश्चित केले जाते. अशा पद्धतीने परंपरागत राजकीय सत्तेची रचना बदलून आधुनिक राजकीय सत्तेची रचना तयार केली जाते.
२. आधुनिक राजकीय व्यवस्थेत ऐहिक आणि निधर्मी स्वरूपाची राष्ट्रीय सत्ता उदयास येते. अशी सत्ता केंद्रीत स्वरूपाची असून तिचे विकेंद्रीकरण निरनिराळया राजकीय विभागात झालेले दिसते.
३. राजकीय व्यवस्थेत सतत वाढत जाणाऱ्या मागण्यांना तोंड देण्यासाठी व त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी विभागीय व वैशिष्टयपूर्ण अशा राजकीय संघटना स्वरूपाच्या रचना निर्माण होतात. तशा रचनाचे जाळे आधुनिक व्यवस्थेत निर्माण झालेले दिसते.
४. राजकीय व्यवस्था व व्यक्ती या दोहात एक प्रकारचे तादात्म्य प्रस्थापित झालेले असते. आपण एका राजकीय व्यवस्थेचे घटक आहोत याची जाणीव व्यक्तीला होते यालाच नागरीकत्वाची भावना असे म्हणतात.
५. राजकीय व्यवस्थेच्या व्यवहारात लोकांचा वाढता सहभाग दिसून येतो. राजकीय व्यवस्थेची अंतिम शक्ती जनता असते. शासकीय श्रेष्ठजनाला याच आधारावर अधिमान्यता प्राप्त होते. शासकीय सत्ता जबाबदार स्वरूपाची समजली जाते. जनता व शासकिय श्रेष्ठजन यात मध्यस्थ म्हणून राजकीय पक्ष ,दबाबगट सारखा रचना उदयास येतात.
६. राष्ट्रीय राजकीय व्यवस्था व आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवस्था यात संबंध जोडला जातो आणि दोहात परस्पर देवाणघेवाण त्या ऐकमेकांवर परिणाम करित असतात.
७. शासकिय व्यवस्था ही विभेदित व कार्यात्मक दृष्टीने संघटित करण्यात आली असते. शासकीय रचनात अंतर्गत एकीकरण साधण्यात आलेले दिसते.
८. राजकीय निर्णय विवेक युक्त व निरपेक्ष कार्यविधीच्या आधारावर घेतले जातात.
९. विधीव्यवस्था ही निरपेक्ष व अवैयक्तिक स्वरूपाची असते. न्यायिक व नियामक व्यवस्था कायदयावर आधारित असते.
१०. आधुनिकीकरणामुळे परंपरागत समाज रचनेच्या कार्यभागाला गौण स्थान प्राप्त होते.
११. परंपरागत मूल्य व्यवस्थाचे स्थान नवीन मूल्य व्यवस्था धारण करते.

**टिप- राजकीय आधुनिकीकरणाचे पेचप्रंसग वा अडथळे आणि समस्या-** आधुनिकीकरणाच्या प्रश्नाने विकसनशील वा नव्याने स्वतंत्र राष्ट्रांसमोर पुढील पेचप्रंसग निर्माण होतात.

**१.** विकसनशील व अविकसित देशातील लोकांना परंपरागत गोष्टी आवडतात कारण त्यांच्यावर तसे संस्कार झाले असतात. परंपरागत सांस्कृतिक मूल्यासंबंधी त्यांच्यात आदराची भावना असते त्याचे पालन ते निष्ठेने करतात. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे परंपरागत समाजात अनेक बदल घडून येतात. हे बदल लोक सहजासहजी स्वीकारत नाही. त्यामुळे त्यांच्यासमोर एक पेंचप्रंसग निर्माण होतो. नवीन मूल्य स्वीकारून परंपरागत मूल्यांना तिलांजली दयावी की आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेबाबत उदासिन राहावे अशा रितीने समाजाची घडी बिघडू द्यायची नाही असा पेचप्रंसग होय. पस्परविरोधी दोन संस्कृतीच्या

प्रभावाखाली हे देश गोंधळात सापडले आहेत. पारंपरिक गट, निष्ठा व प्रवृत्ती सहजासहजी त्याग करता येत नाही. मात्र अधिक व्यापक निष्ठा आणि वैचारिकतेचे तत्त्व या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात.

२. दुसरा पेचप्रसंग म्हणजे आधुनिकीकरण जुन्या संस्थाना एक प्रकारे आव्हान देत असते. त्यात विस्कळीतपणा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. पण होत असलेला बदल संथ की जलद स्वरूपाचा असावा. उत्क्रांती की क्रांतीच्या मार्गाने करावा असे अनेक प्रश्न परंपरागत समाजातील लोकांसमोर उभे राहतात. वास्तविक लोक नवीन गोष्टी स्वीकारण्यास फारसे उत्सुक नसतात. जुन्या गोष्टी कायम राहाव्या ही लोकांची इच्छा असते. म्हणजे अशा लोकांची पुराणमतवादी दृष्टी ही एक आधुनिकीकरणातील पेचप्रसंग स्वरूपाची समस्या असते.

३. परंपरागत समाजात जातीय भावना तीव्र स्वरूपात आढळून येतात. जातीजातीत परस्पर वैमनस्य असते. या परिस्थितीत निधर्मी भावना निर्माण करणे अवघड कार्य असते. आधुनिकीकरण जातीय भावना नाकारतो. तेव्हा समाज जीवनात ऐहिक व निधर्मी दृष्टिकोण स्वीकारावा की जातीय निष्ठा कायम ठेवावी अशा पेचप्रसंगात लोक सापडतात.

४. परंपरागत समाजात राष्ट्रीय एकात्मतेची भावना फार क्षीण स्वरूपाची असते. स्थानिक अभिमानाला जास्त प्राधान्य असते. वंश, धर्म, प्रांत, भाषा आधारावर लोकांत विभिन्नतेची भावना निर्माण झाली असते. राष्ट्रीय एकात्मतेची भावना आधुनिकीकरणाद्वारे बळकट केली जाते. राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान देणाऱ्या गोष्टी कशा नेस्तनाबूत करावयाच्या हा एक महान पेचप्रसंग विकसनशील राष्ट्रासमोर निर्माण झालेला असतो.

५. राजकीय व्यवस्थेशी एकरूपता साधली जात नाही. राष्ट्रवादी चळवळीतून स्वातंत्र्य मिळविले असले तरी भविष्यकाळासाठी कोणती ध्येय बाळगावीत याविषयी लोकांचे एकमत होऊ शकत नाही. विकसनशील देशासमोर लोकशाही, साम्यवाद, हुकूमशाही असे निरनिराळे पर्याय असतात. परंपरागत समाज अधिनायकवादी स्वरूपाचा असतो. निर्णयनिर्धारणात जनतेचा सहभाग विशेष नसतो. आधुनिकीकरणामुळे अधिनायकवादी जाऊन लोकशाही येते. लोकशाहीत निर्णय निर्धारणात जनतेचा सहभाग फार मोठा असतो. अशाप्रकारे आधुनिकीकरणामुळे परंपरागत अधिनायकवादी व आधुनिक लोकशाहीत संघर्ष निर्माण होतो. या संघर्षात लोकशाही यशस्वी होते त्यामुळे अधिनायकशाहीला लोकशाही एक प्रकारचे संकट वाटते.

६. परंपरागत समाजात लोकांना त्यांच्या स्थितीबद्दल विशेष असमाधान वाटत नाही. पण आधुनिकीकरणामुळेनवीन नवीन विचार प्रवाह समोर येतात. त्यामुळे ते आपली सामाजिक स्थिती पडताळून पाहतात त्यातून त्यांच्यात असंतोष निर्माण होतो. स्त्रियांना गौण दर्जा, कामगाराची दयनीय स्थितीमुळे असमाधान निर्माण होऊन ते संघर्षाला तयार होतात. हा असंतोष कमी करून जनतेत समाधानाची भावना निर्माण करणे ही विकसनशील देशांना फार त्रस्त करणारी समस्या वाटते.

७. परंपरागत समाजात समता मानत नाही. समाजात अल्पसंख्य लोक श्रेष्ठजन असतात. इतर सर्वसाधारण जनता असते. श्रेष्ठजनानी शासन करावे कारण शासन करण्याकरिता तेच लोक लायक मानले जातात. अशाप्रकारे श्रेष्ठ व कनिष्ठ या आधारावर परंपरागत समाजाचे व्यवहार चालतात तर आधुनिकीकरणामुळे सर्व लोक समान मानले जातात. कनिष्ठातील कनिष्ठाला देखील राज्य चालविण्यासाठी लायक समजले जाते. या परिस्थितीत परंपरागत असमानता व आधुनिकीकरणामुळे निर्माण होणारी समानता यात विरोध निर्माण होतो तो नाहीसा करणे परंपरागत समाजाला फार कठिण जाते.

८. सामाजिक न्याय संकल्पना आधुनिकरणामुळे निर्माण झालेली आहे. ती परंपरागत समाजाच्या पचनी पडणे शक्य नाही. कारण परंपरागत समाजात सामाजीक न्यायाची संकल्पना आढळत नाही. त्यामुळे आधुनिकीकरणामुळे निर्माण झालेली सामाजिक न्याय संकल्पना व परंपरागत समाजात तिचा अभाव यातून विकसनशील देशाला मार्ग काढणे अवघड जाते.

अशाप्रकारे आधुनिकीकरणामुळे वरिल समस्या निर्माण होतात.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

**१.** राजकीय विकास म्हणजे काय?
उत्तर- आयसेन्टाडच्या मते सातत्याने होणाऱ्या बदलास पचविण्याची क्षमता असणारी संस्थात्मक यंत्रणा निर्माण होणे म्हणजे राजकीय विकास होय.

**२.** राजकीय विकासाचे दोन दृष्टिकोन कोणते?
उत्तर- राजकीय विकास म्हणजे आर्थिक विकासाचे साधन, राष्ट्रराज्याचा विकास म्हणजे राजकीय विकास आणि राजकीय विकास म्हणजे प्रशासकीय व वैधानिक विकास इ.राजकीय विकासाचे प्रमुख दृष्टिकोन आहेत.

**३.** राजकीय आधुनिकीकरण म्हणजे काय?
उत्तर- रॉबर्ट वार्डच्या मते आधुनिक समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने उपलब्ध साधनसामुग्रीचे विचारपूर्वक नियोजन आणि यासंबंधी ती प्रक्रिया असते त्यास आधुनिकीकरण असे म्हणतात.

**४.** राजकीय आधुनिकीकरणाचे दोन परिणाम सांगा.
उत्तर- राजकीय व्यवस्थेत सत्तेचे स्थान जन्म व स्थानापेक्षा उपलब्धी व गुणवत्तेच्या आधारावर निश्चित केले जाते तसेच आधुनिक राजकीय व्यवस्था ऐहिक व निधर्मी स्वरूपाची असते हे प्रमुख परिणाम सांगता येतात.

**५.** राजकीय आधुनिकीकरणाचे दोन वैशिष्टये लिहा.
उत्तर- राजकीय आधुनिकीकरणातून समाजातील विविध राजकीय प्रश्नाचे विश्लेषण करणे शक्य होते तसेच या प्रक्रियातून समाजातील बदलाचे स्वरूप लक्षात येऊ शकते ही दोन वैशिष्टये आहेत.

**६.** राजकीय विकासाचे दोन मूलभूत घटक कोणते?
उत्तर- राजकीय पक्ष, सुबुद्ध व गतिशील नेतृत्व, लष्करी बळ हे राजकीय विकासाचे मूलभूत घटक आहेत.

**७.** राजकीय आधुनिकीकरणाच्या मार्गातील दोन अडथळे लिहा.
उत्तर- पारंपरिक मूल्य त्याग की नवीन मूल्याचा स्वीकार हा प्रथम अडथळा, स्थानिक अस्मितेला प्राधान्य की राष्ट्रीय एकात्मतेला हा प्राधान्य हे राजकीय आधुनिकीकरणाच्या मार्गातील प्रमुख अडथळे आहेत.